इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

कार्यक्रम पत्रिका क्र. (५/२०२६)

सर्वसाधारण सभा

प्रति. दि. १७/०६/२०२६

मा. ---------------------------------------------------------------

नगरसेवक / नगरसेविका,

इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

महोदय,

इचलकरंजी महानगरपालिकेच्या मा. सदस्य यांना नोटीस देणेत येते की इचलकरंजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा गुरुवार दि. २५/०६/२०२६ रोजी दुपारी १२:१५ वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणास विनंती करणेत येत आहे.

## परिशिष्ठ

विषय क्र. १ : मागील सभा दि. २०/०५/२०२६, इ. रोजी झालेल्या मा. महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी शिवतिर्थ नजिक असणाऱ्या जागेतील दुकाने हटवून सदर ठिकाणी शहर परिवहन ई-बस स्थानक करणेस मंजुरी मिळणेबाबत मा. परिवहन समिती ठराव क्र. ०३ दि. ३०/०३/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ३ : सोलगे मळा, शहापुर, गट न २३५ पार्ट २६०, गट नं २५७ येथे ई-बस डेपो विकसित करणे कामास मक्तेदार यांना दि. ३१/०८/२०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ दिलेबाबत मा. परिवहन समिती ठराव क्र. ०८ दि. ०९/०६/२०२६ मा. महासभेच्या अवलोकनार्थ सादर.

विषय क्र. ४ : पी.एम. ई-बस सेवेकरीता ११/०.४३३ के.व्ही, १६०० के. व्ही. ए. ट्रान्सफॉर्मर उभा करणे अंतर्गत अनुषंगिक इलेक्ट्रीकल कामे करणे, हायमास्ट स्ट्रीट लाईट उभा करणे कामी मक्तेदार यांना सप्टेंबर २०२६ अखेर मुदतवाढ दिलेबाबत मा. परिवहन समिती ठराव क्र. ०९ दि. ०९/०६/२०२६ मा. महासभेच्या अवलोकनार्थ सादर.

विषय क्र. ५ : पी.एम. ई-बस डेपोच्या कामास अनुसरुन सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून तसेच कामामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी व उर्जा बचतीचे धोरण स्विकारण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करणेसाठी मा. शासनाकडुन निधी उपलब्ध होणेसाठी मा. शासनाकडे प्रस्ताव सा-दर करणेस मंजुरी मिळणेबाबत मा. परिवहन समिती ठराव क्र. १० दि. ०९/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ६: इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना बेसिक ब्युटी पार्लर या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०३ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

विषय क्र. ७ : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना कराटे या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०४दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

विषय क्र. ८ : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना TALLY ADVANCE PRIME या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०५ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

Scanned with OKEN Scanner

**विषय क्र. ९ :** इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना आरीवर्क या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०६ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**विषय क्र. १० :** इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना नेलआर्ट या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०७ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**विषय क्र. ११ :** इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना ज्वेलरी मेकिंग या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०८ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**विषय क्र. १२ :** इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना बेसिक फैशन डीझयानिंग या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०९ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**विषय क्र. १३ :** इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींच्या आरोग्याच्या दृष्टीने योग या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र १० दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**विषय क्र. १४ :** इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना लाठी-काठी या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ११ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**विषय क्र. १५ :** इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना स्पोकन इंग्लिश या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र १३ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**विषय क्र. १६ :** इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य पिडीत, गरीब व गरजु महिला व युवतींना न्याय मिळणेसाठी नामांकित ३ तज्ञ स्त्री वकील व दोन तज्ञ पुरुष वकील यांची समुपदेशन करणेसाठी नियुक्ती करुन कायम स्वरुपी समुपदेशन केंद्रे सुरु करणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. १७ दि. १५/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस व इचलकरंजी शहरामध्ये महिलांसाठी समुपदेशन केंद्र सुरु करणेबाबत संवाद सामाजिक मंडळ यांनी दि. १९/०५/२०२६ रोजीचे पत्रानुसार मागणी केले कामी महानगरपालिकेमार्फत आवश्यक अटी शर्तींच्या अधिन राहुन महापालिका स्तरावर जागा उपलब्ध करुन देणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**विषय क्र. १७:** इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळांमध्ये वाढीव वर्ग खोल्यांच्या बांधकामास मंजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. १२ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**विषय क्र. १८ :** सन २०२६-२७ सालाकरीता इचलकरंजी महानगरपालिकेच्या गणवेश पात्र अधिकारी कर्मचारी यांना गणवेश वाटपाकरीता कापड खरेदीस मंजुरी देणेबाबत.

**विषय क्र. १९ :** इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली व इयत्ता दुसरीच्या विद्यार्थी विद्यार्थीनींकरीता बेंच पुरविणेस मंजुरी देणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. २ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस

**विषय क्र. २० :** इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनींकरीता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता शैक्षणिक साहित्य पुरविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ३ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**विषय क्र. २१ :** इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी सायकल वाटप योजना राबविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ४ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**विषय क्र. २२ :** इचलकरंजी महानगरपालिकेच्या ३३ प्राथमिक शाळांसाठी स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करुण देणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ६ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**विषय क्र. २३ :** इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये स्लॅब गळती रोकणेसाठी नवीन पत्रे बसवुन छत दुरुस्ती करणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ७ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. २४ : इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते आठवी मधील ६८०० विद्यार्थी विद्यार्थीनींना स्पोर्टस ट्रॅकसुट्स पुरविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ८ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. २५ : इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळांमधील स्वच्छतागृह दुरुस्ती व नवीन स्वच्छतागृह बांधकामासाठी मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ०९ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. २६ : इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळेंसाठी संरक्षण भिंत बांधणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १० दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. २७: इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळांमधील CCTV CAMERA ची वार्षिक देखभाल दुरुस्ती संगणक विभागामार्फत करणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ११ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. २८ : इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळांमधील वाढीव वर्गखोल्यांच्या बांधकामास मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १२ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. २९ : सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांना ओळखपत्र सुविधा पुरविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १३ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ३० : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना बेंच पुरविणेस मंजुरी देणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १६ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ३१ : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सालासाठी शालेय साहित्य खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १७ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ३२ : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल मधील इयत्ता पाचवी ते दहावीच्या ५७१ विद्यार्थी-विद्यार्थीनींना टी शर्ट व लोअर (स्पोर्टस किट), स्पोर्टस शुज पुरविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १८ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ३३ : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थी- विद्यार्थीनींना गणवेश पुरविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १९ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ३४ : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थी- विद्यार्थीनींना गणवेश, सॅक, बुट, सॉक्स, बेल्ट इ. शैक्षणीक साहित्य पुरविणेस मंजूरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. २० दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ३५ : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल या प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या परिक्षेसाठी उत्तरपत्रिका व शालेय कामकाजासाठी स्टेशनरी साहित्य पुरविणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. २१ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ३६ : इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळा व माध्यमिक हायस्कुल तसेच शिक्षण विभागाच्या जुन्या ऑफिस मधील डेड स्टॉक साहित्य निर्लेखन करणेस मंजूरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. २२ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ३७ : इंदोर शहर धर्तीवर इचलकरंजी शहरासाठी स्वच्छता योजना राबविणेकामी नियुक्त करणेत आलेल्या समितीने इचलकरंजी शहरातील घनकचरा गोळा करणे, त्याची वाहतुक करणे आणि त्यावर प्रक्रीया करणे तसेच या अनुषंगाने स्वच्छ व सुंदर इचलकरंजीसाठी तयार केलेली नियमावलीस मा. महासभेची मंजुरी देणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. ३८ : इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील NUHM अंतर्गत स्थापित आरोग्य केंद्रे मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १८/०५/२०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तानुसार महानगरपालिकेकडे हस्तांतरण करुन घेणेस व आरोग्य केंद्रांचे हस्तांतरण करुन घेणेसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत जिल्हा आरोग्य अभियान व जिल्हा आरोग्य सोसायटी महापालिका स्तरावर गठीत करुन सदर सोसायटीची नोंदणी मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे करुन घेणेस मंजुरी मिळणेबाबत आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ३९ : इचलकरंजी महानगरपालिका अधिनस्त प्राथमिक शाळांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने बालवाडी वर्ग सुरु करणे बाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी दि. २९/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले बाबत.

विषय क्र. ४० : इचलकरंजी महानगरपालिका इमारतीच्या जवळ असलेल्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी चौकात भारताचे माजी पंतप्रधान, उत्कृष्ट संसदपटू, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचा पुर्णाकृती पुतळा अटल प्रतिष्ठान, इचलकरंजी यांचे वतीने उभारणेस मंजुरी देणेबाबत मा. आमदार राहुल प्रकाश आवाडे यांनी मागणी केले कामी कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ४१ : आमदार स्थानिक विकास निधी कार्यक्रम अंतर्गत शहरातील विविध २०७ ठिकाणी खोदणेत आलेल्या विंधन विहरींवर वितरण व्यवस्था निर्माण करणेकरीता तयार करणेत आलेल्या रु. १,८९,११,८०९/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. जिल्हा नियोजन समिती, कोल्हापुर यांचेकडे सादर करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ४२: इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये उद्यानातील ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करणेसाठी श्रेडर मशीन खरेदी करुन उद्यानामध्ये नाडेप पिट व शेड उभारणी करणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ४३ : खेळाडु कोटयातुन क्रीडा अधिकारी पदी थेट नियुक्ती देणेबाबत श्री. अजिंक्य आण्णासो रेडेकर यांचे दि. ०७/०७/२०२५ चा अर्जाबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र. ४४ : इचलकरंजी महानगरपालिका बांधकाम विभागाकडुन शहरातील विविध इमारती, डिव्हायडर, बागदुरुस्ती करणेकरीता एकुण ५५ बाबी अंतर्गत कामे करणेबाबत वार्षिक कामे सुरु असुन सदर कामी पुढील निविदा निघेपर्यंत मुदतवाढ देणेत आली असुन सदर कामी निविदा मागविणे कामी धोरणात्मक निर्णय होणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ४५ : स्टेशन रोड पंचरत्न मंगल कार्यालय समोरील स्वागत कमानीस हिंदु हृदयसम्राट स्वर्गीय श्रीमान बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार असे नामकरण करणेबाबत श्री. शिवाजी संभाजी पाटील, नगरसेवक, भाऊसाहेब बाबुराव आवळे, शिवसेना जिल्हाप्रमुख, संजय चौगुले, जिल्हाप्रमुख व इचलकरंजी नागरीक मंच यांनी मागणी केलेबाबत.

विषय क्र. ४६ : इचलकरंजी महानगरपालिकेच्या आसरा नगर येथील २० एम. एल. डी. मलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रीया केलेले पाणी यड्राव परिसरातील व आसपासच्या शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करुन देणेस व बौद्ध विहार, टाकवडे वेस येथील १८ एम. एल. डी. मलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रीया केलेले पाणी पाईपलाइन द्वारे टाकवडे वेस परिसरातील शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पाईपलाइन टाकणे, वितरण व्यवस्था उभारणे तसेच आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करुन देणेकामी अंदाजपत्रक तयार करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ४७ : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये नियमित व सुरळीत पाणीव्यवस्थेमध्ये वारंवार होणाऱ्या गळत्या काढणेकरीता आधुनिक तंत्रज्ञान आधारीत लिक डिटेक्टर मशीन खरेदीकामी अंदाजपत्रक तयार करणेस व सदरचे काम पंधरावा वित्त आयोग बंधनकारक निधीमधुन प्रस्तावित करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ४८ : लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्र. १५ केर्ले मळा ते आरगे भवन ओढा पर्यंत हाफ राऊंड गटर करणेचे काम मंजुर असुन सदर कामाचे ठिकाणी असलेल्या रस्त्याच्या कब्ज्या संदर्भात वाद सुरु असलेने सदरचे काम केर्ले मळा ते आरगे भवन ओढा येथे न करता मधुबन हौसिंग सोसायटी येथे टाकळीकर घर ते सचिन घोरपडे घर, मोकाशे घर ते स्वानंद कुलकर्णी घर या ठिकाणी करणेबाबत सौ प्रमिला रविंद्र जावळे, नगरसेविका यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. ४९ : इचलकरंजी शहरातील महासत्ता चौक व सांगली नाका या दोन ठिकाणी नविन स्वयंचलित सिग्नल यंत्रणा बसविणेबाबत शहर वाहतुक नियंत्रण शाखा यांचे मार्फत मागणी आलेकामी कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ५०: गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय येथे वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके, दिवाळी अंक तसेच महानगरपालिकेच्या इतर विभागांना वृत्तपत्रे पुरवठादार अनिल भाऊसो सुर्यवंशी यांचेकडुन छापिल किमंतीवर घेणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ५१ : इचलकरंजी महानगरपालिका अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंन्सी (PMC) नियुक्त करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ५२ : टाकवडे वेस बौद्ध विहार येथील सांडपाणी उपसा केंद्रातील साचलेला गाळ काढण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक तयार करणे व निविदा प्रक्रीया राबविणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ५३ : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम २१ (२) नुसार इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे त्रयस्त एजन्सी मार्फत कर आकारणीचे मुल्यांकण करणेस व मिळकत धारकांना चतुर्थ वार्षिक कर आकारणीस अधिन राहुन मागणी बिले देणेस मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा. महासभा ठराव क्र. ७१ दि. २०/०५/२०२६ नुसार पुढील मिटींगसमोर सादर करणेबाबत झालेल्या निर्णयाचा विचार करणे.

विषय क्र. ५४ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील जैव व वैद्यकीय कचरा संकलन व प्रक्रिया करणेबाबतचा सद्या सुरु असलेला एस.एस. सर्विसेस जयसिंगपुर यांचा मक्ता रद्द करुन नव्याने निविदा मागविणेबाबत मा. सतिश वसंतराव मुळीक, सभापती, स्थायी समिती, मा. उदयसिंग मारुती पाटील, विरोधीपक्षनेता व मा. राजु संभाजी बोंद्रे, सदस्य यांनी मागणी केले कामी कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ५५ : महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान, नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना व साहित्य रत्न लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी सौर पथदिवे बसविणेकामी ठिकाणे निश्चित करणेबाबत.

विषय क्र. ५६ : इचलकरंजी महानगरपालिका रेकॉर्ड विभाग व विविध विभागाकडे जमा असणारे अ व ब वर्गातील कायमस्वरुपी अभिलेख व त्या अनुषंगिक सर्व प्रकारचे लेखे डिजीटल स्कॅनिंग करणेस मंजुरी मिळणेबाबत.

विषय क्र. ५७ : इचलकरंजी महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाकडे किटकजन्य आजार नियंत्रणासाठी रोगजंतुनाशके व औषधी द्रव्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत.

विषय क्र. ५८ : इचलकरंजी शहरातील मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणेसाठी स्तनदा मातांना बेबी किट वाटप उपक्रम राबविणेबाबत महिला व बालकल्याण समितीने केलेली शिफारस केली आहे तथापि मा. शासनामार्फत बेबी किट योजना राबविणेत येत आसलेने महापालिका स्तरावरुन नव्याने बेबी किट खरेदी करणेची आवश्यकता नसलेबाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

विषय क्र. ५९ : इचलकरंजी महानगरपालिका आरोग्य विभागाकडील सफाई कर्मचारी यांना आवश्यक असणारे ढकलगाडे खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत.

विषय क्र. ६० : इचलकरंजी महानगरपालिका आरोग्य विभागाकडील सफाई कर्मचारी यांना आवश्यक असनारे साहित्य रेट कॉन्टॅक्ट (RC) करुन भांडार विभागाकडुन आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत.

विषय क्र. ६१ : घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत रि. स. क्र. ६३८ येथील घनकचरा प्रक्रिया केंद्रावरील कचरा व्यवस्थापनासाठी नविन मक्तेदार यांची निवड होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात जे.सी.बी., पोकलेन, लोडर यांची आवश्यकता असलेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ६२ : राजाराम स्टेडीयम तिसरा मजला येथील आय एम फिट क्लब या फिटनेस क्लब साठी भाडेतत्वावर देणेत आलेल्या हॉलच्या टेरेसवर सोलर सिस्टीम बसविणेस व तिसऱ्या मजल्यापर्यंत लिफ्ट बसविणेस परवाणगी देणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ६३ : प्रभाग समिती कार्यालय अ च्या दि. २८/०४/२०२६ रोजी आयोजित सभेतील मा. महासभेकडे शिफारस करणेत आलेले ठराव.

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. ६४ : प्रभाग समिती कार्यालय ब च्या दि. १७/०४/२०२६ रोजी आयोजित सभेतील मा. महासभेकडे शिफारस करणेत आलेले ठराव.

विषय क्र. ६५ : प्रभाग समिती कार्यालय क च्या दि. २१/०५/२०२६ रोजी आयोजित सभेतील मा. महासभेकडे शिफारस करणेत आलेले ठराव.

विषय क्र. ६६ : प्रभाग समिती कार्यालय क च्या दि. १६/०४/२०२६ रोजी आयोजित सभेतील मा. महासभेकडे शिफारस करणेत आलेले ठराव.

विषय क्र. ६७ : मा. महापौर यांचे परवानगीने घेणेत येणारे ऐनवेळचे इतर विषय.

---

मा. महापौर, इचलकरंजी महानगरपालिका यांचे
दि. १७/०६/२०२६ चे आदेशानुसार.

( राहुल बा. पोटे )
प्र.नगरसचिव
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ८२
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी शिवतिर्थ नजिक असणाऱ्या जागेतील दुकाने हटवून सदर ठिकाणी शहर परिवहन ई-बस स्थानक करणेस मंजुरी मिळणेबाबत मा. परिवहन समिती ठराव क्र. ०३ दि. ३०/०३/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी शिवतिर्थ नजिक असणाऱ्या जागेतील दुकाने हटवून सदर ठिकाणी शहर परिवहन ई-बस स्थानक करणेस मंजुरी मिळणेबाबत मा. परिवहन समिती ठराव क्र. ०३ दि. ३०/०३/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस करणेत आलेली आहे.

तरी परिवहन समितीच्या शिफारसीनुसार ई-बस सेवेसाठी शिवतिर्थ नजिक असणाऱ्या जागेतील दुकाने हटवून सदर ठिकाणी शहर परिवहन ई-बस स्थानक करणेस मंजुरी देणेत येत आहे. सदर दुकान गाळ्यांचे पुनर्वसन महापालिकेच्या सद्या रिकाम्या असलेल्या दुकान गाळ्यांच्या ठिकाणी करणेत यावे.

सूचक : स. वि. गुळीक

अनुमोदक : ऊ. बा. कलगाते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०७
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ८३
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ३ : सोलगे मळा, शहापुर, गट न २३५ पार्ट २६०, गट नं २५७ येथे ई-बस डेपो विकसित करणे कामास मक्तेदार यांना दि. ३१/०८/२०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ दिलेबाबत मा. परिवहन समिती ठराव क्र. ०८ दि. ०९/०६/२०२६ मा. महासभेच्या अवलोकनार्थ सादर.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये परिवहन व्यवस्था निर्माण करणेकामी केंद्रशासन पुरस्कृत PM-E Bus सेवा योजने अंतर्गत एकूण २५ E-Buses करीता मंजूरी देणेत आली आहे. या कामामध्ये एकूण ०३ मुख्य कामे अंतर्भुत आहेत.

१. Civil Infrastructure
२. Electrical Infrastructure
३. Behind the Meter

यापैकी Civil Infrastructure च्या कामाकरीता प्रशासकीय मान्यतेस अनुसरून निविदा प्रक्रिया राबवून मक्तेदार जोतीराम बरगे यांना कार्यारंभ आदेश दिलेपासून १२ महिने म्हणजेच दि. १३/१०/२०२५ निश्चित करणेत आली होती. सदर मुदतीमध्ये पावसाळ्यामध्ये प्रत्यक्ष कामाच्या स्थळी पाणी साचून राहिल्याने तसेच सदर पाण्याचा निचरा नैसर्गिकरित्या न झाल्यामुळे मुदतीमध्ये काम रेंगाळले त्यामुळे वस्तुस्थिती पाहून संदर्भ क्र.०२ अन्वये दि. ३१/१२/२०२५ अखेर पर्यंत मक्तेदारास मुदतवाढ देणेत आली. सदरच्या मुदतीमध्ये कामाच्या ठिकाणी असणाऱ्या पाण्याचा निचरा करण्याकरीता गटर बांधणे तसेच याठिकाणी महावितरणाची असणारी उच्चदाब विजवाहिनी स्थलांतरीत करणे या कामांमुळे प्रत्यक्ष काम रखडले तसेच मक्तेदार यांनी कामास सुरूवात केलेनंतर याकामाचे परिवहन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी मुळ आराखड्यामध्ये बदल सुचविलेमुळे त्याप्रमाणे काम करणेस विलंब झाला आहे.

तसेच बसडेपो अंतर्गत असणाऱ्या सर्व सिमेंट कॉंक्रिटचे विशिष्ट डिझाईन करून घेणेबाबत या कामीचे बांधकामचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेमार्फत विलंब झालेने इ.म.न.पा. मार्फत शासनमान्य त्रयस्थ संस्था वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली यांचेमार्फत माती परिक्षण करून घेऊन त्याप्रमाणे डिझाईन तयार करून मान्यतेसाठी वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली यांचेकडे सादर केले. सदर डिझाईन करीता दि. ३०/०३/२०२६ रोजी मंजूरी देणेत आली आहे. तद्नंतर मक्तेदार यांनी कामास सुरूवात केली आहे. दरम्यानच्या मुदतीमध्ये मक्तेदार यांनी मुख्य इमारतीसमवेत अन्य सर्व इमारतींचे काम अंतिम टप्प्यात आणले आहे.

वरील सर्व वस्तुस्थिती पाहता मक्तेदार यांना सदरचे काम पुर्ण करणेकरीता आणखीन अवधी देणे आवश्यक आहे. सदरचे काम पुर्ण न झालेस तसेच अन्य मक्तेदार नेमून काम करावयाचे झाल्यास यामध्ये विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी शहरातील परिवहन व्यवस्था विहीत मुदतीमध्ये सुरू होणे व याकामी शासनाकडून मिळणारे अनुदान प्राप्त होणेस विलंब होणार आहे. या बाबत महानगरपालिकेचे प्रभारी शहर अभियंता यांनी सदरचे काम पूर्ण होणेसाठी आणखी तीन महिन्यांचा कालावधी लागेल अशी शिफारस दिली आहे.

त्यास अनुसरून परिवहन समितीने ठराव क्र. ०८ दि. ०९/०६/२०२६ नुसार सध्याचे मक्तेदार यांना दि. ३१/०८/२०२६ अखेर अंतिम मुदतवाढ देणेस मंजुरी दिली आहे,परिवहन समितीने मक्तेदार यांना मुदतवाढ दिलेबाबतचा निर्णय मा. महासभेच्या अवलोकनार्थ सादर केला आहे. त्यानुसार परिवहन समितीने दिलेली मुदतवाढ मंजुर करणेत येत आहे.

सूचक : स. व. मुळीक.

अनुमोदक : ती. बा. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ८४
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ४ : पी.एम. ई-बस सेवेकरीता ११/०.४३३ के.व्ही, १६०० के. व्ही. ए. ट्रान्सफॉर्मर उभा करणे अंतर्गत अनुषंगिक इलेक्ट्रीकल कामे करणे, हायमास्ट स्ट्रीट लाईट उभा करणे कामी मक्तेदार यांना सप्टेंबर २०२६ अखेर मुदतवाढ दिलेबाबत मा. परिवहन समिती ठराव क्र. ०९ दि. ०९/०६/२०२६ मा. महासभेच्या अवलोकनार्थ सादर.

**ठराव**

पी.एम. ई-बस सेवेकरीता ११/०.४३३ के.व्ही, १६०० के. व्ही. ए. ट्रान्सफॉर्मर उभा करणे अंतर्गत अनुषंगिक इलेक्ट्रीकल कामे करणे, हायमास्ट स्ट्रीट लाईट उभा करणेचे काम मक्तेदार – मे.तुषार इलेक्ट्रिकल्स यांना मंजुर आहे. सदर कामाची मुदत कार्यारंभ आदेश दि.०२/०९/२०२४ पासून १ वर्ष देणेत आलेली होती तथापि सदर मुदत संपुष्टात आलेने, सदर कामास मक्तेदार यांनी अर्ज देवून ६ महिने मुदतवाढ मागणी केलेली होती.

सदर कामामध्ये बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रिया राबवून सदर PM E-BUS करिता civil इन्फ्रास्ट्रक्चर उभा करणेचे काम हे मक्तेदार जोतीराम बरगे यांना देणेत आलेले आहे. सदर डेपो उभा करणेचे काम सुरु असून, सदर काम plinth level झालेले होते. सदर काम पूर्ण झालेशिवाय इलेक्ट्रिफिकेशनचे काम पूर्ण करता येत नव्हते. त्यावेळी कामाची वस्तुस्थिती पाहता, मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे दि.२२/०९/२०२५ रोजी सदर कामास मार्च २०२६ अखेर मुदत वाढ देणेत आलेली आहे.

सद्या याकामामधील ट्रान्सफॉर्मर उपलब्ध केला असून, उर्वरित अंतर्गत वायरिंगचे काम पूर्णत्वाकडे आहे.बांधकाम विभागामार्फत करणेत येणाऱ्या डेपोचे काम या कामाशी संलग्न असल्याने सदर कामास बांधकाम मार्फत नेमणेत आलेल्या मक्तेदारासमवेत मुदतवाढ देणे आवश्यक असलेने याकामी परिवहन समितीने ठराव क्र. ०९ दि. ०९/०६/२०२६ नुसार मक्तेदार यांना सप्टेंबर २०२६ अखेर मुदतवाढ देणेस मंजुरी दिली आहे,परिवहन समितीने मक्तेदार यांना मुदतवाढ दिलेबाबतचा निर्णय मा. महासभेच्या अवलोकनार्थ सादर केला आहे. त्यानुसार परिवहन समितीने दिलेली मुदतवाढ मंजुर करणेत येत आहे.

सूचक : स. व. मुळीक.

अनुमोदक : ता. बा. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ४५
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ५ : पी.एम. ई-बस डेपोच्या कामास अनुसरुन सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून तसेच कामामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी व उर्जा बचतीचे धोरण स्विकारण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करणेसाठी मा. शासनाकडुन निधी उपलब्ध होणेसाठी मा. शासनाकडे प्रस्ताव सा-दर करणेस मंजुरी मिळणेबावत मा. परिवहन समिती ठराव क्र. १० दि. ०९/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

## ठराव

पी.एम. ई-बस डेपोच्या कामास अनुसरुन सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून तसेच कामामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी व उर्जा बचतीचे धोरण स्विकारण्यासाठी खालील प्रमाणे सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे.

१. ई बस करिता शेड उभारणी करणे.
२. ई बस चार्जिंग स्टेशनकरिता ऊर्जा बचतीचे धोरण अवलंबण्यासाठी प्रस्तावित करण्यात येणाऱ्या शेड वर सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे.
३. डेपो सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सदर ठिकाणचा परिसर CCTV कक्षेत आणणेसाठी CCTV बसविणे.
४. कर्मचाऱ्यांसाठी पेयजल प्रकल्प उभारणे.
५. प्रस्तावित असणारे सर्व थांबे उभारणे.

सध्या इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत परिवहन संस्था नव्याने अस्तित्वात येत असून तसेच सध्याची इचलकरंजी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता वरील नमूद केलेली कामे ही महानगरपालिका स्वनिधी मधून करणे शक्य होणार नसलेने. या कामी शासनाकडे निधी उपलब्ध होणेकामी प्रस्ताव सादर करणेसाठी परिवहन समिती ठराव क्र. १० दि. ०९/०६/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी परिवहन समितीचे शिफारशीनुसार वरील प्रमाणे आवश्यक सुविधा निर्माण करणेसाठी निधी उपलब्ध करणेसाठीचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : Satish स.व. कुलीक

अनुमोदक : [signature] स. बा. कल्पनाते

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. ८६
दि. २५/०६/२०२६

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

विषय क्र. ६: इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना बेसिक ब्युटी पार्लर या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०३ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

## ठराव

इचलकरंजी शहरातील महिला व युवतींना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होण्यासाठी बेसिक ब्यूटी पार्लरचे मोफत प्रशिक्षण देणे बाबत. महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र ०३ दि. २९/०४/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार ६० ते १०० प्रशिक्षणार्थींची नोंदणी झाल्यास बेसिक ब्युटी पार्लर या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स.व. मुळीक

अनुमोदक : ता. बा. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ८७
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ७ : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना कराटे या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०४दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना कराटे या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र ०४ दि. २९/०४/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार ६० ते १०० प्रशिक्षणार्थींची नोंदणी झाल्यास कराटे या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स. व. मुल्लीक.

अनुमोदक : ता. बा. जेवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. ८८
दि. २५/०६/२०२६

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

विषय क्र. ८ : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना TALLY ADVANCE PRIME या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०५ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना TALLY ADVANCE PRIME या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र ०५ दि. २९/०४/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार ६० ते १०० प्रशिक्षणार्थींची नोंदणी झाल्यास TALLY ADVANCE PRIME या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स. व. मुळीक.

अनुमोदक : ता. बा. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. ८९
दि. २५/०६/२०२६

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

विषय क्र. ९ : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना आरीवर्क या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०६ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना आरीवर्क या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र ०६ दि. २९/०४/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार ६० ते १०० प्रशिक्षणार्थींची नोंदणी झाल्यास आरीवर्क या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स. व. मुळीक.

अनुमोदक : ता. बा. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६ | ठराव क्र. ९०
सर्वसाधारण सभा | दि. २५/०६/२०२६

विषय क्र. १० : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना नेलआर्ट या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०७ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना नेलआर्ट या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र ०७ दि. २९/०४/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार ६० ते १०० प्रशिक्षणार्थींची नोंदणी झाल्यास नेलआर्ट या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स. व. भुळीक.

अनुमोदक : ता. बा. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ८९
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ११ : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना ज्वेलरी मेकिंग या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०८ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना ज्वेलरी मेकिंग या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र ०८ दि. २९/०४/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार ६० ते १०० प्रशिक्षणार्थींची नोंदणी झाल्यास ज्वेलरी मेकिंग या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स.व.मुल्लीक.

अनुमोदक : ता.बा.पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६ ठराव क्र. ८२

सर्वसाधारण सभा दि. २५/०६/२०२६

विषय क्र. १२ : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना बेसिक फैशन डीझयानिंग या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ०९ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना बेसिक फैशन डीझयानिंग या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र ०९ दि. २९/०४/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार ६० ते १०० प्रशिक्षणार्थींची नोंदणी झाल्यास बेसिक फैशन डीझयानिंग या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स.ब. मुळीक.

अनुमोदक : ना.बा. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९३
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. १३ : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींच्या आरोग्याच्या दृष्टीने योग या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र १० दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना योग प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र १० दि. २९/०४/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार ६० ते १०० प्रशिक्षणार्थींची नोंदणी झाल्यास योग प्रशिक्षण देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स.व.कुळीक.

अनुमोदक : ता.बा.पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५ ठराव क्र. ९४

सर्वसाधारण सभा दि. २५/०६/२०२६

विषय क्र. १४ : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना लाठी-काठी या कोर्सचे प्रशिक्षण देणेबाबतचा प्रस्ताव नामंजुर करणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र ११ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना लाठी-काठी या कोर्सचे प्रशिक्षण देणेबाबत सौ. स्नेहल दिपक रावळ, सदस्या यांनी मागणी केली होती. महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र ११ दि. २९/०४/२०२६ नुसार सदर प्रस्ताव नामंजुर करणेबाबत मा. महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार लाठी-काठी प्रशिक्षण देणेबाबतचा प्रस्ताव नामंजुर करणेत येत आहे.

सूचक : स. ब. मुळीक.

अनुमोदक : ता. बी. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९५
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. १५ : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना स्पोकन इंग्लिश या कोर्सचे प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र १३ दि. २९/०४/२०२६ नुसार आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य महिला व युवतींना स्पोकन इंग्लिश प्रशिक्षण देणेस मंजुरी मिळणेबाबत महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र १३ दि. २९/०४/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार ६० ते १०० प्रशिक्षणार्थींची नोंदणी झाल्यास स्पोकन इंग्लिश प्रशिक्षण देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स. व. मुळीक.

अनुमोदक : ता. बा. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९६
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. १६ : इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य पिडीत, गरीब व गरजु महिला व युवतींना न्याय मिळणेसाठी नामांकित ३ तज्ञ स्त्री वकील व दोन तज्ञ पुरुष वकील यांची समुपदेशन करणेसाठी नियुक्ती करुन कायम स्वरुपी समुपदेशन केंद्रे सुरु करणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. १७ दि. १५/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस व इचलकरंजी शहरामध्ये महिलांसाठी समुपदेशन केंद्र सुरु करणेबाबत संवाद सामाजिक मंडळ यांनी दि. १९/०५/२०२६ रोजीचे पत्रानुसार मागणी केले कामी महानगरपालिकेमार्फत आवश्यक अटी शर्तींच्या अधिन राहुन महापालिका स्तरावर जागा उपलब्ध करुन देणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्वसामान्य महिला व युवतींना विविध कौटुंबिक, सामाजिक तसेच कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत योग्य कायदेशीर मार्गदर्शनाचा अभाव असल्यामुळे त्यांना न्याय मिळण्यात अडचणी येतात. त्यामुळे महिलांना सुलभ, त्वरित व विनामूल्य कायदेशीर सल्ला उपलब्ध करून देणेसाठी इचलकरंजी शहरात मोफत कायदेशीर सल्ला केंद्र (Law Counselling Centre) स्थापन करण्यात यावे. सदर केंद्रामध्ये नामांकित ३ तज्ञ स्त्री वकील व दोन तज्ञ पुरुष वकील यांच्या मार्फत महिलांना विविध कायद्यांबाबत मार्गदर्शन, तक्रार नोंदणीस सहाय्य तसेच आवश्यक ते समुपदेशन करणेबाबत महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र. १७ दि. १५/०५/२०२६ नुसार महिलांमध्ये कायद्याबाबत जनजागृती करण्यासाठी वेळोवेळी शिबिरे, कार्यशाळा व मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात यावे. सदर उपक्रम महिला व बालकल्याण विभागामार्फत किंवा संबंधित विभागामार्फत राबविण्यात यावा व त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्यात यावी अशी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक –एमयुएम-२०२१/प्र.क्र. ३८५/नवी-१७ दि.२९ मार्च २०२२ अन्वये" विवरणपत्र अ" जाणीव जागृती महिलांवरील अन्याय व अत्याचार दूर करून महिलांना योग्य न्याय मिळून देणे बाबत ही योजना शासन निर्णयानुसार कार्यान्वित आहेत.

सदर प्रस्तावामध्ये खालील बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत :-

१) महिलांसाठी मानसिक, सामाजिक व कौटुंबिक समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे.

२) पीडित, अत्याचारग्रस्त व गरजू महिलांना मार्गदर्शन व पुनर्वसन सहाय्य करणे.

३) किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य, शिक्षण व व्यक्तिमत्व विकास विषयक कार्यशाळा आयोजित करणे.

४) शाळा व महाविद्यालय स्तरावर समुपदेशन व जनजागृती कार्यक्रम राबविणे.

५) महिलांच्या सुरक्षितता, स्वावलंबन व सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविणे.

इचलकरंजी शहराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असून, महिलांच्या विविध समस्या व ताणतणाव लक्षात घेता अशा प्रकारचे समुपदेशन केंद्र शहरासाठी उपयुक्त व आवश्यक ठरणार आहे. सदर केंद्रामुळे महिलांना मानसिक आधार, कायदेशीर मार्गदर्शन, पुनर्वसन सहाय्य तसेच आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होणार आहे.महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात येत असून, त्या अनुषंगाने समुपदेशन केंद्र हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरू शकतो.

तसेच "संवाद सामाजिक मंडळ", इचलकरंजी यांनी इचलकरंजी शहरातील महिला व युवतींच्या मानसिक, सामाजिक, कौटुंबिक व शैक्षणिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी इचलकरंजी महानगरपालिकेच्या राजाराम स्टेडीयम मध्ये दुसऱ्या मजल्यावरील जागा महिला समुपदेशन केंद्र सुरू करण्यासाठी मागणी केली आहे.

"संवाद सामाजिक मंडळ, इचलकरंजी" ही संस्था मागील १८ वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व जनजागृती क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेमार्फत महिला सक्षमीकरण, बालक संरक्षण, शाळास्तरीय समुपदेशन, मानसिक आरोग्य जनजागृती, व्यसनमुक्ती अभियान, किशोरवयीन मार्गदर्शन इत्यादी उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.

वरील प्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता, महानगर पालिकेच कर्तव्य व संवाद सामाजिक मंडळाचा उद्देश एकच असलेने तसेच महानगरपालिकेच्या महीला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार या क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी व्यक्ती समुपदेशनासाठी विनामुल्य उपलब्ध करुन देणेची तयारी संवाद सामाजिक मंडळाने दर्शविली असलेने त्यासाठी महानगरपालिकेला कराव्या लागणा-या खर्चात बचत होवून महानगरपालिकेचे कर्तव्य देखील पूर्ण होणार आहे.

Scanned with OKEN Scanner

याचा विचार करता "संवाद सामाजिक मंडळ" इचलकरंजी यांना आवश्यक त्या अटी व शर्तींच्या अधीन राहून इचलकरंजी शहरातील सर्वसामान्य पिडीत, गरीब व गरजु महिला व युवतींना न्याय मिळणेसाठी तसेच महिला व युवतींच्या मानसिक, सामाजिक, कौटुंबिक व शैक्षणिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी "संवाद सामाजिक मंडळ",इचलकरंजी यांना महानगरपालिकेच्या राजाराम स्टेडीयम मध्ये महानगरपालिकेच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून दुसऱ्या मजल्यावरील भुमी अभिलेख कार्यालयासमोरील कामगार कार्यालयाचा रिकामा झालेला संपुर्ण गाळा विनामुल्य महिला समुपदेशन केंद्र सुरू करण्यासाठी देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स. व. गुळीक

अनुमोदक : सु. बा. कलागते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९७
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. १७: इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळांमध्ये वाढीव वर्ग खोल्यांच्या बांधकामास मंजुरी मिळणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. १२ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या शाळा मधील मुख्याध्यापकांनी वाढत्या पटसंख्येच्या अनुषंगाने अतिरिक्त वर्ग खोल्यांची मागणी केली आहे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसाठी व बैठक व्यवस्था सुलभ करण्यासाठी खालीलप्रमाणे नवीन खोल्यांचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे.

| | |
|---|---|
| * डॉ. सरोजिनी नायडू शाळा क्र. ४३:- | ०४ वर्ग खोल्या |
| * ए.पी.जे. अब्दुल कलाम विद्यामंदिर क्र. ५७:- | ०२ वर्ग खोल्या |
| * राणी लक्ष्मीबाई विद्यामंदिर क्र. १३:- | ०२ वर्ग खोल्या |
| * हुतात्मा बाबू गेनू विद्यामंदिर क्र. २८:- | ०३ वर्ग खोल्या |
| * कै. बाबुराव आवाडे विद्यामंदिर क्र.५१ :- | ०२ वर्ग खोल्या |
| * कै. पु. बा. सुभेदारकाका विद्यामंदिर क्र. ४८ :- | ०२ वर्ग खोल्या |

सदर कामासाठी येणारा खर्च सन २०२६–२७ या आर्थिक वर्षातील शालांतर्गत अनुदान या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येईल.

सदर कामाचे सविस्तर आरखडे व तांत्रिक अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. हे काम तांत्रिक स्वरूपाचे असल्याने सदर प्रस्ताव शहर अभियंता, बांधकाम विभाग यांच्याकडे वर्ग करून शाळा खोल्यांचे बांधकाम करून घेणे उचित राहील. अशी शिफारस शिक्षण समितीने केली आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिकेच्या वरील प्रमाणे नमुद प्राथमिक शाळांमध्ये वाढीव वर्ग खोल्यांच्या बांधकामास मंजुरी देणेत येत असुन सदरचे काम संबधित विभागाकडुन करुन घेणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि. पुं. चोपडे

अनुमोदक : म. भि. हिंगमिरे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६ | ठराव क्र. ९८
सर्वसाधारण सभा | दि. २५/०६/२०२६

विषय क्र. १८ : सन २०२६-२७ सालाकरीता इचलकरंजी महानगरपालिकेच्या गणवेश पात्र अधिकारी कर्मचारी यांना गणवेश वाटपाकरीता कापड खरेदीस मंजुरी देणेबावत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेकडील कार्यरत असलेल्या कायम सेवेतील अधिकारी कर्मचा-यांना गणवेश देणे बाबत जनरल कामगार संघ (इंटक) इचलकरंजी यांनी मा. महापौरसो व मा. आयुक्तसो यांचेकडे संघटनेने निवेदनद्वारे मागणी केलेली आहे.

तत्कालीन नगरपालिकेकडील अधिकारी / कर्मचारी यांना गणवेश पुरविणे संबंधी उपविधी दुरुस्ती जाहीरनामा दि. २ ऑक्टोबर १९८० चे आदेशाने मंजूर करणेत आला आहे. त्याप्रमाणे मंजूर उपविधीनुसार अधिकारी कर्मचारी यांना दर दोन वर्षातून गणवेश देणेबाबत तरतूद आहे. तसेच सन २०२३-२४ साली इचलकरंजी महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र. ६१/२०२३ दि. १६/०१/२०२४ ने गणवेश वाटपाबाबत मान्यता मिळालेनुसार गणवेश वाटप करणेत आले आहे.

उपरोक्त मंजूर उपविधी नुसार दर दोन वर्षातून गणवेश देणेची तरतूद असलेने सद्या गणवेश वाटप करुन दोन वर्षे पुर्ण झाली असलेने चालू आर्थिक वर्ष सन २०२६-२७ करीता इचलकरंजी महानगरपालिकेकडील पात्र अधिकारी कर्मचारी यांना गणवेश देणेकरीता कायम सेवेत असणा-या पात्र महिला / पुरुष अधिकारी कर्मचा-यांची यादी आस्थापना व सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त करुन घेणेत आली आहे. त्याचा गोषवारा खालिल प्रमाणे.

| अ.क्र. | महिला अधिकारी / कर्मचारी | पुरुष अधिकारी / कर्मचारी | एकूण |
|---|---|---|---|
| १ | २३४ | ७०७ | ९४१ |

उपरोक्त प्रमाणे गणवेश पात्र (पुरुष व स्त्री ) अधिकारी / कर्मचारी असून म.न.पा. कर्मचारी कामगार युनियन यांचे मागणी प्रमाणे सन २०२३-२४ सालाकरीता प्रशासकीय ठराव क्र. ६१/२०२३ दि. १६/०१/२०२४ प्रमाणे खालिल प्रमाणे पदानुसार कापड देणेबाबत मान्यता देणेत आलेली होती.

| अ.क्र. | पद | कापड प्रकार | कापडाचा रंग | कापडाचे माप |
|---|---|---|---|---|
| १ | सफाई कामगार (पुरुष ) | टेरीकॉट | खाकी | ८ मी. ( ३ ड्रेस) |
| २ | सफाई कामगार (महिला) | सुती | सुती ९ वारी व ६ वारी निळी साडी व ब्लाऊज पीस | ६ साडी<br>६ ब्लॉऊज पीस |
| ३ | शिपाई | टेरीकॉट | १. कार्यालयीन कामकाज – पांढरा<br>२.फिरती करणारे - खाकी | ८ मी |
| ४ | वाहनचालक | टेरीकॉट | खाकी | ८ मी |
| ५ | फार्मासिस्ट, वॉर्डबॉय, वॉर्डबॉय कम् ड्रेसर | टेरीकॉट | पांढरा | ८ मी |
| ६ | मॅकेनिक असि. मॅकनिक, हेल्पर | टेरीकॉट | निळा | ८ मी |
| ७ | महिला शिपाई, चतुर्थ श्रेणीतील महिला (स.का. महिला वगळून) | टेरीकॉट | फेंट गुलाबी साडी | ३ साडी<br>३ ब्लॉऊज पीस |
| ८ | सॅनिटरी इन्स्पेक्टर | टेरीकॉट | पांढरा शर्ट / नेव्ही ब्ल्यु पँट | ८ मी |
| ९ | अग्निशमन अधिकारी | टेरीकॉट | पांढरा शर्ट / नेव्ही ब्ल्यु पँट | ८ मी |
| १० | फायरमन, सहा. फायरमन | टेरीकॉट | स्काय ब्लु शर्ट / नेव्ही ब्ल्यु पँट | ८ मी |
| ११ | अ.क्र. १ ते १० मधून राहिलेले चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्ग (पुरुष) | टेरीकॉट | खाकी | ८ मी |

Scanned with OKEN Scanner

वरील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी यांना गणवेश देणेकामी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता म.न.पा. नोकर ड्रेस गणवेश इ. या लेखाशिर्षावर र.रु. ५० लाख रुपयांची तरतूद करणेत आलेली आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन परित्रक क्रमांक भांखस-२०१९/प्र.क्र.३६/उद्योग-४ . १७ सप्टेंबर. २०१९ नुसार उद्योग विभागाच्या दि. १.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात सुधारित खरेदी धोरण लागू करण्यात आले आहे व यातील तरतूदी शासनाच्या अधिपत्याखालील विविध विभागांना खरेदी प्रक्रीयेचा अवलंब बंधनकारक करणेत आलेल्या आहेत. त्यानुसार सदर कापड खरेदी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळामार्फत त्यांच्या माध्यमातून विहीत प्रक्रियेच्या अधीन राहून शासनाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग / कार्यालय देऊ शकतील असा शासन आदेश आहे.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडे कापड उपलब्ध असलेस यंत्रमाग महामंडळाकडून खरेदी करणेस मान्यता मिळणेस अन्यथा कापड स्पेशिफिकेशन नसल्यास खुल्या बाजारातील दरपत्रक मागवुन अंदाजपत्रक तयार करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी सन २०२६-२७ सालाकरीता इचलकरंजी महानगरपालिकेच्या गणवेश पात्र अधिकारी कर्मचारी यांना गणवेश वाटपाकरीता प्रस्तावित स्पेशिफिकेशन प्रमाणे महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडे कापड उपलब्ध असलेस यंत्रमाग महामंडळाकडून तयार गणवेश खरेदी करुन ते महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांना पुरविणे यासह अंदाजपत्रक तयार करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स. व. मुळीक

अनुमोदक : O.R. Surve ओं. रा. सुर्वे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. ९९
दि. २५/०६/२०२६

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

विषय क्र. १९ : इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली व इयत्ता दुसरीच्या विद्यार्थी विद्यार्थीनींकरीता बेंच पुरविणेस मंजुरी देणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. २ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागाकडे २५ मराठी माध्यमाच्या व ८ उर्दू माध्यमाच्या अशा एकूण ३३ प्राथमिक शाळा असून इ.१ ली ते ८ वी मध्ये एकूण ६८५१ विद्यार्थी विद्यार्थिनी आहेत .

शिक्षण विभागाकडील इ.३ री ,५ वी वी च्या विद्यार्थी –विद्यार्थिनी करिता यापूर्वी बेंच वितरीत करणेत आलेले आहेत .जून २०२६ पासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होत असून इ.१ ली,२ री च्या विद्यार्थी विद्यार्थिनीना किमान ९०६ बेंच ची आवश्यकता आहे .

इ.१ ली,२ री च्या विद्यार्थी विद्यार्थिनीना लागणारे ९०६ बेंच G.E.M. पोर्टल वरून खरेदी करणे योग्य राहील . याकामी येणारा खर्च सन २०२६-२७ या अर्थ संकल्प वर्षातील शालांतर्गत अनुदान या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात यावा तसेच उपलब्ध निधीसाठी आवश्यकता असल्यास विभागांतर्गत बजेट वर्गीकरण करुन पुढील कार्यवाही भांडार विभागाकडून राबविणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली व इयत्ता दुसरीच्या विद्यार्थी विद्यार्थीनींकरीता ९०६ बेंच G.E.M. पोर्टल वरून खरेदी करुन पुरविणेस मंजुरी देणेत येत असुन सदरची कार्यवाही संबधीत विभागाकडुन करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ता. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. मुळीक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

ठराव क्र. ७०० (hand-written number)
दि. २५/०६/२०२६

मा. महासभा क्र. ०५ (hand-written number)
सर्वसाधारण सभा

विषय क्र. २० : इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनींकरीता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता शैक्षणिक साहित्य पुरविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ३ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

## ठराव

महानगरपालिका शिक्षण विभागाअंतर्गत येणाऱ्या प्राथमिक शाळांकडुन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता आवश्यक शालेय साहित्याची मुख्याध्यापकांकडून मागणी प्राप्त झाली आहे.
सदर शालेय साहित्य खरेदीसाठी येणारा अपेक्षित खर्च शिक्षण विभागाच्या सन २०२६-२७ च्या शालांतर्गत अनुदान निधीच्या रु. ७,०५,००,०००/- यामधुन करणे शक्य आहे.
सदर शैक्षणिक साहित्य खरेदी भांडार विभागाकडुन करणेबाबत शिक्षण समितीने महासभेकडे शिफारस केली आहे.
शिक्षण समिती मार्फत करणेत आलेल्या शिफारसीमध्ये खालील बदल करून खालील प्रमाणे शैक्षणिक साहित्यापैकी सुपर रेन वेअर रेनकोट हे महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडुन खरेदी करणेस व उर्वरीत शैक्षणिक साहित्य संबंधित विभागाकडून खरेदी करणेस मंजुरी देणेत येत आहे.

| १ ली व २ री | एक रेघी वही १७२ पानी | दोन रेघी वही १७२ पानी | चार रेघी वही १७२ पानी | चौकट वही १७२ पानी | चित्रकला वही ३६ पानी | तेलकट खडू (कॅमल) | सॅन्डल | बेल्ट | संचिका (इ.१ ली साठी) | मिल्टन बॉटल | रेनकोट | प्रति किट किंमत | १ ली २ री एकूण पट | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वाटप साहित्य संख्या | २ नग | २ नग | २ नग | २ नग | २ नग | १ नग | १ जोडी | १ जोडी | १ नग | १ नग | १ नग | | | |
| प्रति नग किंमत | ४० | ४० | ४० | ४० | ३४ | ९.९ | ४३९ | २५ | १३ | ३४५ | ६०० | | | |
| एकूण अंदाजे रक्कम रक्कम | ८० | ८० | ८० | ८० | ६८ | ९.९ | ४३९ | २५ | १३ | ३४५ | ६०० | १८१९.९ | १३३४ | २४२७७४६.६ |

| ३ री व ४ थी | एक रेघी वही १७२ पानी | चार रेघी वही १७२ पानी | चित्रकला वही ३६ पानी | तेलकट खडू कॅमेल | पॅड | कंपास | बेल्ट | सॅन्डल | शिष्यवृत्ती मार्गदर्शिका (इ. ४ थी फक्त) | मिल्टन बॉटल | रेनकोट | प्रति किट किंमत | ३ री व ४ थी एकूण पट | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वाटप साहित्य संख्या | २ नग | २ नग | २ नग | १ नग | १ नग | १ नग | १ नग | १ जोडी | भाग १ व २(१ संच) | १ नग | १ नग | | | |
| प्रति नग किंमत | ४० | ४० | ३४ | ९.९ | ८९ | १४८ | २५ | ४३९ | ५३४ | ३४५ | ६०० | | | |
| एकूण अंदाजे रक्कम रक्कम | ८० | ८० | ८० | ९.९ | ८९ | १४८ | २५ | ४३९ | ५३४ | ३४५ | ६०० | २४२९.९ | १७९६ | ४३६४१००.४ |

Scanned with OKEN Scanner

| ५ वी ते ८ वी | ए ४ साईज १७२ पानी नोट बुक | कंपास | चित्रकला वही ३६ पानी | पॅड | बेल्ट | सॅन्डल | कलर बॉटल कॅमेल 14 शेड (१ सेट) | शिष्यवृत्ती मार्गदर्शिका (इ. ७ वी फक्त) | NMMS भाग १ व भाग २ | मिल्टन बॉटल | रेनकोट | प्रति किट किंमत | ५ वी ते ८ वी एकूण पट | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वाटप साहित्य संख्या | ४ नग | १ नग | २ नग | १ नग | १ नग | १ नग | १ नग | १ संच | १ संच | १ नग | १ नग | | | |
| प्रति नग किंमत | ७९ | १४८ | ३४ | ८९ | २५ | ४३९ | १६६ | ५३४ | ४८४ | ३४५ | ६०० | | | |
| एकूण अंदाजे रक्कम रक्कम | १५८ | १४८ | ६८ | ८९ | २५ | ४३९ | १६६ | ५३४ | ४८४ | ३४५ | ६०० | ३०५६ | ३१५० | ९६२६४०० |

तसेच महानगरपालिका शिक्षण विभागाकडील शाळांना खालिल प्रमाणे स्टेशनरी साहीत्य देणेसही मंजुरी देणेत येत आहे.

| अ.क्र. | साहीत्य | नग | अंदाजे दर |
|---|---|---|---|
| १ | बॉक्स फाईल | १९८ | ११० |
| २ | साधी फाईल | ७२ | २३ |
| ३ | प्रोसिडिंग वही | ३३ | १८० |
| ४ | मोठे लेझर रजिस्टर | ३३ | २३० |
| ५ | शाळा सोडल्याचा दाखला बुक | ३९ | ११८ |
| ६ | पोषण आहार रजिस्टर (१ संच) | ३३ | २४० |
| ७ | शाळेत दाखल नमुना बुक | ४२ | १५५ |
| ८ | A 4 साईज पेपर | २६४ | ३०१ |
| ९ | डिंक बाटली ५०० मिली. | ३३ | ७२ |
| १० | स्टेपलर मोठी साईज | ३३ | १९५ |
| ११ | पंचिंग मशीन | ३३ | ११० |
| १२ | कमलिन मार्कर पेन | ३३ | २७ |
| १३ | स्टंप पड मोठी साईज | ३३ | ८२ |

| अ.क्र. | साहीत्य | नग | अंदाजे दर |
|---|---|---|---|
| १४ | कात्री (मोठी ) | ३३ | १६० |
| १५ | जावक रजिस्टर | ३३ | २०० |
| १६ | वोनाफाईड सर्टीफीकेट | ४९ | २०० |

सूचक : वि. पु. चोपडे

अनुमोदक : स. ब. मुल्लीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. 909
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. २१ : इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी सायकल वाटप योजना राबविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ४ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

उपरोक्त विषयास अनुसरून इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या विविध प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता ५ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अंदाजे १००० (एक हजार) इतकी आहे. विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढविणे, लांब अंतरावरून येणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवास सुलभ करणे आणि 'शाळा गळती' (Dropout) रोखणे या उदात्त हेतूने विद्यार्थ्यांना सायकल वाटप करणेस व सदर कामी भांडार विभागास आवश्यक ती प्रशासकीय व खरेदीची कार्यवाही करणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

सदर योजना यशस्वीरीत्या राबविण्यासाठी सर्व शाळांमधील पात्र विद्यार्थ्यांची यादी (नाव, आधार क्रमांक, पत्ता इ.) शिक्षण विभागामार्फत संकलित व प्रमाणित करणेत येईल.

सदर सायकल खरेदीसाठी लागणारा आवश्यक खर्च शिक्षण विभागाच्या सन २०२६-२७ मधील मंजूर शालांतर्गत अनुदान निधीतुन करण्यात येईल.

शिक्षण विभागाकडून प्राप्त मागणीनुसार, सायकलींची तांत्रिक गुणवत्ता (Specification) निश्चित करून प्रचलित खरेदी प्रक्रिया नियमांनुसार भांडार विभागामार्फत राबविण्यात येईल. पुरवठादाराकडून सायकली शाळांना प्राप्त झाल्यानंतर त्यांची नोंद साठा नोंदवहीत करून, मुख्याध्यापका मार्फत विद्यार्थ्यांना वितरण करतील तसेच इयत्ता ५ वी मध्ये सायकल घेणारे विद्यार्थ्यां इयत्ता ७ वी त्याच शाळेत शिकत असणे अनिवार्य आहे विद्यार्थी शाळा सोडून गेला तर सायकल परत घेण्याची जबाबदारी ही संबधित मुख्याध्यापक यांची राहील. याप्रमाणे शिक्षण समिती ठराव क्र. ४ नुसार शिफारस करणेत आली आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण समितीने केलेली शिफारस व कार्यपद्धतीनुसार महानगरपालिकेकडे असणारे उपलब्ध निधीनुसार प्रशासनाने सायकल वाटप योजना राबविणेस मंजुरी देणेत येत असुन सदरची कार्यवाही संबधित विभागाकडुन करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ना. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. 902
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. २२ : इचलकरंजी महानगरपालिकेच्या ३३ प्राथमिक शाळांसाठी स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करुण देणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ६ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

महानगरपालिका क्षेत्रातील ३३ प्राथमिक शाळां व छ.राजषी शाहू हायस्कूल मध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि स्वच्छता राखण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे .

शाळांमधील वर्ग खोल्या, शालेय परिसर ,व्हरांडा नियमित स्वच्छतेसाठी प्रत्येक शाळेला सकाळी १० ते ०५ या वेळेकरिता महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीमध्ये साफसफाई करिता स्वच्छता कर्मचारी आणि प्रसाधनगृहांच्या नियमित स्वच्छतेसाठी चार शाळे करिता १ एक स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करून देणेकामी शिक्षण विभागाच्या सन २०२६-२७ च्या शालांतर्गत अनुदान निधीतुन करणेत येईल.

सदरकामी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील ३३ प्राथमिक शाळां व राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल मध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि स्वच्छता राखण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभी करणेसाठी शाळांमधील वर्ग खोल्या व्हरांडा, शालेय परिसर, नियमित स्वच्छतेसाठी वर्गखोल्यांच्या संख्येनूसार प्रत्येक शाळेला सकाळी १० ते ०५ या वेळेकरिता एक स्वच्छता कर्मचारी आणि प्रसाधनगृहांच्या नियमित स्वच्छतेसाठी चार शाळे करिता १ एक स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करून देणेकामी शिक्षण विभागाच्या सन २०२६ -२७ च्या वार्षिक अर्थसंकल्पातील संबधित लेखाशिर्षातील उपलब्ध असलेल्या आर्थिक तरतुदीतून करणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. ०६ दि. १५/०४/२०२६ नुसार मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी महानगरपालिकेच्या ३३ प्राथमिक शाळा व राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल येथे वर्ग खोल्या, शालेय परिसर स्वच्छता, गवत काढणे, छत, व्हरांडा नियमित स्वच्छतेसाठी तसेच प्रसाधन गृहांच्या नियमित स्वच्छता या सर्व कार्यवाहीसाठी आवश्यक यंत्रणा (केअर टेकर) नेमणुकीसाठी अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेऊन पुढील कार्यवाही प्रस्तावीत करणेस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच सदर कामी प्राथमिक शाळासाठी वेगळी निविदा प्रक्रिया व रा. छ. शाहु हायस्कुलसाठी वेगळी निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

सूचक : ता. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. कुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६ | ठराव क्र. 903
सर्वसाधारण सभा | दि. २५/०६/२०२६

विषय क्र. २३ : इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये स्लॅब गळती रोकणेसाठी नवीन पत्रे बसवुन छत दुरुस्ती करणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ७ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

## ठराव

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत असलेल्या शाळा मुख्याध्यापकांनी शाळांमधील स्लॅब गळती च्या दुरुस्तीची मागणी केली आहे. शाळा इमारतीच्या स्लॅबमुळे शालेय अभिलेख, शैक्षणिक साहित्य व फर्निचरचे नुकसान होत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

शाळांच्या छतावर पावसाचे पाणी साचून राहिल्याने गळतीची समस्या कायम आहे. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून स्लॅबवर गॅल्वनाइज्ड (GI) पत्र्यांचे आच्छादन बसविणे तांत्रिकदृष्ट्या अधिक श्रेयस्कर ठरेल. यामुळे पावसाचे पाणी थेट स्लॅबवर न पडता बाहेर वाहून जाईल व इमारतीचे आयुष्यमान वाढण्यास मदत होईल.

सदर दुरुस्ती कामासाठी लागणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करण्यात येईल.

मनपा शाळा मुख्याध्यापकाकडून प्राप्त प्रस्ताव नुसार खालील शाळेमधील छत दुरुस्ती कामाचे स्वरूप खालीलप्रमाणे प्रस्तावित आहे-

| | | |
|---|---|---|
| १. | प. बाळकृष्ण वि. म. क्र. ७: | छत गळती काढणे. |
| २. | आनंदीबाई कर्वे वि. म. क्र. १०: | छत गळती काढणे. |
| ३. | इ. अब्दुल हमीद वि. म. क्र. १४: | वर्ग खोल्या व व्हरांडा गळती दुरुस्ती. |
| ४. | सरदार वल्लभभाई पटेल वि. म. क्र. १५: | छत गळती काढणे. |
| ५. | पद्मावती कन्या वि. म. क्र. १७: | पहिल्या मजल्यावरील खोली क्र. १ व २ छत गळती काढणे. |
| ६. | डॉ. झाकीर हुसेन वि. म. क्र. १९: | वर्ग खोल्या गळती काढून मिळणे. |
| ७. | भारतमाता वि. म. क्र. ३३: | वर्ग खोल्या व व्हरांडा गळती दुरुस्ती. |
| ८. | छ. संभाजी वि. म. क्र. ३५: | वर्ग खोल्या व व्हरांडा गळती दुरुस्ती. |
| ९. | कस्तुरबा गांधी वि. म. क्र. ३८: | पूर्वेकडून दक्षिणेची ४ थी खोली गळती काढणे. |
| १०. | डॉ. सरोजिनी नायडू वि. म. क्र. ४३: | दोन वर्ग खोल्यांची गळती काढणे. |
| ११. | फक्रुद्दीन अली अहमद वि. म. क्र. ५२: | वर्ग खोल्यांची गळती काढणे. |
| १२. | शाहीर अमरशेख उर्दू वि. म. क्र. ५६: | छत गळती काढणे. |
| १३. | पं. जवाहरलाल नेहरू बि. म. क्र. २४: | छत गळती काढणे. |

आगामी पावसाळा विचारात घेता, शाळांच्या इमारतींचे संरक्षण व विद्यार्थ्यांची सुरक्षितता इ. विचार होवून सदरकामी बांधकाम विभागास आवश्यक ती प्रशासकीय तांत्रिक व दुरुस्ती विषयक कार्यवाही करणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये स्लॅब गळती रोखणेसाठी आवश्यक कार्यवाही संबधीत विभागाकडुन करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ना. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. मुळीक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६ | ठराव क्र. १०४
सर्वसाधारण सभा | दि. २५/०६/२०२६

विषय क्र. २४ : इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते आठवी मधील ६८०० विद्यार्थी विद्यार्थीनींना स्पोर्टस ट्रॅकसुट्स पुरविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ८ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

## ठराव

इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते आठवी मधील ६८०० विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक सर्वांगीण विकासास चालना मिळावी. तसेच जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय शालेय शासकीय क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग वाढावा त्याप्रमाणे शालेय स्तरावर एकसमान वेशभूषा निर्माण व्हावी या उद्देशाने सर्व विद्यार्थ्यांना टी शर्ट व लोअर (स्पोर्टस किट), सँडल उपलब्ध करून देणे आवश्यक आहे .

सदर खरेदी प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांची वैयक्तिक मोजमापे घेणे, निश्चित तांत्रिक तपशीलानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणे व निवड झालेल्या पुरवठादारामार्फत निर्धारित कालावधीत टी शर्ट व लोअर (स्पोर्टस किट), सँडल पुरवठा करून वितरण करणे यांचा समावेश राहील.

सन २०२६-२७ माध्यमिक शालांतर्गत बजेट हेडच्या अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु. ६५,००,०००/- ची तरतूद मंजूर असून सदर कामी येणाऱ्या अंदाजित खर्चास व प्रशासकीय कार्यवाही महानगरपालिकेच्या भांडार विभागामार्फत विहित कार्यपद्धतीनुसार पूर्ण करण्यास कार्यवाही करणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते आठवी मधील ६८०० विद्यार्थी विद्यार्थीनींना महानगरपालिकेकडे असणारे उपलब्ध निधीनुसार प्रशासनाने स्पोर्टस ट्रॅकसुट्स पुरविणेस मंजुरी देणेत येत असुन, सदरची खरेदी कार्यवाही संबधित विभागाकडुन करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : [signature] ना. बा. पोवार.

अनुमोदक : [signature] स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १०५
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. २५ : इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळांमधील स्वच्छतागृह दुरुस्ती व नवीन स्वच्छतागृह बांधकामासाठी मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ०९ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या खालील १५ प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांकडून स्वच्छतागृहांच्या दुरुस्ती व नवीन स्वच्छतागृहे बांधकामाचे एकूण १५ शाळांकडून विविध कामांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत यामध्ये प्रामुख्याने मुला-मुलींच्या स्वच्छतागृहांची दुरुस्ती, नवीन शौचालय बांधकाम, वॉश बेसिन बसवणे आणि युरीनल्स बांधणे या कामांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या आणि स्वच्छतेच्या दृष्टीने शाळांमध्ये सुसज्ज व कार्यान्वित स्वच्छतागृहे असणे अनिवार्य आहे. काही शाळांमध्ये जुन्या स्वच्छतागृहांची पडझड झाली असून, काही ठिकाणी विद्यार्थी संख्येनुसार नवीन स्वच्छतागृह बांधकामाची आवश्यकता आहे.
शाळांची नावे व प्रस्तावित कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

**A- बांधकाम-**

| | |
|---|---|
| १. इ. अब्दुल हमीद वि.म. क्र. १४- | मुलांचे स्वच्छतागृह व मुतारी बांधणे. |
| २. प. मोतीलाल नेहरू वि.म. क्र. -३६ | मुलींचे स्वच्छतागृह बांधणे. |
| ३. कस्तुरबा गांधी वि.म. क्र. - ३८ | मुलांचे शौचालय बांधणे. |
| ४. छ. संभाजी वि.म. क्र. ३५ - | शौचालय बांधकाम. |
| ५. राणी लक्ष्मीबाई वि.म. क्र. — १३ | स्वच्छतागृह बांधकाम. |
| ६. ए. पी. जे. अब्दुल कलाम उर्दू क्र. — ५७ | मुलांचे स्वच्छतागृह व मुतारी बांधणे. |
| ७. के. वेणूताई यशवंतराव चव्हाण क्र. - ५४- | मुलांचे शौचालय बांधणे. |
| ८. डॉ. सरोजनी नायडू वि.म. क्र. ४२ | मुलांचे स्वच्छतागृह बांधून मिळणेबाबत. |
| ९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उर्दू वि.म. - ३ | मुलांचे स्वच्छतागृह बांधून मिळणेबाबत. |
| १०. अहिल्याबाई होळकर वि.म. क्र. ३० - | मुलांचे स्वच्छतागृह बांधून मिळणेबाबत. |
| ११. हु. बाबू गेनू वि. म. क्र. २८ - | मुलांचे स्वच्छतागृह बांधून मिळणेबाबत. |
| १२.पं. जवाहरलाल नेहरू विद्यामंदिर क्र. २४ - | स्वच्छतागृह बांधकाम |

**B-दुरुस्ती-**

| | |
|---|---|
| १. सरदार वल्लभभाई पटेल वि.म. क्र. १५ | मुलांचे स्वच्छतागृह दुरुस्ती. |
| २. भारतमाता वि.म. क्र. - ३३ | स्वच्छतागृह दुरुस्ती |
| ३. पंडित बाळकृष्ण वि.म. क्र. ७ - | स्वच्छतागृह दुरुस्ती |
| ४. फक्रुद्दीन अली अहमद वि.म. क्र. ५२ - | स्वच्छतागृह दुरुस्त करून वॉश बेसीन बसवणे. |

वरील प्रमाणे शिक्षण समितीने स्वच्छतागृह बांधकाम व दुरुस्ती करुन मिळणेबाबत शिफारस केली आहे. तथापि वरील नमूद शाळांमध्ये स्वच्छतागृह बांधकाम व दुरुस्तीसह अहिल्याबाई होळकर वि.ग. क्र. ३० येथे मुलींसाठीही स्वच्छतागृह बांधकाम करणे आवश्यक असलेने अहिल्याबाई होळकर वि.म. क्र. ३० येथे मुलींसाठी स्वच्छतागृह बांधकामासह बांधकाम विभागाकडून आवश्यक ती प्रशासकीय तांत्रिक व दुरुस्ती, नवीन बांधकाम करणे याप्रमाणे कार्यवाही करणेसह मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि. पुं. चोपडे

अनुमोदक : म. कि. शिंगाडे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १०६
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. २६ : इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळेंसाठी संरक्षण भिंत बांधणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १० दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागाकडील शाळा मुख्याध्यापकाकडून प्राप्त प्रस्तावांनुसार, खालील शाळांमध्ये संरक्षण भिंत बांधकामाची आवश्यकता आहे:

१. फक्रुद्दीन अली अहमद विद्यामंदिर क्र. ५२ च्या शाळेची संरक्षण भिंत बांधणे.
२. पंडित बाळकृष्ण विद्यामंदिर क्र. ७ येथे जुनी भिंत दुरुस्त करून नवीन दगडी भिंत बांधणे.
३. आनंदीबाई कर्वे विद्यामंदिर क्र. १० च्या शाळेची संरक्षण भिंत बांधणे.
४. शाहिर अमरशेख उर्दू विद्यामंदिर क्र. ५६ च्या शाळेची संरक्षण भिंत बांधणे.
५. ए.पी.जे. अब्दुल कलाम विद्यामंदिर क्र. ५७ च्या शाळेची संरक्षण भिंत बांधणे.
६. सरदार वल्लभभाई पटेल विद्यामंदिर क्र. १५ शाळेची संरक्षण भिंत बांधणे.

शाळेतील विद्यार्थ्यांचे बाहेरील वाहतुकीपासून संरक्षण करणे, शाळा परिसराची सुरक्षितता राखणे आणि शाळा मालमत्तेवरील अतिक्रमण रोखणे या दृष्टीने 'संरक्षण भिंत' आणि 'दगडी भिंत' बांधण्याची कामे प्राधान्याने करणे गरजेचे आहे.

सदर कामी बांधकाम विभागास आवश्यक ती प्रशासकीय तांत्रिक व संरक्षम भिंत बाधकाम कार्यवाही करणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळेंसाठी संरक्षण भिंत बांधणेस मंजुरी देणेत येत असुन सदरची कार्यवाही बांधकाम विभागाकडुन करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि. पुं. चोपडे

अनुमोदक : क. मि. हिंगमिरे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १०७
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. २७: इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळांमधील CCTV CAMERA ची वार्षिक देखभाल दुरुस्ती संगणक विभागामार्फत करणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. ११ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत असलेल्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि शालेय मालमत्तेचे संरक्षण या उद्देशाने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत तांत्रिक बिघाडामुळे काही शाळांमधील कॅमेरे बंद अवस्थेत असून, संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित ठेवण्यासाठी नियमित देखभालीची (Maintenance) नितांत आवश्यकता आहे. सदर CCTV नियंत्रण हे सबंधित शाळेतील मुख्याध्यापकयांचे कडे असणे आवश्यक आहे

वेळोवेळी दुरुस्ती करण्याऐवजी संपूर्ण प्रणालीचा 'वार्षिक देखभाल करार' (Annual Maintenance Contract - AMC) करणे तांत्रिकदृष्ट्या सोयीचे ठरेल. यामध्ये खालील बाबींचा समावेश राहील:

* सर्व कॅमेऱ्यांची नियमित तपासणी व सर्व्हिसिंग.
* रेकॉर्डिंग (NVR/DVR) प्रणालीची सातत्यपूर्ण पडताळणी.
* नादुरुस्त सुटे भाग (Spares) बदलणे आणि केबलिंगची दुरुस्ती .

सदर काम तांत्रिक स्वरूपाचे असल्याने, संगणक विभाग (Computer Department) मार्फत बाह्य तांत्रिक एजन्सीची नियुक्ती करून ही कार्यवाही पूर्ण करणे प्रस्तावित आहे. संगणक विभागाच्या तांत्रिक पर्यवेक्षणाखाली ही यंत्रणा वर्षभर अखंडितपणे कार्यरत राहील.

सदर वार्षिक देखभाल करारासाठी (AMC) लागणारा अंदाजित खर्च सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षातील शालांतर्गत मंजुर निधीतून संगणक विभागाकडून करण्यात येईल. सदरकामी संगणक विभागाकडून आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळांमधील CCTV CAMERA ची वार्षिक देखभाल दुरुस्ती Comprehensive AMC (Annual Maintenance Contract) म्हणजे उपकरणांची संपूर्ण देखभाल व दुरुस्तीचा करार, ज्यामध्ये सर्व्हिस, मजुरी आणि करारातील अटींनुसार स्पेअर पार्ट्सची बदलणी यांचा समावेश यासह करणेस मंजुरी देणेत येत असुन सदरची कार्यवाही संबधित विभागाकडून करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ना. बा. पोवार

अनुमोदक : स. व. मुल्लीक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९०८
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. २८ : इचलकरंजी महानगरपालिका नमुद प्राथमिक शाळांमधील वाढीव वर्गखोल्यांच्या बांधकामास मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १२ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

सदर विषयाबाबत विषय क्र. १७ मध्ये निर्णय झाला असलेने सदरचा विषय रद्द करणेत येत आहे.

सूचक : वि. पुं. चोपडे

अनुमोदक : रु. ल. आवळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १०८
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. २९ : सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांना ओळखपत्र सुविधा पुरविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १३ दि. १५/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

## ठराव

इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना अद्ययावत ओळखपत्रे (Identity Cards) उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शाळांमधील शिस्त आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ही बाब अनिवार्य आहे.

सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांशी समन्वय साधून शिक्षक व विद्यार्थ्यांची आवश्यक माहिती (नाव, पदनाम, वर्ग, रक्तगट, फोटो इ.) शिक्षण विभागामार्फत संकलित व प्रमाणित करुन व सदर कामासाठी लागणारा संपूर्ण खर्च शिक्षण विभागाच्या सन २०२६-२७ मधील शालांतर्गत मंजुर अनुदान निधीतुन करण्यात येईल. शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रमाणित माहितीच्या आधारे पुढील तांत्रिक प्रक्रिया (उदा. निविदा प्रक्रिया दरपत्रके मागवणे) भांडार विभागामार्फत राबविण्यात येईल. प्रचलित खरेदी नियमांनुसार पुरवठादाराची निवड करून ओळखपत्रांची छपाई व वितरण भांडार विभागामार्फत करण्यात येईल. निवडलेल्या एजन्सीकडून तयार करण्यात आलेला ओळखपत्राचा नमुना शिक्षण विभागामार्फत अंतिमरीत्या प्रमाणित केल्यानंतरच छपाईचे आदेश भांडार विभागाकडून दिले जातील.

सदरकामी भांडार विभागास आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी महानगरपालिका प्राथमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांना ओळखपत्र सुविधा पुरविणेस मंजुरी देणेत येत असुन सदरची कार्यवाही संबधित विभागाकडून करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ना. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ११०
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ३० : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना बेंच पुरविणेस मंजुरी देणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १६ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

जून २०२६ पासून शैक्षणिक वर्ष सुरु होत असून सध्याचा पट वाढीचा विचार करता राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल मधील इ. ९ वी, १० वी च्या विद्यार्थी-विद्यार्थिनीना किमान १०० बेंच ची आवश्यकता असल्याने जी.ई.एम. पोर्टल वरून खरेदी करणेस व नगरअभियंता यांचेकडे प्रस्ताव पाठवून बेंच चे स्पेसिफिकेशन ची मंजुरी मिळणेस व सन २०२६-२७ माध्यमिक शालांतर्गत अनुदान निधीमधुन खर्च करणेत येणार असुन प्रशासकीय कार्यवाही महानगरपालिकेच्या भांडार विभागामार्फत विहित कार्यपद्धतीनुसार पूर्ण करणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना बेंच पुरविणेस मंजुरी देणेत येत असुन सदरची कार्यवाही संबधित विभागाकडून करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : [signature] स.व. मुळीक

अनुमोदक : [signature] म. कि. टिंगरे

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९९९
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ३१ : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सालासाठी शालेय साहित्य खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १७ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल मधील शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता आवश्यक शालेय साहित्य खरेदी बाबत कॅमल कंपास, स्केल पट्टी १२ इंच, ब्रश सेट, कलर डिश, पेन, ७२ पानी फुलस्केप वह्या, १६२ पानी फुलस्केप वह्या, A4 साइज आलेख वह्या, पॅड, सॅक, हस्तकला साहित्य इत्यादी विविध प्रकारच्या साहित्याची आवश्यकता निश्चित करण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच आवश्यक साहित्य वेळेत उपलब्ध होणे अत्यावश्यक असून शैक्षणिक कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सदर साहित्याची तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. त्यामुळे नियमानुसार खरेदी प्रक्रिया भांडार विभागामार्फत राबविणे आवश्यक आहे.

सन २०२६-२७ माध्यमिक शालांतर्गत अनुदान निधीमधुन खर्च करणेत येणार असुन शालेय साहित्य खरेदी भांडार विभागामार्फत विहित कार्यपद्धतीनुसार पूर्ण करणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सालासाठी शालेय साहित्य खरेदी करणेस मंजुरी देणेत येत सदरचे शालेय साहित्य GEM पोर्टल वरुन खरेदी करणेत यावे. सदरची खरेदी कार्यवाही संबधित विभागाकडून करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ना. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ११२
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ३२ : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल मधील इयत्ता पाचवी ते दहावीच्या ५७१ विद्यार्थी-विद्यार्थीनींना टी शर्ट व लोअर (स्पोर्टस किट), स्पोर्टस शुज पुरविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १८ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

महानगरपालिकेच्या राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल मध्ये इयत्ता ५ वी ते १० वी मधील एकूण सुमारे ५७१ विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक सर्वांगीण विकासास चालना मिळावी. तसेच जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय शालेय शासकीय क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग वाढावा त्याप्रमाणे शालेय स्तरावर एकसमान वेशभूषा निर्माण व्हावी या उद्देशाने सर्व विद्यार्थ्यांना टी शर्ट व लोअर (स्पोर्टस किट), स्पोर्टस शूज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

सदर खरेदी प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांची वैयक्तिक मोजमापे घेणे, निश्चित तांत्रिक तपशीलानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणे व निवड झालेल्या पुरवठादारामार्फत निर्धारित कालावधीत टी शर्ट व लोअर (स्पोर्टस किट), स्पोर्टस शूजचा पुरवठा करून वितरण करणे यांचा समावेश राहील.

सन २०२६-२७ माध्यमिक शालांतर्गत अनुदान निधीतुन खर्च करणेत येणार असुन सदर खरेदी कार्यवाही महानगरपालिकेच्या भांडार विभागामार्फत विहित कार्यपद्धतीनुसार पूर्ण करण्यास शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल मधील इयत्ता पाचवी ते दहावीच्या ५७१ विद्यार्थी-विद्यार्थीनींना टी शर्ट व लोअर (स्पोर्टस किट), महानगरपालिकेकडे असणारे उपलब्ध निधीनुसार प्रशासनाने खरेदी करणेस व सदरची कार्यवाही संबधित विभागाकडुन करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ता. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. मुळीक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६ | ठराव क्र. ११३
सर्वसाधारण सभा | दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ३३ : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थी- विद्यार्थीनींना गणवेश पुरविणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. १९ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

## ठराव

इचलकरंजी महानगरपालिकेची राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल हे सर्वसामान्य विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतूने कार्यरत आहे.या प्रशालेतील विद्यार्थी हे कामगार वर्गातील व सर्वसामान्य कुटुंबातील असल्याने शाळेच्या स्थापनेपासून ते आज अखेर मोफत शिक्षण दिले. विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी आकारली जात नाही त्यामुळे सर्व मुले व मुलींना गणवेश मोफत पुरविले जातात. सन २०२६ २७- या शैक्षणिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे अंदाजित विद्यार्थी संख्या आहे.

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | इ ८.वी ते १० वी मुलींचे पंजाबी ड्रेस (पर्पल रंग) १८४ मुली x २ नग प्रत्येकी | ३६८ नग |
| २ | मुलींचे पंजाबी ड्रेस (पांढरा रंग) १८४ मुली x १ नग प्रत्येकी | १८४ नग |
| ३ | मुलांचे ड्रेस (गुलाबी रंग हाफशर्ट) (टेरीकॉट) २८५ मुले x २ नग प्रत्येकी | ५७० नग |
| ४ | मुलांचे ड्रेस फुल पँट (पर्पल रंग ) (टेरीकॉट) २८५ मुले x २ नग प्रत्येकी | ५७० नग |
| ५ | मुलांचे ड्रेस पांढरा हाफशर्ट (टेरीकॉट) २८५ मुले x १ नग प्रत्येकी | २८५ नग |
| ६ | मुलांचे ड्रेस फुल पँट (पांढरा रंग) (टेरीकॉट) २८५ मुले x १ नग प्रत्येकी | २८५ नग |
| ७ | जॅकेट (इ ८ वी ते १० वी मुली) १८४ विद्यार्थिनी x प्रत्येकी ३ नग (पर्पल२ नग) (पांढरा १ नग ) | ५५२ नग |

सदर कामी शालांतर्गत अनुदान निधीतुन खर्च करणेत येणार असुन सदर गणवेश खरेदीबाबतची कार्यवाही महानगरपालिकेच्या भांडार विभागामार्फत विहित कार्यपद्धतीनुसार पूर्ण करणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थी- विद्यार्थीनींना गणवेश पुरविणेस मंजुरी देणेत येत असुन सदरची कार्यवाही संबधित विभागाकडून करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ना. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ११४
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ३४ : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थी- विद्यार्थीनींना गणवेश, सॅक, बुट, सॉक्स, बेल्ट इ. शैक्षणीक साहित्य पुरविणेस मंजूरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. २० दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

## ठराव

इचलकरंजी महानगरपालिकेची राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल हे सर्वसामान्य विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतूने कार्यरत आहे.या प्रशालेतील विद्यार्थी हे कामगार वर्गातील व सर्वसामान्य कुटुंबातील असल्याने शाळेच्या स्थापनेपासून ते आज अखेर मोफत शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फि आकारली जात नाही त्यामुळे सर्व मुले व मुलींना गणवेश मोफत व इतर शैक्षणिक साहित्य पुरविले जातात. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे अंदाजित विद्यार्थी संख्या आहे.

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | इ. ७वी ते ५वी मुली / मुले ड्रेस १०२ सेट प्रत्येकी ३ नग | ३०६ नग |
| २ | सॅक | ५७१ नग |
| ३ | बूटकाळा - रंग( प्रत्येकी १जोडी) | ५७१ नग |
| ४ | सॉक्स( प्रत्येकी १जोडी) | ५७१ नग |
| ५ | बेल्ट ५७१ प्रत्येकी २ नग | ११४२ नग |
| ६ | एम्ब्रायडरी मुले व मुली (शाळेचा लोगो) ५७१ प्रत्येकी ३ नग | १७१३ नग |

सन २०२६-२७ माध्यमिक शालांतर्गत अनुदान निधीतुन खर्च करणेस मंजुरी देणेत येत असुन सदर खरेदीची कार्यवाही महानगरपालिकेच्या भांडार विभागामार्फत विहित कार्यपद्धतीनुसार पूर्ण करण्यास शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल कडील इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थी- विद्यार्थीनींना गणवेश, सॅक, बुट, सॉक्स, बेल्ट इ. शैक्षणीक साहित्य पुरविणेस मंजुरी देणेत येत असुन सदरची कार्यवाही संबधित विभागाकडुन करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ना. बा. जोवार.

अनुमोदक : स. ब. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६ | ठराव क्र. ११५
सर्वसाधारण सभा | दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ३५ : राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल या प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या परिक्षेसाठी उत्तरपत्रिका व शालेय कामकाजासाठी स्टेशनरी साहित्य पुरविणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. २१ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेचे राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल इचलकरंजी या प्रशालेत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात अंदाजे इ.५ वी ते १० वी पर्यंत ६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर विद्यार्थ्यांची सराव व मुख्याध्यापक संघाच्या परीक्षा घेण्यासाठी उत्तर पत्रिकांची आवश्यकता आहे. तसेच शाळेच्या दैनंदिन कामकाजासाठी खालील प्रमाणे स्टेशनरी साहित्याची आवश्यकता आहे.

| अ.क्र | तपशील | एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | चित्रकला कागद | २,००० |
| २ | आलेख कागद | २,००० |
| ३ | २ पानी उत्तर पत्रिका | २०,००० |
| ४ | ४ पानी उत्तर पत्रिका | २०,००० |
| ५ | दाखला मागणी अर्ज | ५०० |
| ६ | प्रवेश अर्ज | ५०० |
| ७ | कॅटलॉग | २०० |
| ८ | प्रवेश जाहिराती | १०,००० |
| ९ | विषय समिती रजिस्टर | १२ |
| १० | आकारिक मूल्यमापण नोंदवही | ५० |
| ११ | विद्यार्थी ओळख पत्र | ५०० |
| १२ | गुणपत्रक स्लिप | ५,००० |
| १३ | इयत्ता ५ वी ते ८ वी वार्षिक परीक्षा निकाल पत्रक(कार्ड) | १५० |
| १४ | इयत्ता ९ वी ते १० वी वार्षिक परीक्षा निकाल पत्रक(कार्ड) | ३५० |
| १५ | इयत्ता ५ वी ते ८ वी वार्षिक प्रगतिपत्रक | १५० |
| १६ | इयत्ता ९ वी ते १० वी वार्षिक प्रगतिपत्रक | ३५० |

सन २०२६-२७ माध्यमिक शालांतर्गत अनुदान निधीतुन सदर कामी खर्च करणेत येणार असुन महानगरपालिकेच्या भांडार विभागामार्फत विहित कार्यपद्धतीनुसार खरेदीची कार्यवाही पूर्ण करणेबाबत शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुल या प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या परिक्षेसाठी उत्तरपत्रिका व शालेय कामकाजासाठी स्टेशनरी साहित्य खरेदी करणेस मंजुरी देणेत येत असुन सदरची कार्यवाही संबधित विभागाकडून करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स.व. मुळीक.

अनुमोदक : ना. बा. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ११८
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ३६ : इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळा व माध्यमिक हायस्कुल तसेच शिक्षण विभागाच्या जुन्या ऑफिस मधील डेड स्टॉक साहित्य निर्लेखन करणेस मंजूरी मिळणेबाबत मा. शिक्षण समिती ठराव क्र. २२ दि. २७/०५/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा व माध्यमिक हायस्कूल मध्ये तसेच इचलकरंजी शिक्षण विभागाच्या जुन्या ऑफिस मधील वर्षानुवर्षे पडून असलेल्या आणि वापरण्यास पूर्णपणे अयोग्य ठरलेल्या 'डेड स्टॉक' साहित्याबाबतची सविस्तर माहिती शिक्षण विभागामार्फत संकलित करण्यात आली आहे. संदर्भीय पत्रानुसार या साहित्यामध्ये वापरास अयोग्य जुने लाकडी व लोखंडी फर्निचर, मोडके बेंचेस, प्लास्टिक खुर्च्या, रद्दी पुस्तके आणि अकार्यक्षम इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा समावेश आहे.

सदर साहित्य भंगार अवस्थेत असल्यामुळे शाळांच्या वर्गखोल्यांमध्ये व मोकळ्या परिसरात मोठी जागा व्यापली जात आहे, ज्याचा प्रतिकूल परिणाम शालेय स्वच्छतेवर आणि विद्यार्थ्यांच्या हालचालींवर होत आहे. हे साहित्य शाळांमधून हटवल्यास ती जागा शैक्षणिक उपक्रमांसाठी उपलब्ध होऊ शकेल. या साहित्याची विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिका भांडार विभागाकडे हस्तांतरित करणे तांत्रिकदृष्ट्या सोयीचे ठरणार आहे.

तरी, वरील विषयाचे गांभीर्य आणि शाळांच्या शैक्षणिक हिताचा विचार करता, सदर वापरास अयोग्य डेड स्टॉक साहित्य भांडार विभागामार्फत निर्लेखित करण्याची प्रशासकीय कार्यवाही महानगरपालिकेच्या भांडार विभागामार्फत विहित कार्यपद्धतीनुसार पूर्ण करण्यास शिक्षण समितीने शिफारस केली आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका प्राथमिक शाळा व माध्यमिक हायस्कुल तसेच शिक्षण विभागाच्या जुन्या ऑफिस मधील डेड स्टॉक साहित्य निर्लेखन करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स. व. गुळीक

अनुमोदक : ता. बा. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. ११७
दि. २५/०६/२०२६

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

विषय क्र. ३७ : इंदोर शहर धर्तीवर इचलकरंजी शहरासाठी स्वच्छता योजना राबविणेकामी नियुक्त करणेत आलेल्या समितीने इचलकरंजी शहरातील घनकचरा गोळा करणे, त्याची वाहतुक करणे आणि त्यावर प्रक्रीया करणे तसेच या अनुषंगाने स्वच्छ व सुंदर इचलकरंजीसाठी तयार केलेली नियमावलीस मा. महासभेची मंजुरी देणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

इंदोर शहराच्या स्वच्छतेच्या धर्तीवर इचलकरंजी शहरासाठी स्वच्छता योजना राबविणे करिता सभागृह नेता श्री. विठ्ठल चोपडे यांनी मागणी केली होती. इचलकरंजी शहरातील घनकचरा गोळा करणे, त्याची वाहतुक करणे आणि त्यावर प्रक्रिया करणे तसेच या अनुषंगाने स्वच्छ व सुंदर इचलकरंजीसाठी नियमावली निश्चित करणे ही बाब विचाराधीन होती. त्या अनुषंगाने दि. २१/०४/२०२६ च्या सभेमध्ये सर्वसमावेशक चर्चा होवून याबाबत निश्चित धोरण ठरविणे करिता मा.महापौर यांनी समिती नियुक्त केली होती .सदर समितीने मा.महापौर, मा.उपमहापौर अन्य महानगरपालिका सदस्य यांचे सोबतच प्रत्यक्ष स्वच्छता कामात सक्रीय असणारे अधिकारी, कर्मचारी यांचे अनुभव लक्षात घेवून व प्रत्यक्ष कामकाजाची पहाणी करुन अधिकाधिक चांगल्या पध्दतीने काम करणेसाठी खालिल प्रमाणे शिफारशी सादर केल्या आहेत.

स्वच्छ इचलकरंजी या नावाने हे अभियान इचलकरंजी महानगरपालिकेचा वर्धापन दिन २९ जून रोजी पासून अमलात आणावे.

**<u>सद्यस्थितीचा आढावा</u>**

इचलकरंजी महानगरपालिकेकडे दैनंदिन स्वच्छता शौचालय व मुतारी स्वच्छता मलेरिया विभाग सारंग गटर स्वच्छता याकरिता एकूण ७४२ सफाई कर्मचारी आहेत कामाची सोयीनुसार त्यांची वर्गवारी खालील प्रमाणे आहे

दैनंदिन स्वच्छता ४०५ मलेरिया ४० शौचालय विभाग ८५ सारणी विभाग २० कचरा डेपो आठ याप्रमाणे ५५८ कर्मचारी आरोग्य विभागाकडे प्रत्यक्ष सफाई कामासाठी उपलब्ध असून तब्बल १८४ सफाई कर्मचारी अन्य विभागांमध्ये कार्यरत आहेत इचलकरंजी महापालिका हद्दीमध्ये दैनंदिन कचरा सफाईच्या हद्दी ची संख्या ७२७ आहे.

<u>दैनंदिन सफाई कामी अपेक्षित सुधारणा -</u>

अ) कर्मचारी उपलब्धता (एकूण क्षेत्र)

१) सफाई हद्दीनुसार ७२७ हद्दीकरिता ७२७ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. जेथे दैनंदिन रस्ते साफसफाई करणे शक्य नाही असे रस्ते वगळून हद्दींचे पुनःर्नियोजन केलेस किमान १५ टक्के म्हणजेच ११० हद्दी कमी होऊन एकूण ६१७ हद्दी राहतील. तथापि या सध्या महापालिकेचे ४०५ कर्मचारी दैनंदिन सफाईसाठी उपलब्ध आहेत म्हणजेच हद्दीनिहाय २१२ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

२) मलेरिया विभागाकडे सध्या चाळीस कर्मचारी उपलब्ध असले तरी प्रति प्रभाग १ कर्मचारी निश्चित केल्यास किमान दर दहा दिवसांनी एकदा घरोघरी औषध फवारणी करता येईल. तसेच चार अतिरिक्त कर्मचारी धरलेस वीस कर्मचारी मलेरिया विभागासाठी ठेवून अन्य २० कर्मचारी दैनंदिन स्वच्छतेसाठी उपलब्ध होऊ शकतात.

३) केवळ मोठ्या सारणी सफाईचे काम सारण विभागाकडे ठेवून, सदरचे काम खाजगी मक्तेदारीद्वारे करून घेतलेस हे २० कर्मचारी दैनंदिन सफाईसाठी उपलब्ध होऊ शकतात.

४) अन्य विभागाकडे कार्यरत असणारे पैकी अत्यावश्यक असणारे दहा टक्के कर्मचारी वगळून ९० टक्के कर्मचारी दैनंदिन सफाई करिता उपलब्ध करून घेतलेस १७० कर्मचारी दैनंदिन सफाई कामासाठी उपलब्ध होतील.

५) याचा एकत्रित विचार करता एकूण ६१७ हद्दीकरिता विद्यमान ४०५ + २१० अतिरिक्त कर्मचारी असे ६१५ कर्मचारी दैनंदिन सफाईसाठी उपलब्ध होऊ शकतात.

६) बर्मन समितीने निश्चित केले प्रमाणे सर्व सफाई कर्मचाऱ्यांना दररोज किमान ५० हजार चौरस फूट साफसफाई व ५०० रनिंग मीटर गटर सफाई असे काम निश्चित केलेस महापालिकेकडे उपलब्ध कर्मचाऱ्यांमार्फत शहराची स्वच्छता करणे शक्य आहे. सर्वांना समान काम हे धोरण प्रामुख्याने असणे आवश्यक आहे.

७) शहर स्वच्छता प्रक्रियेमध्ये CSI, स्वच्छता निरीक्षक हा महत्त्वाचा घटक असल्याने CSI, स्वच्छता निरीक्षक आणि त्याचा सोबतच वार्ड मुकादम यांच्या कामाची जबाबदारी व कर्तव्य निश्चित करणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

८) दररोज घरोघरी व व्यावसायिक औद्योगिक आस्थापनांमध्ये निर्माण होणारा कचरा गोळा करणे त्याचे त्याच ठिकाणी वर्गीकरण करणे आणि असा वर्गीकरण केलेला कचरा सुरक्षितपणे कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणे यासाठी प्रभावी अंमलबजावणी कार्यपद्धती निश्चित करणे आवश्यक आहे.
९) मोठ्या प्रमाणामध्ये कचरा निर्माण करणारे व्यावसायिक आणि औद्योगिक आस्थापनांसाठी स्वतंत्र कचरा उठाव करणे आणि त्याबाबतचा मोबदला त्यांच्याकडून जमा करून घेणे बाबत धोरण ठरवणे आवश्यक वाटते.
१०) कचरा वर्गीकरण व स्वच्छतेबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती खास करून महिला वर्गाचा या कामी लोकसहभाग वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे
११) प्लॅस्टिकवापर, अस्वच्छता, पर्यावरणाचे नुकसान यामुळे आरोग्यावर होणारे परिणाम याच्या जागृती करिता लोक चळवळ उभा करणे आवश्यक आहे.
१२) याबाबत संपूर्णपणे जागृती करण्याकरिता विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे संधी देऊन देखील जे जाणीवपूर्वक चुका करतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे याबाबत ठोस धोरण आवश्यक आहे.
१३) कोणतीही कठोर कारवाई करण्यापूर्वी संबंधितांना आवश्यक असणारे सर्व प्रकारचे साहित्य, कर्मचारी, आवश्यक सुविधा महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी व सत्वर उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.
१४) वरील सर्व बाबत निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धती अंमलबजावणी करण्याचे जबाबदारी पदाधिकारी व अधिकारी यांची आहे त्यामध्ये हायगय झालेस सदरच्या अपेक्षित सुधारणा यशस्वी होणार नाहीत.
१५) वरील सर्व सुधारणांच्या यशस्वीतेसाठी राजकीय इच्छाशक्ती महत्वाची असून ठरविलेल्या कार्यपद्धतीमध्ये राजकीय हस्तक्षेप झाला नाही तरच अपेक्षित परिणाम साधता येणार आहे.

वरील १ ते १५ मुद्यांबाबत समितीने अनुभवी व्यक्तींसह वेळोवेळी केलेल्या चर्चेअती पुढील निष्कर्षावर एकमत झाले असून त्या अनुषंगाने समिती पुढील प्रमाणे शिफारस करीत आहे.

**समिती शिफारस**

**भाग १- सफाई कर्मचारी**

१) दैनंदिन रस्ते व गटार सफाई करिता सध्या असणाऱ्या हद्दीं पैकी ज्या रस्त्यांचे दैनंदिन साफसफाई शक्य अथवा आवश्यक नाही असा भाग वगळून यातील किमान १५ टक्के हद्दी कमी करून पुर्ननियोजन करावे.
२) मलेरिया विभागा कडील ४० पैकी २० सारण विभाग कडील २० तसेच वेगवेगळ्या विभागाकडे कार्यरत असणाऱ्या १८४ पैकी किमान १६० सफाई कर्मचारी दैनंदिन सफाई करिता आरोग्य विभागास उपलब्ध करून द्यावेत.
३) कामाच्या सोयीसाठी इतर विभागाकडे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आवश्यकता निश्चित करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त, संबंधित विभागाचे उपायुक्त, आरोग्य विभागाचे उपायुक्त, आरोग्य अधिकारी व महापौर अथवा त्यांनी नियुक्त केलेला एक प्रतिनिधी अशी ५ सदस्यांची समिती राहील. या समितीच्या शिफारशी शिवाय कोणताही सफाई कर्मचारी आरोग्य विभागाशिवाय इतर या ठिकाणी काम करणार नाही.
४) सफाई कर्मचाऱ्यांसाठी सकाळी ६ ते ११ व सायंकाळी ४ ते ६ अशा दोन सत्रात काम निश्चित करण्यात यावे. यापैकी सकाळच्या सत्रात सकाळी ८ ते ८.३० ही अर्धा तासाची वेळ चहापाणची विश्रांती असेल.
५) तीन फूट रुंद व तीन फूट खोल या व यापेक्षा अधिक मापाच्या गटारी सारणगटारी म्हणून समजण्यात येतील. त्यांची सफाई सारण विभागाकडून करण्यात येईल.
६) उर्वरित सर्व गटर सामान्य गटर असेल त्याची सफाई दैनंदिन सफाई कामगार करतील.
७) सर्व प्रकारच्या सामान्य गटारीची बांधणी यापुढे सिमेंट गटर न करता हाफ राऊंड पद्धतीनेच करण्यात यावी. याबाबत बांधकाम विभागास कायमस्वरूपी निर्देश देण्यात यावेत.
८) शहरातील मुख्य रस्त्यांची सफाई रस्त्यांवरील वर्दळ वाढण्यापूर्वी करणे अपेक्षित असलेले मुख्य रस्त्यावर सफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सकाळची वेळ सकाळी ५ ते ९.३० असे असेल. (चहापान विश्रांती सह)
९) सर्व सफाई कर्मचाऱ्यांनी आपले भ्रमणध्वनी कामाचे वेळेत संबंधित वार्ड मुकादमकडे जमा करणे बंधनकारक आहे.
१०) सफाई कर्मचाऱ्यांसाठी दिवसातून ४ वेळा बायोमेट्रिक हजरी बंधनकारक असेल.
११) प्रभाग समितीनिहाय १६/१७ नगरसेवक व संबंधित उपायुक्त सहाय्यक आयुक्त यांचा स्वतंत्र व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात यावा. प्रभागातील सफाईचे पूर्वी व नंतर असे फोटो दररोज जीआयएस मॅपिंगसह सदर ग्रुप वर अपलोड करण्याची जबाबदारी संबंधित स्वच्छता निरीक्षक आणि मुकादम यांची असेल व ती बंधनकारक असेल,
१२) प्रत्येक प्रभाग समितीचा समिती निहाय आराखडा करून तेथील दैनंदिन सफाईबाबत दररोज अहवाल प्रभाग समिती अध्यक्ष यांना देण्याची जबाबदारी संबंधित CSI यांची असेल व ती बंधनकारक असेल.

Scanned with OKEN Scanner

१३) संबंधित प्रभाग समिती अध्यक्ष, इतर विभागातील १ अधिकारी, संबंधित सहाय्यक आयुक्त आणि संबंधित प्रभागातील किमान २ सदस्य यांचे भरारी पथक दैनंदिन स्वच्छता कामामध्ये अचानक भेट देऊन पाहणी करेल. चुकीच्या अथवा खोट्या माहितीसाठी संबंधित स्वच्छता निरीक्षक व वार्ड मुकादम जबाबदार असेल,

१४) अनुकंपा द्वारे मोठ्या प्रमाणात शिपाई व चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी महापालिकेकडे सेवेस उपलब्ध झाले आहेत त्यामुळे शिपाई व इतर कामासाठी असणारे सफाई कर्मचारी आरोग्य विभागाकडे वर्ग करण्यात यावेत तसेच कार्यालयीन शिपाई यांची अनावश्यक संख्या कमी करून ती मर्यादित करण्यात यावी.

१५) प्रत्येक प्रभागाकरिता १ स्वच्छता निरीक्षक असेल. त्याची कर्तव्य व जबाबदारी खालील प्रमाणे असेल.

अ) दैनंदिन कचरा उठाव व घंटागाडीचे नियोजन करणे,

ब) वार्ड मुकादम यांचे कामावर नियंत्रण करणे

क) सेकंडरी पॉइंटचे नियोजन व नियंत्रण करणे.

ड) कर्मचारी हजेरी व त्यातील गैरप्रकाराबाबत संपूर्ण जबाबदारी स्वच्छता निरीक्षक यांची असेल.

ई) दैनंदिन कचरा उठाव संकलन वाहतूक व वर्गीकरण याची संपूर्ण जबाबदारी स्वच्छता निरीक्षकांची असेल,

१६) प्रत्येक प्रभागाकरिता एक वार्ड मुकादम असेल. त्याचे कर्तव्य व जबाबदारी खालील प्रमाणे असेल.

अ) दररोज चार वेळा सफाई कर्मचाऱ्यांची हजेरी घेणे.

ब) प्रभाग समिती अध्यक्ष यांना दररोज अहवाल देणे,

क) दैनंदिन सफाई कामाचे पूर्वी व नंतर चे फोटो संबंधित व्हाट्सअप ग्रुप वर अपलोड करणे.

ड) सफाई कर्मचाऱ्यांचे भ्रमणध्वनी कामाच्या वेळेत स्वतःकडे जमा करून घेणे.

ई) सेकंडरी पॉईंटचे नियोजन करणे.

१७) प्रत्येक प्रभाग समिती करिता एक सीएसआय असेल त्यांचे कर्तव्य व जबाबदारी पुढील प्रमाणे असेल,

अ) संबंधित प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या संपूर्ण परिसरातील स्वच्छतेचे संबंधि जबाबदारी.

ब) प्रभागातील कचऱ्याबाबत स्वच्छतेबाबत येणाऱ्या कोणत्याही तक्रारीचे शहानिशा करून त्याची निराकरण करणे.

क) स्वच्छता निरीक्षक वार्ड मुकादम व कर्मचारी यांचे सकाळी सहा वाजता जीपीएस फोटो त्यांचे कडून प्राप्त करून व्हाट्सअप ग्रुप वर अपलोड करणे.

ड) प्रभाग समिती अध्यक्ष नगरसेवक तसेच अन्य पदाधिकारी व अधिकारी यांचे कडून स्वच्छता व कचरा या संबंधित वेळोवेळी येणाऱ्या सूचना तक्रारी यांचे निराकरण करणे.

ई) स्वच्छता निरीक्षक वार्ड मुकादम व सफाई कर्मचारी यांचे नियंत्रण करणे.

फ) कर्मचारी रजांबद्दल नियंत्रण ठेवणे पदाधिकारी व अधिकाऱ्यांना वेळोवेळी अवगत करणे.

१८) कर्मचाऱ्यांची बोगस हजेरी आढळून आलेस त्याची संपूर्ण जबाबदारी स्वच्छता निरीक्षक व मुकादम यांची असेल. अशा प्रकरणी आवश्यक ती थेट कारवाई या संबंधितांवर करण्यात येईल.

## भाग २ - घनकचरा संकलन, वाहतूक व प्रक्रिया

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये सुमारे ६२ हजार पेक्षा अधिक मिळकतींचा समावेश आहे शहरात साधारणतः १२० ते १४० टन दैनंदिन कचरा निर्मिती होते. शहरातील सर्व प्रकारचा कचरा घरोघरी गोळा करण्याकरिता सुमारे ७० वाहने लागतील. यामध्ये घंटागाडी, छोट्या गाडी आणि ढकलगाडी यांचा समावेश असेल.

आवश्यक कर्मचारी महानगरपालिकेकडे उपलब्ध नसल्याने सध्या खाजगी मक्तेदाराकडून सदरचे काम करून घेतले जाते. यापुढे सुद्धा सदरचे काम खाजगी मक्तेदाराकडूनच करून घ्यावे लागेल. तथापि अचूक परिणाम साधण्यासाठी खालील प्रमाणे काही बाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन तशा सुधारणा करणे आवश्यक आहे.

१) घरोघरी जाणारी घंटा गाडीची वेळ निश्चित असणे आवश्यक असून, त्यामध्ये पाच दहा मिनिटापेक्षा अधिक फरक असता कामा नये.

२) घंटागाडी कचरा संकलन करण्याचे काम सकाळी सहा वाजता सुरू होणे आवश्यक आहे.

३) प्रभाग समिती अ आणि ड मधून गाड्या थेट कचरा डेपोवर जाऊन कचरा रिकामा करून पुन्हा दुसरी फेरी सकाळी ११ वाजेपर्यंत पूर्ण करू शकतात. तथापि तुलनेने प्रभाग समिती ब व प्रभाग समिती क चे क्षेत्र तुलनेने लांब असलेमुळे प्रभाग प्रभाग समिती ब क करिता स्वतंत्र कचरा डम्पिंग स्पॉट असणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

४) शहरातील अनेक भागात कमी रुंदीचे रस्ते असलेले त्या ठिकाणी मोठी घंटागाडी पोहोचू शकत नाही याकरिता तिथे रिक्षा अथवा तत्सम घंटागाडीची आवश्यकता आहे, अगदीच अरुंद असणाऱ्या बोळांमध्ये हाताने ढकलणाऱ्या घंटागाड्या वापराव्या लागतील.

५) प्रत्येक गाडीला जीपीएस यंत्रणा जोडणे आवश्यक आहे. सदर जीपीएस यंत्रणेचे प्रभाग समिती निहाय चार भागांमध्ये वर्गीकरण करून स्वतंत्र स्क्रीन द्वारे महापालिकेमधील स्वतंत्र दालनात व्यवस्था करून, त्याचे नियंत्रण करण्यात यावे.

६) सदर प्रत्येक स्क्रीन जवळ एक स्क्रीन ऑपरेटर नेमणूक करण्यात यावा. जो सातत्याने स्क्रीनवर पाहणी करून त्रुटींबाबत संबंधित वाहन चालकाला तातडीने सूचना करेल.

७) स्क्रीन ऑपरेटर द्वारे आलेल्या सूचनेची अंमलबजावणी करणे घंटागाडी चालकास बंधनकारक असेल.

८) सर्व घंटागाडीवर एक मोबाईल नंबर अथवा टोल फ्री नंबर लिहून आणि गाडीवरील ध्वनीक्षेपकाद्वारे नागरिकांसाठी जाहीर केला जाईल. ज्याद्वारे नागरिक त्यांच्या कचरा आणि स्वच्छते संबंधित असणाऱ्या तक्रारी थेट ऑपरेटर कक्षात कळवतील. त्याद्वारे सुद्धा ऑपरेटर संबंधित चालकाला सूचना करू शकेल.

९) कचरा संकलन व वाहतूक कामाकरिता कार्यालयीन कामासाठी एक आणि क्षेत्रीय कामासाठी एक स्वतंत्र अधिकारी नेमणूक करण्यात यावा.

१०) आरोग्य विभागाकडे यापूर्वी कामाचा अनुभव असणारा त्रयस्थ अधिकारी अथवा कर्मचारी मानधन तत्वावर क्षेत्रीय अधिकारी म्हणून नेमण्यात यावा.

११) नागरिकांकडून येणारे तक्रारीबाबत शहानिशा करून त्याचा पाठपुरावा करण्याचे काम क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी करावे.

१२) क्षेत्रीय अधिकाराच्या अहवालाशिवाय कार्यालयीन प्रमुखाने देयक तयार करू नये.

१३) स्वच्छता निरीक्षक अथवा नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी, घंटागाडी आणि सेकंडरी पॉइंट वरील कचरा उठावाचा आधारे क्षेत्रीय अधिकारी दररोज विहित नमुन्यातील अहवाल कार्यालय प्रमुखास सादर करेल.

१४) अहवालाची नोंद घेऊन दररोजचे स्वतंत्र बिल कार्यालयीन प्रमुख दुसऱ्या दिवशी तयार करेल.

१५) कार्यालय प्रमुख असे दररोज तयार केलेली बिले एकत्र करून महिन्यातून एकदा देयक अदा करण्यासाठी आवश्यक कागदपत्र सह सादर करेल.

१६) कचरा विलगीकरण हा घनकचरा व्यवस्थापन मधील अत्यंत महत्त्वाचा घटक असून घरोघरी कचरा संकलन करतानाच तो विलग करून घेण्यात यावा.

१७) विलग केलेला कचरा घंटागाडी मधील स्वतंत्रपणे कप्प्यात जमा करणे आवश्यक आहे अन्यथा विलगीकरणाचा हेतू साध्य होणार नाही.

१८) जागेवरच कचरा विलग करून घेण्याची जबाबदारी घंटा गाडीसोबत असणारा मदतनीस याची राहील.

१९) कचरा विलगीकरणची माहिती आणि महत्त्व समजावून सांगण्यासाठी विविध प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२०) घरगुती कचरा हा महिला मोठ्या प्रमाणात हाताळतात. त्यामुळे कचरा वर्गीकरण संबंधी त्यांचे प्रबोधन मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे.

२१) विलगीकरणाबाबत मोठ्या प्रमाणात जागृती केल्यानंतर त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी बाबत दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रथम कारवाई ५०० रुपये दूसरी कारवाई १००० रुपये तिसरी कारवाई २००० रुपये करण्यात यावी. त्यानंतरही वारंवार चुका करणाऱ्या नागरिकाचे नळ कनेक्शन बंद करण्याची कारवाई करण्यात येईल असे नागरिकांना सुचित करण्यात यावे.

२२) कचरा भरून येणारी घंटागाडी रिकामी झाल्यानंतर दररोज ती स्वच्छ केली जावी, धुतली जावी. यासाठी कचरा डेपोजवळ सर्विसिंग ची व्यवस्था करावी. त्यामुळे कचरा हौदयाचे आयुष्यमान वाढेल.

२३) सकाळच्या सत्रात दोन वेळा गाडीची फेरी व्हावी. तसेच संध्याकाळच्या सत्रात देखील फेरीवाले, हॉटेल्स व इतर आवश्यक ठिकाणी कचरा उठावाची व्यवस्था घंटागाडी द्वारे करण्यात यावी.

२४) सर्व मंगल कार्यालयांमध्ये होणाऱ्या कार्यक्रमानंतर मोठ्या प्रमाणात कचरा निर्मिती होते. याकरिता प्रत्येक कार्यक्रमाकरिता मंगल कार्यालयांना विशिष्ट फी आकारणी करण्यात यावी. सदरची फी संबंधित कार्यक्रम असणाऱ्या व्यक्तीकडून कार्यालयाच्या भाड्या सोबत जमा करून नगरपालिकेला जमा करण्याची जबाबदारी कार्यालयाची राहील.

२५) कार्यालया व्यतिरिक्त इतर ठिकाणी तसेच घरगुती होणाऱ्या कार्यक्रमांची नोंद करून कचरा उठवाची मागणी करणाऱ्या नागरिकांना विशिष्ट फी आकारून, त्यांचा कचरा उठाव करता येईल.

२६) इमारत बांधकाम अथवा पाडकामाचे रस्त्यावर पडणारे साहित्य महापालिकेतर्फे स्वतंत्र वाहनामार्फत उचलण्यात येईल. त्याच्या भाड्यापोटी रक्कम संबंधित मिळकत धारकाकडून वसूल केली जाईल.

Scanned with OKEN Scanner

२७) दररोजच्या रस्ता व गटरीच्या सफाईचा कचरा सेकंडरी पॉईंटवर घेऊन जाण्यासाठी सर्व सफाई कर्मचाऱ्यांना प्रत्येकी एक याप्रमाणे ७०० ढकलगाडे महानगरपालिकेने खरेदी करावेत.

२८) कर्मचाऱ्यांच्या ढकलगाड्या करिता फायबर बॉडी आणि टायरची चाके असल्यास ते दीर्घकाळ चालतील.

२९) सेकंडरी पॉईंटवरून कचरा उचलण्यासाठी मोठ्या फुडाच्या ट्रॅक्टर ट्रॉली किंवा डम्पर यांचा वापर करण्यात यावा.

३०) सारण गटारी स्वच्छते करिता छोटे बकेट असणारे नवीन पद्धतीचे वाहन महानगरपालिकेने खरेदी करावे.

३१) घनकचरा वर्गीकरण व आरोग्याचे महत्त्व पटविणे करता एन जी ओ मदत घेण्यात यावी.

३२) पथनाट्य अथवा मनोरंजनाच्या कार्यक्रमात मधून प्रबोधन केलेस ते अधिक परिणाम करत होईल

३३) महिला संघटना अथवा महिला बचत गटांसाठी काम करणाऱ्या किंवा कामाची आवड असणाऱ्या महिलांना या कमी अधिक सक्रिय केल्यास अचूक परिणाम साधता येईल.

३४) कचरा विलगीकरण व स्वच्छता प्रबोधन जनजागृतीसाठी शाळा महाविद्यालय महिला मंडळ महिला बचत गट यांचे सहकार्य घेण्यात यावे

३५) व्हाट्सअप ग्रुप सोशल मीडिया व स्थानिक माध्यमांचा प्रभावीपणे वापर करून घेण्यात यावा.

३६) माझा वार्ड स्वच्छ वाढ अशी लोकसहभागावर आधारित मोहीम राबविण्यात यावी. विजेत्या प्रभागांना प्रोत्साहनपर बक्षीस योजना लागू करावी.

३७) ३० ६० ९० दिवसाचा अंमलबजावणी आराखडा निश्चित करून त्यानुसार कार्यवाही होत आहे याचा आढावा साप्ताहिक बैठकीद्वारे वरिष्ठ स्तरावरून घेण्यात यावा.

३८) बारकोड बाबत कडक अंमलबजावणी करण्यात यावी.

## भाग तीन – संकीर्ण

१) आरोग्य विभाग कडील कर्मचारी एकाच दिवशी मोठ्या संख्येने गैरहजर राहू नये आणि त्याचा कामकाजावर परिणाम होऊ नये यासाठी स्वतंत्र रजा नियम बनवणे आवश्यक आहे त्यानुसार अतिरिक्त आयुक्त, संबंधित उपायुक्त, आरोग्य अधिकारी, आणि सी. एस. आय. यांच्या समितीने कर्मचारी रजा संदर्भातील धोरण नक्की करावे.

२) आवश्यक कर्मचारी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आरोग्य विभाग करिता कर्मचारी संख्या अपुरी पडत असल्यास काही प्रभाग खाजगी मक्ता पद्धतीने साफसफाई करता येईल.

३) मोकळ्या जागा खाजगी मालकीच्या असतील आणि त्याची नियमित सफाई होत नसेल किंवा त्या ठिकाणी कचरा टाकला जात असेल तर तो परिसर गलिच्छ होतो. यामुळे संबंधित भूखंडास खाजगी प्लॉट धारकांनी संरक्षण भिंत बांधावी. अन्यथा कचरा पडू नये याची दक्षता घेणे याबाबत संबंधित मिळकतदारकाला सूचना देऊनही साफसफाई होत नसेल तर त्या ठिकाणचा कचरा हटवून कचरा हटवण्याचा खर्च संबंधित मिळकत दाराकडून वसूल करण्यात यावा.

४) डॉक्युमेंटरी / चित्रफित कचरा विलगीकरण तसेच गटारीमध्ये टाकल्या जाणाऱ्या कचरामुळे होणारी अस्वच्छता आणि त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम दर्शवणारी चित्रफित तयार करून, जनप्रबोधनाच्या भाग म्हणून ती सर्वत्र दाखवण्यात यावी. त्याचप्रमाणे शहरांमध्ये असणाऱ्या सर्व चित्रपट गृहांमध्ये ती सक्तीने दाखवण्याबाबत कार्यवाही व्हावी.

५) घनकचरा नियम २०२६ स्वयंस्पष्ट असून यामध्ये महानगरपालिका सदस्य कर्मचारी नागरिक यांना सोपवलेली कर्तव्य व जबाबदारी पूर्ण होत आहे. याबाबत खबरदारी घेण्यात यावी.

६)अधिनियम अंतिम सदरचे नियम महापालिकेने स्वतःच्या अधिकारात केले असले तरी याला राज्य शासनाचीअंतिम मंजुरी मिळाल्यानंतर त्याचे प्रत्यक्ष नियमात रूपांतर होणार आहे. या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी जिथे स्पष्टता नसेल तेथे अधिनियमात असणारी तरतूद अंतिम असेल.

वरील प्रमाणे इचलकरंजी शहरासाठी स्वच्छता योजना राबविणेकामी नियुक्त करणेत आलेल्या समितीने इचलकरंजी शहरातील घनकचरा गोळा करणे, त्याची वाहतुक करणे आणि त्यावर प्रक्रीया करणे तसेच या अनुषंगाने स्वच्छ व सुंदर इचलकरंजीसाठी तयार केलेल्या नियमावलीस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : अ. कि. हिंगमिरे

अनुमोदक : यो. ज. पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ११८
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ३८ : इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील NUHM अंतर्गत स्थापित आरोग्य केंद्रे मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १८/०५/२०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तानुसार महानगरपालिकेकडे हस्तांतरण करुन घेणेस व आरोग्य केंद्रांचे हस्तांतरण करुन घेणेसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत जिल्हा आरोग्य अभियान व जिल्हा आरोग्य सोसायटी महापालिका स्तरावर गठीत करुन सदर सोसायटीची नोंदणी मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे करुन घेणेस मंजुरी मिळणेबाबत आलेला प्रस्ताव.

## ठराव

मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी - इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील NUHM अंतर्गत स्थापीत आरोग्य केंद्रांचे हस्तांतरण करुण घेणेबाबत तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती हातकणंगले आणि वैद्यकिय आरोग्य अधिकारी इचलकरंजी महानगरपालिका यांना पत्र दिलेले आहे. तसेच इचलकरंजी महानगरपालिकेच्या मा.सदस्या (नगरसेविका) सौ.सरिता भाऊसो आवळे यांनी देखील दि. २६/०२/२०२६ रोजी इमनपा हदीतील कार्यरत NUHM विभागाकडील आरोग्य केंद्रे इमनपा कडे हस्तांतरित करून घेणे बाबतचे पत्र दिलेले आहे.

मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी दिलेल्या मौखिक सूचना व प्राप्त निर्देश यानुसार आणि मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या अधिनस्त असलेल्या व इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रात NUHM अंतर्गत स्थापीत कार्यरत असणाऱ्या आरोग्य संस्था, त्यांच्या सर्व कर्मचारी वर्ग, साधन सामग्री दस्तऐवज व निधीसह तात्काळ इचलकरंजी महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणे बाबत कळविण्यात आलेले आहे. यानुसार एकुण ६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, १ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, ७ नागरी आयुष्यमान आरोग्यमंदिर व ७ प्रस्तावित नागरी आयुष्यमान आरोग्यमंदिर केंद्र असे एकूण २१ आरोग्य संस्थाचे हस्तांतरण नियमानुसार संयुक्त हस्तातरण पंचनामा करून त्याचे कर्मचारी, जंगम स्थावर मालमत्ता, औषधसाठा, अभिलेख व उपलब्ध निधी यांच्या सविस्तर यादीसह तात्काळ हस्तांतरण करण्याची कार्यवाही पुर्ण करावी व तसे पत्र शासनास सादर करावे असे सुचित केले आहे.

सर्व पत्रानुसार व मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १८ मे २०२६ रोजी संपन्न झालेल्या मुख्यमंत्री वॉर रुम बैठकीचे इतिवृत्तानुसार इचलकरंजी नगरपरिषदेचे इचलकरंजी महानगरपालिकेत रुपांतर झालेने इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील NUHM अंतर्गत स्थापीत आरोग्य केंद्रांचे हस्तांतरण करुन घेणे आवश्यक आहे. सद्या सदरचे आरोग्य केंद्रे हि तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती हातकणंगले यांचे मार्फत NUHM अंतर्गत शासनाकडुन प्राप्त निधीतुन चालविले जात आहेत. यापुढे सदर आरोग्य केंद्रांचे हस्तांतरण इचलकरंजी महानगरपालिकेकडे करुन घेणे आवश्यक आहे. व तसेच संदर्भ पत्र क्रं. ०६ चे शासन निर्णयानुसार इचलकरंजी महानगरपालिकेसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा आरोग्य अभियान आणि जिल्हा आरोग्य सोसायटी महापालिकास्तरावर गठित करणे आवश्यक आहे.

त्यामुळे इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील NUHM अंतर्गत स्थापीत आरोग्य केंद्रांचे हस्तांतरण करुन घेणेसाठी आणि महानगरपालिकेसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा आरोग्य अभियान आणि जिल्हा आरोग्य सोसायटी महापालिकास्तरावर गठित करुन सदर सोसायटीची नोंदणी मा.धर्मादाय आयुक्त यांचेकडे करुन घेणसाठी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील NUHM अंतर्गत स्थापित आरोग्य केंद्रे मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १८/०५/२०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तानुसार महानगरपालिकेकडे हस्तांतरण करुन घेणेस व आरोग्य केंद्रांचे हस्तांतरण करुन घेणेसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत जिल्हा आरोग्य अभियान व जिल्हा आरोग्य सोसायटी महापालिका स्तरावर खालिल प्रमाणे समिती गठीत करुन सदर समितीची नोंदणी मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे करुन घेणेस मंजुरी देणेत येत आहे.

**नियामक मंडळ (Governing Body) इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्र**

| अ.क्र. | कार्यरत पद | समिती पद |
|---|---|---|
| १ | मा. आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका | अध्यक्ष |
| २ | मा उपसंचालक आरोग्य सेवा, कोल्हापूर | सदस्य |
| ३ | जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर | सदस्य |
| ४ | जिल्हा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर | सदस्य |
| ५ | जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक | सदस्य |
| ६ | प्रकल्प अधिकारी, महानगरपालिका | सदस्य |
| ७ | अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर | सदस्य |
| ८ | अन्न व औषध प्रशासन आयुक्तालया कडील प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रणचे प्रतिनिधी | सदस्य |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| १० | प्रकल्प अधिकारी जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण (RDA) | सदस्य |
| ११ | शिक्षण अधिकारी, इचलकरंजी महानगरपालिका | सदस्य |
| १२ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण, जिल्हा परिषद कोल्हापूर | सदस्य |
| १३ | उपयुक्त प्रशासन इचलकरंजी महानगरपालिका | सदस्य |
| १४ | शहर अभियंता इ. मनपा | सदस्य |
| १५ | शहर नियोजन अधिकारी, इचलकरंजी मनपा | सदस्य |
| १६ | मालमत्ता अधिकारी, इचलकरंजी मनपा | सदस्य |
| १७ | अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन | सदस्य |
| १८ | अध्यक्ष, इंडियन मेडिकल पेडियाट्रीक्स असोसिएशन | सदस्य |
| १९ | अध्यक्ष, जिल्हा फेडरेशन ऑफ ऑबस्टेस्ट्रीक्स अँड गायनॅकॉलॉजिस्ट ऑफ इंडिया (FOGSI) | सदस्य |
| २० | आरोग्य क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी (दोन) | सदस्य |
| २१ | वैद्यकीय आरोग्य अधिकारी (MOH) इचलकरंजी मनपा | सदस्य सचिव |

**कार्यकारी समिती (Executive Committee)**

| अ.क्र. | कार्यरत पद | समिती पद |
|---|---|---|
| १ | उपायूक्त (आरोग्य) | अध्यक्ष |
| २ | इचल. मनपा उपजिल्हाअधिकारी (नगरपालिका) | सदरस्य |
| ३ | प्रजनन व बालप्रजनन अधिकारी आरोग्य अधिकारी (RCH) | सदरस्य |
| ४ | शहर कार्यक्रम व्यवस्थापन कक्षाचे प्रतिनिधी City Program Management Unit | सदरस्य |
| ५ | जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक (DPM) राष्ट्रीय आरोग्य अभियान | सदरस्य |
| ६ | अधिक्षक उपजिल्हारुग्णालय, सामान्य रुग्णालय | सदरस्य |
| ७ | वैद्यकीय आरोग्य अधिकारी, इचल. मनपा. (MOH) | सदस्य सचिव |

सूचक : वि. पु. चोपडे

अनुमोदक : A.P. Bachute सौ. क. पु. बचाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ११९
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ३९ : इचलकरंजी महानगरपालिका अधिनस्त प्राथमिक शाळांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने बालवाडी वर्ग सुरु करणे बाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी दि. २९/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले बाबत.

**ठराव**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार पूर्वीच्या १० + २ + ३ या रचनेमध्ये बदल करुन ५ + ३ + ३ +४ या प्रमाणे रचनात्मक बदल करणेत आला आहे. यामध्ये पायाभुत स्तरापासुन पदवी स्तरापर्यंतच्या शिक्षणाचा समावेश करणेत आला आहे. सदर धोरणाची राज्यामध्ये टप्याटप्याने अंमलबजावणी सुरु आहे. या स्तरानुसार १. पायाभुत स्तर वय वर्षे ३ ते ८ बालवाटीका १,२,३ तसेच इयत्ता पहीली व दुसरीचा पायाभुत स्तर म्हणून समावेश केलेला आहे. नविन शैक्षणिक धोरणानुसार तयार करणेत आलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी राज्यातील शाळांमध्ये सर्व संबंधित विभागामार्फत सन २०२५-२०२६ पासून टप्याटप्याने करणेत येत आहे.याबाबत १६ एप्रिल २०२५ रोजी शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. बालवाटीका १,२,३ राबविणे विषयी महीला व बालविकास विभागाच्या सहमतीने स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे.

सदर शैक्षणिक धोरणातंर्गत वय वर्षे ३ पासून बालवाटीका १,२,३ तसेच इयत्ता पहीली व दुसरी या पायाभुत स्तराकरीता अंमलबजावणी करणे महानगरपालिकेस करणे क्रमप्राप्त आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस घटत आहे. खाजगी शाळांमध्ये बालवाडीपासून शिक्षण व्यवस्था असलेने तेथील बालवाडीमधिल विद्यार्थी त्याच शाळेत पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतात त्यामुळे महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळातील विद्यार्थी संख्या घटत आहे. या बाबींचा विचार करुन सभागृह नेता विठठल चोपडे यांनी मागणी केलेनुसार इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रत्येक प्राथमिक शाळा इमारतीमध्ये एक बालवाडी चालू करण्यात यावी. त्यामुळे बालवाडीमध्ये प्रवेश घेणारे विद्यार्थी पुढील शैक्षणिक प्रवेश महापालिकेच्या शाळेमध्ये घेतील त्यामुळे महापालिकेच्या शाळांमधिल विद्यार्थी गळतीला आपोआप आळा बसेल. बालवाडी शिक्षणासाठी शिक्षिका व मदतनीस यांची आवश्यकतेनुसार मानधनावर नियुक्ती करणेत यावी. सन २०२७ / २०२८ या शैक्षणिक वर्षापासून सदर बालवाडी सुरु करण्यासाठी आवश्यक ती पूर्व तयारी करणेत यावी. यासाठी आवश्यक असणाऱ्या खर्चाची सन २०२७ / २०२८ चे अर्थसंकल्पात तरतुद करावी. तसेच या बाबत प्रोत्साहन मिळावे यासाठी महानगरपालिकेच्या विद्यानिकेतन व इतर काही विद्यालयांमध्ये सध्या चालु असणारे बालवाडी मधील विद्यार्थ्यांना चालु शैक्षणिक वर्षामध्ये शैक्षणिक साहीत्य वाटप करुन त्याचा खर्च सन २०२६ / २०२७ चे शालांतर्गत अनुदान निधी या उपशिर्षातुन करणेत यावा. यासही ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक : र. भा. रजपुते.

अनुमोदक : अ. दे. डाळया.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. 920
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ४० : इचलकरंजी महानगरपालिका इमारतीच्या जवळ असलेल्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी चौकात भारताचे माजी पंतप्रधान, उत्कृष्ट संसदपटू, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचा पुर्णाकृती पुतळा अटल प्रतिष्ठान, इचलकरंजी यांचे वतीने उभारणेस मंजुरी देणेबाबत मा. आमदार राहुल प्रकाश आवाडे यांनी मागणी केले कामी कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका इमारतीच्या जवळ असलेल्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी चौकात भारताचे माजी पंतप्रधान, उत्कृष्ट संसदपटू, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचा पुर्णाकृती पुतळा अटल प्रतिष्ठान, इचलकरंजी यांचे वतीने उभारणेस मंजुरी देणेबाबत मा. आमदार राहुल प्रकाश आवाडे यांनी मा. जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांचेकडे दि. ०४/०४/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे. याबाबत अप्पर जिल्हादंडाधिकारी यांनी दि. ०१/०५/२०२६ चे पत्रानुसार अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार कार्यालयाने भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेस महासभेची मंजुरी मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

इचलकरंजी महानगरपालिका इमारतीच्या जवळ असलेल्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी चौकात (आग्नेय व ईशान्येस रि.स.नं.५९६, नैऋत्येस रि.स.नं.५९२-ए व वाव्येस रि.स.नं.५९७-ए) भारताचे माजी पंतप्रधान, उत्कृष्ठ संसदपटू भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचा पुर्णाकृती पुतळा, अटल प्रतिष्ठान, इचलकरंजी यांच्या वतीने उभारण्यात येणार आहे. पुतळयाची उंची अंदाजे १२ फुट आहे.

सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय कं.पुतळा-३११६/प्र.क्र..३०८/२९ दि.०२/०५/२०१७ मधील तरतुदीनुसार शासन निर्णयातील नमूद पुतळे उभारण्यासंबंधिच्या मार्गदर्शक तत्वास अनुसरुन जिल्हास्तरीय गठीत पुतळा समितीचे मंजुरी नुसार पुतळा उभारणे आवश्यक आहे.

तरी भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचा पुतळा इचलकरंजी महानगरपालिका इमारतीच्या जवळ असलेल्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी चौकात भारताचे माजी पंतप्रधान, उत्कृष्ट संसदपटू, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचा पुर्णाकृती पुतळा अटल प्रतिष्ठान, इचलकरंजी यांचे वतीने उभारणेस मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय पुतळा समिती यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स.व. मुळीक

अनुमोदक : ना.बा. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. 929
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ४१ : आमदार स्थानिक विकास निधी कार्यक्रम अंतर्गत शहरातील विविध २०७ ठिकाणी खोदणेत आलेल्या विंधन विहरींवर वितरण व्यवस्था निर्माण करणेकरीता तयार करणेत आलेल्या रु. १,८९,११,८०९/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. जिल्हा नियोजन समिती, कोल्हापुर यांचेकडे सादर करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२५-२६ अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका हददीतील एकुण २०७ ठिकाणी विंधन विहीरींवर विदयुत मोटार बसविणे व तदअनुषंगिक कामे करणेकामी मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती, कोल्हापुर यांचेमार्फत प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार विहीत निविदा प्रक्रिया राबवुन याकामी मक्तेदारांची नेमणुक करणेत आलेली आहे. सदर मक्तेदारामार्फत ही कामे प्रगतीपथावर असुन काम अंतिम टप्प्यात आलेले आहे.

मा. सभापती, स्थायी समिती यांनी सदर २०७ ठिकाणच्या विंधन विहीरी करीताचे पाणी लोकवस्तीमध्ये वितरण करणे आवश्यक असुन याकामी निधी उपलब्ध करुन देणेकरीता मा. आमदार, इचलकरंजी विधानसभा मतदार संघ यांचेकडे पत्राव्दारे विनंती केलेली आहे. त्यास अनुसरुन मा. आमदार महोदय यांनी याकामीचे अंदाजपत्रक तयार करुन सदरचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे.

त्यानुसार २०७ ठिकाणी विंधन विहीरीवर वितरण व्यवस्था निर्माण करणेकरीता र.रु. १,८९,११,८०९/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन सदर अंदाजपत्रकास अनुसरुन प्रशासकीय मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, कोल्हापुर यांचेकडे सादर करणेस मंजुरी मिळणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी आमदार स्थानिक विकास निधी कार्यक्रम अंतर्गत शहरातील विविध २०७ ठिकाणी खोदणेत आलेल्या विंधन विहरींवर वितरण व्यवस्था निर्माण करणेकरीता तयार करणेत आलेल्या रु. १,८९,११,८०९/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. जिल्हा नियोजन समिती, कोल्हापुर यांचेकडे सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स. व. मुळीक.

अनुमोदक : ता. बा. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. 922
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ४२: इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये उद्यानातील ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करणेसाठी श्रेडर मशीन खरेदी करुन उद्यानामध्ये नाडेप पिट व शेड उभारणी करणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमधील शहीद भगतसिंग उद्यान,राणी बाग व सुंदर बाग या सर्व उद्यानामध्ये दैनदिन ३-४ टन ओला कचरा निर्माण होत असून सदर ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन व प्रक्रिया शास्त्रोक्त पद्धतीने करणे आवश्यक आहे. सध्यस्थितीत कचरा संकलन व प्रक्रिया करण्याची यंत्रणा अपुरी असल्यामुळे विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेमध्ये अडचणी निर्माण होत आहेत.परिणामी संबंधित ठिकाणी दुर्गंधी, अस्वच्छता व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर समस्या निर्माण होत आहेत.

घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अंतर्गत ओला कचऱ्याची शास्त्रोक्त, सुरक्षित व पर्यावरणपूरक पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने ओल्या कचऱ्याची योग्य व आधुनिक पद्धतीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

ओल्या कचऱ्याची त्वरित, संपूर्ण व प्रदूषणमुक्त विल्हेवाट लावण्यासाठी श्रेडर मशीन खरेदी करून उद्यानामध्ये नाडेप पिट व शेड उभारणे हा परिणामकारक व शाश्वत उपाय आहे. यामुळे दुर्गंधी, प्रदूषण कमी होऊन उद्यानातील स्वच्छता व पर्यावरणीय स्थितीत सुधारणा होईल.त्यामुळे श्रेडर मशीन खरेदी करून उद्यानामध्ये नाडेप पिट व शेड उभारणी करणे अत्यावश्यक व तातडीचे आहे, तसेच सदर प्रकल्पाचे देखभाल व दुरुस्तीचे काम तज्ञ व्यक्ती (मक्तेदार) यांच्याकडे देणे योग्य होईल तसेच सदर प्रकल्पासाठी आवश्यक खर्च महानगरपालिका निधीतून (घनकचरा व्यवस्थापन ) उपलब्ध करून देता येईल.

यानुसार इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील शहीद भगतसिंग उद्यान,राणी बाग व सुंदर बाग या सर्व उद्यानामध्ये योग्य जागेची निवड करून श्रेडर मशीन खरेदी करून उद्यानामध्ये नाडेप पिट व शेड उभारणीस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार शहीद भगतसिंग उद्यान,राणी बाग व सुंदर बाग याठिकाणी श्रेडर मशीन खरेदी करून उद्यानामध्ये नाडेप पिट व शेड उभारणीस मंजुरी देणेत येत असुन प्रकल्पाचे देखभाल व दुरुस्तीचे काम तज्ञ व्यक्ती (मक्तेदार) यांच्याकडे देणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स. व. मुल्ला

अनुमोदक : ता. बा. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६/
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. 923
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ४३ : खेळाडु कोटयातुन क्रीडा अधिकारी पदी थेट नियुक्ती देणेबाबत श्री. अजिंक्य आण्णासो रेडेकर यांचे दि. ०७/०७/२०२५ चा अर्जाबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

## ठराव

इचलकरंजी महानगरपालिकेच्या क्रिडा विभागाकडे रिक्त असलेल्या क्रिडा अधिकारी पदी श्री. अजिंक्य आण्णासो रेडेकर यांची थेट नियुक्ती देणेबाबत प्रकाश आवाडे, माजी वस्त्रोद्योग मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दि. ०६/०४/२०२६ चे पत्रानुसार मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे विनंती केली असुन सदर पत्रामध्ये त्यांनी खालील प्रमाणे मुद्दे नमुद केले आहेत.

"इचलकरंजी येथील श्री.अजिंक्य रेडेकर यांनी आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव क्षेत्रात भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांनी शरीरसौष्ठव क्षेत्रात महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. १) पुणे येथील मिस्टर युनिव्हर्स स्पर्धा (८० किलो वजन गट) सुवर्णपदक, २) भारत श्री स्पर्धा - २ सुवर्ण पदक व कांस्य पदक, ३) फेडरेशन कप राष्ट्रीय स्पर्धा ४ सुवर्णपदक व सर्वोत्कृष्ट खेळाडू, ४) ऑल इंडिया युनिव्हर्सिटी १ सुवर्णपदक व १ कांस्य पदक, ५) ज्युनि. भारत श्री स्पर्धा ३ सुवर्ण पदक, ६) महाराष्ट्र श्री राज्य शरीरसौष्ठव ८ सुवर्ण, ७) महाराष्ट्र श्री २०२६ किताब, ८) ज्युनि. महाराष्ट्र श्री राज्य शरीर सौष्ठव स्पर्धा १ सुवर्ण पदक व २ कांस्य पदक, अनेक राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांत सुवर्ण पदके मिळवून इचलकरंजीचे, महाराष्ट्राचे व देशाचे नाव उंचावले आहे. या कामगिरीबद्दल सन २०१८ साली महाराष्ट्र शासनाचा राज्यातील सर्वोच्च शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार श्री. अजिंक्य रेडेकर यांना प्राप्त झाला असून, हा मानाचा सन्मान मिळवणारे ते इचलकरंजीतील पहिले खेळाडू आहेत. शासन निर्णय क्र. खेआक्ष-१५२२/प्र.क्र.०६/क्रीयुसे-२, दि.०९ जुलै, २०२४ ने आंतरराष्ट्रीय व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्यांना थेट नियुक्तीने क्रीडा अधिकारी पद देणेचा निर्णय झाला आहे. महाराष्ट्रातील काही महापालिकांमध्ये थेट नियुक्त्या दिल्या असून इतर महापालिकांमध्ये आंतरराष्ट्रीय तसेच शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्यांना असे पद थेट नियुक्तीद्वारे देण्यात आले आहे. यामध्ये पुणे महापालिकेने पै. शिवराज राक्षे यांना, तर सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेने श्रीमती स्नेहांकीता वरुटे यांची नियुक्ती दिली आहे. इचलकरंजी महापालिकेत नव्याने निर्माण झालेले क्रीडा अधिकारी हे पद रिक्त आहे. श्री. अजिंक्य रेडेकर हे उच्च शिक्षित असून सरकारी नोकरीपासून अद्याप वंचित आहेत. त्यामुळे त्यांना शासन निर्णयाप्रमाणे इचलकरंजी महापालिकेत क्रीडा अधिकारी पदावर नियुक्ती देणेबाबत आपण सबंधितांना आदेश करावेत अशी मागणी केली आहे.

उक्त पत्रास अनुसरून त्या पत्रावर, मा.मुख्यमंत्रीमहोदय यांनी "अ.मु.स. न.वि. २ – तपासून कार्यवाही करावी" असे निर्देश दिले असल्याने मा.कार्यासन अधिकारी, नवि १८ यांनी दि. १२/०५/२०२६ चे पत्रानुसार "सदरहू पत्रात नमूद केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करावी" असे कळविले आहे.

मा.कार्यासन अधिकारी, नवि १८ यांचे दि. १२/०५/२०२६ चे पत्र पाहता श्री.रेडेकर यांचा प्रस्ताव, मा.मुख्यमंत्रीमहोदय यांनी "अ.मु.स. न.वि. २ – तपासून कार्यवाही करावी" असे निर्देश दिले असल्याने, सदर निर्देशानुसार शासन नगरविकास विभागाकडून पडताळणी होवून, त्यांना नियुक्ती देण्याबाबत शासन स्तरावरून मान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे. शासनाकडून मान्यता देणेबाबतचे उचित आदेश प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करणे उचित होईल, असा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी श्री. अजिंक्य अण्णासो रेडेकर यांनी (१) पुणे येथे झालेल्या मिस्टर युनिव्हर्स स्पर्धेत (८० किलो वजनगट) सुवर्णपदक १, (२) भारत श्री स्पर्धेत सुवर्णपदक २ व कास्यपदक, (३) फेडरेशन कप राष्ट्रीय स्पर्धेत ४ वेळा सुवर्णपदक व सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरव, (४) ऑल इंडिया युनिव्हर्सिटी सुवर्णपदक १ व कास्य पदक १, (५) जूनियर भारत श्री स्पर्धेत ३ वेळा सुवर्णपदक, (६) महाराष्ट्र श्री राज्य शरीरसौष्ठव स्पर्धेत ७ वेळा सुवर्णपदक, (७) जूनियर महाराष्ट्र श्री राज्य शरीरसौष्ठव स्पर्धेत १ सुवर्णपदक व कास्य पदक २ याप्रमाणे यश तसेच या कामगिरीबद्दल सन २०१८ साली महाराष्ट्र शासनाचा राज्यातील सर्वोच्च शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये विविध सुवर्णपदके मिळविले असलेने त्यांना विशेष बाब म्हणुन इचलकरंजी महानगरपालिकेच्या क्रिडा अधिकारी पदी थेट नियुक्तीसाठी मा. शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि.पु.जोपडे    अनुमोदक : स.व.मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र.१२४
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ४४ : इचलकरंजी महानगरपालिका बांधकाम विभागाकडुन शहरातील विविध इमारती, डिव्हायडर, बागदुरुस्ती करणेकरीता एकुण ५५ बाबी अंतर्गत कामे करणेबाबत वार्षिक कामे सुरु असुन सदर कामी पुढील निविदा निघेपर्यंत मुदतवाढ देणेत आली असुन सदर कामी निविदा मागविणे कामी धोरणात्मक निर्णय होणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

उपरोक्त विषयांकीत कामी इचलकरंजी महानगरपालिका बांधकाम विभागकडून शहरातील विविध इमारती / डिव्हायडर / बाग दुरुस्ती करणे करीता एकूण ५५ बाबीं अंतर्गत कामे करणेबाबत (Rate Contract) वार्षिक काम म्हणून कामे सुरू आहेत.

उपरोक्त कामास दि. २९.०५.२०२५ अन्वये पुढील नविन निविदा निघेपर्यंत मुदत वाढ देणेत आली असून सुरु असलेली निविदा रदद करून नविन निविदा मागविणेस कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका बांधकाम विभागाकडुन शहरातील विविध इमारती, डिव्हायडर, बागदुरुस्ती करणेकरीता एकुण ५५ बाबी अंतर्गत कामे करणेबाबतचे मक्तेदार मे. अरबाज इंजिनिअरींग ॲंड सिव्हिल कन्स्ट्रक्शन यांचे काम रद्द करणेत येत आहे. मा.महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार मक्तेदार मे. अरबाज इंजिनिअरींग ॲंड सिव्हिल कन्स्ट्रक्शन यांनी केलेल्या कामांची चौकशी करुन त्याचा अहवाल मा.महासभेसमोर सादर करणेत यावा.

तसेच पावसाळयाचे दिवस असलेने शहरातील रस्त्यावरील खडी मुरुमाचे पॅचवर्क व विद्युत विभागाकडील देखभाल दुरुस्ती तसेच महानगरपालिकेची सन २०२६/२०२७ सालची घरफाळा व पाणीपट्टी देयके छापून घेणे आवश्यक असलेने स्टेशनरी व छपाई ही कामे वगळता. महानगरपालिकेच्या अन्य सर्व विभागातील सध्या असणारे RC (रेट कॉन्ट्रॅक्ट) करार ज्यांची मुदत संपली आहे त्यास मुदतवाढ देऊ नये. तसेच ज्यांची मुदत संपली नाही असे RC (दर करार) मुदतपुर्व संपुष्टात आणुन ते रद्द करणेत येत आहेत.

सूचक : स. व. मुळीक

अनुमोदक : सु. बा. कागते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १२५
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ४५ : स्टेशन रोड पंचरत्न मंगल कार्यालय समोरील स्वागत कमानीस हिंदु हृदयसम्राट स्वर्गीय श्रीमान बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार असे नामकरण करणेबाबत श्री. शिवाजी संभाजी पाटील, नगरसेवक, भाऊसाहेब बाबुराव आवळे, शिवसेना जिल्हाप्रमुख, संजय चौगुले, जिल्हाप्रमुख व इचलकरंजी नागरीक मंच यांनी मागणी केलेबाबत.

**ठराव**

स्टेशन रोड पंचरत्न मंगल कार्यालय समोरील स्वागत कमानीस हिंदु हृदयसम्राट स्वर्गीय श्रीमान बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार असे नामकरण करणेबाबत श्री. शिवाजी संभाजी पाटील, नगरसेवक, भाऊसाहेब बाबुराव आवळे, शिवसेना जिल्हाप्रमुख, संजय चौगुले, जिल्हाप्रमुख व इचलकरंजी नागरीक मंच यांनी मागणी केली आहे.

स्टेशन रोड पंचरत्न मंगल कार्यालयासमोर नगरपरिषदेमार्फत यापुर्वीच आर. सी. सी. स्वागत कमान उभारणेत आलेली आहे. सदरची कमान उभारून अंदाजे २५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. त्यामुळे या कमानीचे स्ट्रक्चरल ऑडीट करून घेणेबाबत महानगरपालिके मार्फत कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे या कमानीचा स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल प्राप्त झालेनंतर या ठिकाणी असणारी जुनी कमान उपयोगात आणता येईल अगर कसे ? याबाबतची स्पष्टता होईल.

अर्जदार यांनी मागणी केले प्रमाणे सदर ठिकाणच्या परिसराचे सुशोभिकरण करणे व या ठिकाणी नवीन स्वागत कमान उभा करणे यासाठी महानगरपालिकेच्या पॅनेलवरील आर्किटेक्चर इंजिनिअर यांचेकडून या कामाचे आराखडे व अंदाजपत्रके तयार करून घ्यावे लागणार आहेत.

तसेच शहरातील विविध ठिकाणी स्वागत कमान बांधणेबाबत जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.नियो/कार्या-१८/पर्यटन/संकीर्ण/२०२६/६६० दि.०८/०४/२०२६ नुसार याकामी कार्यवाही सुरू आहे. सदर स्वागत कमानीस अर्जदार यांचे मागणीप्रमाणे नांव देणेबाबत मा.महासभेकडून निर्णय घेणे उचित होईल असा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी स्टेशन रोड पंचरत्न मंगल कार्यालय समोरील सद्या वापरात असलेली किंवा कार्यालयाने प्रस्तावात नमुद केले नुसार नवीन स्वागत कमान उभारणेत आलेस सदर कमानीस हिंदु हृदयसम्राट स्वर्गीय श्रीमान बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार असे नामकरण करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : [signature] ता. बा. पोवार.

अनुमोदक : [signature] स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. १२६
दि. २५/०६/२०२६

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

विषय क्र. ४६ : इचलकरंजी महानगरपालिकेच्या आसरा नगर येथील २० एम. एल. डी. मलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रीया केलेले पाणी यड्राव परिसरातील व आसपासच्या शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करुन देणेस व बौद्ध विहार, टाकवडे वेस येथील १८ एम. एल. डी. मलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रीया केलेले पाणी पाईपलाइन द्वारे टाकवडे वेस परिसरातील शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पाईपलाइन टाकणे, वितरण व्यवस्था उभारणे तसेच आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करुन देणेकामी अंदाजपत्रक तयार करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

## ठराव

इचलकरंजी शहर व परिसरामध्ये औदयोगिक सांडपाण्यामुळे काळा ओढा तसेच पंचगंगा नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करीत असून, या संदर्भात विविध सामाजिक संस्था, पर्यावरण प्रेमी तसेच नागरिकांकडून सातत्याने मागण्या करण्यात येत आहेत. सध्या आंदोलन अंकुश संघटना यांच्या मार्फत काळा ओढा प्रदूषण रोखण्यासाठी विविध स्तरावर आंदोलन व जनजागृती करण्यात येत असून, दि. २५/०५/२०२६ रोजीच्या निवेदनाद्वारे महानगरपालिका हद्दीतील मलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रिया केलेले पाणी नदीपात्रात किंवा नाल्यामध्ये न सोडण्याबाबत इकडे मागणी करण्यात आलेली आहे.

इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रामध्ये सध्या दोन प्रमुख मलशुद्धीकरण केंद्रे कार्यरत असून त्यामध्ये आसरा नगर येथील २० द.ल.लि. क्षमता असलेले मलशुद्धीकरण केंद्र व बौद्ध विहार, टाकवडे वेस येथे १८ द.ल.लि. क्षमता असलेले मलशुद्धीकरण केंद्र यांचा समावेश होतो. सदर प्रकल्पामध्ये शहरातील सांडपाण्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्यात येते तदनंतर प्रक्रिया केलेले पाणी नाल्यामध्ये सोडण्यात येते. या प्रक्रियेमुळे पाण्याची गुणवत्ता सुधारली जात असली तरी सद्यस्थितीत या प्रक्रियायुक्त पाण्याचा पुरेशा प्रमाणात पुनर्वापर होत नसल्याने पाणी नाल्याद्वारे नदीपात्रात मिसळत आहे.

सद्यस्थितीत आसरा नगर येथील २० द.ल.लि. मलशुद्धीकरण केंद्रातून प्रक्रिया केलेले पाणी यड्राव नाल्यामार्फत पंचगंगा नदीमध्ये मिसळते व बौद्ध विहार, टाकवडे वेस येथील १८ द.ल.लि. मलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रिया केलेले पाणी काळा ओढ्यामार्फत पुढे पंचगंगा नदीमध्ये मिसळते. नदीपात्रातील प्रदूषण नियंत्रणासाठी महानगरपालिकेकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्या तरी प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापराबाबत अधिक प्रभावी कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे निदर्शनास येत आहे.

सदर कामी इचलकरंजी महानगरपालिकमार्फत दि. २९/०४/२०२६ रोजी पंचगंगा नदी प्रदुषण मुक्ती समिती स्थापन करणेत आली असुन या समिती मार्फत इचलकरंजी शहरातील काळा ओढया मार्फत होणा-या प्रदुषणाच्या अनुषंगाने शहरातील प्रोसेस उदयोग व महानगरपालिकेचे मलशुध्दीकरण केंद्र यास समिती सदस्यांनी वेळोवेळी स्थळ पाहणी केली आहे. सदर समितीच्या बैठकीमध्ये शहरातील मलशुध्दीकरण केंद्रातील प्रक्रिया केलेले पाणी आसपासच्या शेतक-यांना देणेत यावे असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार आसरा नगर येथील २० द.ल.लि. मलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रिया केलेले पाणी यड्राव परिसरातील व आसपासच्या शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे व बौद्ध विहार, टाकवडे वेस येथील १८ द.ल.लि. मलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रिया केलेले पाणी पाईपलाईनद्वारे टाकवडे वेस परिसरातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पाईपलाईन टाकणे, वितरण व्यवस्था उभारणे तसेच आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक राहणार आहे.

सदर उपाययोजना राबविल्यास प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर मोठ्या प्रमाणात होण्यास मदत होईल. यामुळे काळा ओढा व पंचगंगा नदीमध्ये मिसळणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी होऊन नदी प्रदूषण कमी करण्यास हातभार लागेल. तसेच शेतीसाठी पर्यायी पाण्याचा स्रोत उपलब्ध झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होईल. विशेषतः उन्हाळ्याच्या काळात पाण्याची टंचाई निर्माण होत असताना प्रक्रिया केलेले पाणी शेतीसाठी उपयोगामध्ये आल्यास त्याचा सकारात्मक परिणाम कृषी उत्पादनावर होण्याची शक्यता आहे.

पर्यावरण संरक्षण, जलसंधारण व पुनर्वापर या दृष्टीने देखील सदर योजना अत्यंत उपयुक्त असून केंद्र शासन व राज्य शासनाच्या पुनर्वापर व पुनर्चक्रण धोरणांशी सुसंगत आहे. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा योग्य प्रकारे वापर केल्यास नदी प्रदूषण कमी करण्याबरोबरच नैसर्गिक जलस्रोतांवरील ताण देखील कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या पर्यावरणपूरक उपक्रमामध्ये सदर कामाचा समावेश होणे आवश्यक आहे.

वरील बाबींचा विचार करता, महानगरपालिकेच्या दोन्ही मलशुद्धीकरण केंद्रांमधील प्रक्रिया केलेले पाणी परिसरातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे तसेच नदी प्रदूषण कमी करणेच्या अनुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार

Scanned with OKEN Scanner

करणेस व सदरचे काम सन २०२६-२०२७ अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभागाकडील भुयारी गटार योजना देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध निधीतून करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार इचलकरंजी महानगरपालिकेच्या आसरा नगर येथील २० एम. एल. डी. मलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रीया केलेले पाणी यड्राव परिसरातील व आसपासच्या शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करुन देणेस व बौद्ध विहार, टाकवडे वेस येथील १८ एम. एल. डी. मलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रीया केलेले पाणी पाईपलाइन द्वारे टाकवडे वेस परिसरातील शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पाईपलाइन टाकणे, वितरण व्यवस्था उभारणे तसेच आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करुन देणेकामी अंदाजपत्रक तयार करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ता. बा. पोवार.

अनुमोदक : Satish स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६ 
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. 926
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ४७ : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये नियमित व सुरळीत पाणीव्यवस्थेमध्ये वारंवार होणाऱ्या गळत्या काढणेकरीता आधुनिक तंत्रज्ञान आधारीत लिक डिटेक्टर मशीन खरेदीकामी अंदाजपत्रक तयार करणेस व सदरचे काम पंधरावा वित्त आयोग बंधनकारक निधीमधुन प्रस्तावित करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये नियमित व सुरळीत पाणी वितरण व्यवस्थेकरीता शहरामध्ये संपुर्ण भागामध्ये पाणी वितरण नलिका टाकणेत आलेली आहे. सध्यस्थितीत अनेक वितरण नलिका हया जुन्या झाल्या असुन तसेच पाण्याचा कमी जास्त दाबामुळे, तसेच शहरामध्ये सध्या विविध विकास कामे सुरु असलेने पाईप लाईन गळती होण्याचे प्रमांण वाढलेले आहे. अनेक ठिकाणी वितरण नलिकांमध्ये अंतर्गत गळती होत असून, काही ठिकाणी सदर गळती प्रत्यक्ष दिसून येत नाही. परिणामी मोठ्या प्रमाणामध्ये पाण्याचा अपव्यय होत असुन नागरीकांचा रोषास सामोरे जावे लागत असुन प्रत्यक्ष लिकेज शोधणेकरीता बराच वेळ जात असलेने भागातील नागरिकांना कमी दाबाने पाणीपुरवठा होणे, अनियमित पाणीपुरवठा होणे तसेच रस्त्यांची दुरावस्था होण्याच्या प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे.

सध्या अशा वारंवार होणा-या गळत्या काढणेकरीता अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत नसुन भूमिगत पाईपलाईन मधील सूक्ष्म गळती अचूकपणे शोधणे कठीण होत आहे. त्यामुळे अनेक वेळा अंदाजाने खोदकाम करावे लागते, पर्यायी रस्ते खोदकामामुळे नागरिकांना वाहतूक व दैनंदिन हालचालींमध्ये अडथळा निर्माण होत असुन वेळेचा, मनुष्यबळ तसेच आर्थिक खर्च वाढणेची शक्यता नाकारता येत नाही.

वरील बाबींचा विचार करता, पाणीपुरवठा यंत्रणेमार्फत शहरातील होणा-या वांरवार गळत्या व पाण्याचा तसेच वेळेचा अपव्यय व होणा-या नागरीकांची गैरसोय टाळणेकरीता आधुनिक तंत्रज्ञानाधारित "लिक डिटेक्टर मशीन" खरेदी करणे आवश्यक आहे. सदर मशिन खरेदी केलेस उक्त कामी होणा-या अडचणीं मध्ये सुधारणा होवुन शहरातील नागरीकांना वेळेत पाणी पुरवठा करणे सोयीचे होणार आहे. तसेच पाण्याची होणारी नासाडी कमी होण्यास मदत होवुन शहरातील पाणीपुरवठा अधिक कार्यक्षम व नियमित ठेवणे शक्य होईल. पाणी गळतीमुळे होणारे महसुली नुकसान कमी होईल तसेच पाणीपुरवठा विभागाच्या देखभाल व दुरुस्ती कामांमध्ये कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

तरी इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये नियमित व सुरळीत पाणी वितरण व्यवस्थेमध्ये वारंवार होणा-या गळत्या काढणेकरीता आधुनिक तंत्रज्ञानाधारित "लिक डिटेक्टर मशीन" खरेदी करणेकामी अंदाजपत्रक तयार करणेस तसेच सदरचे काम प्राप्त १५ वा वित्त आयोग बंधनकारक निधीमधुन प्रस्तावित करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये नियमित व सुरळीत पाणीव्यवस्थेमध्ये वारंवार होणाऱ्या गळत्या काढणेकरीता आधुनिक तंत्रज्ञान आधारीत लिक डिटेक्टर मशीन खरेदीकामी अंदाजपत्रक तयार करणेस व सदरचे काम शासकिय निधी, महापालिका निधी अथवा पंधरावा वित्त आयोग बंधनकारक निधीमधुन प्रस्तावित करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : [signature] ता. बा. पोवार.

अनुमोदक : [signature] स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९२८
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ४८ : लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्र. १५ केर्ले मळा ते आरगे भवन ओढा पर्यंत हाफ राऊंड गटर करणेचे काम मंजुर असुन सदर कामाचे ठिकाणी असलेल्या रस्त्याच्या कब्ज्या संदर्भात वाद सुरु असलेने सदरचे काम केर्ले मळा ते आरगे भवन ओढा येथे न करता मधुबन हौसिंग सोसायटी येथे टाकळीकर घर ते सचिन घोरपडे घर, मोकाशे घर ते स्वानंद कुलकर्णी घर या ठिकाणी करणेबाबत सौ प्रमिला रविंद्र जावळे, नगरसेविका यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

सदर कामी कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव वाचणेत आला.
तरी सदरचे काम हे सन २०२४-२५ सालातील असलेने व योजनेची मुदत संपल्याने सदरचा प्रस्ताव रद्द करणेत येत आहे.

सूचक : ना. बा. पोवार.

अनुमोदक : Satish स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९२८
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ४९ : इचलकरंजी शहरातील महासत्ता चौक व सांगली नाका या दोन ठिकाणी नविन स्वयंचलित सिग्नल यंत्रणा बसविणेबाबत शहर वाहतुक नियंत्रण शाखा यांचे मार्फत मागणी आलेकामी कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

इचलकरंजी शहर हे वस्त्रोद्योग नगरी शहर असल्याने औद्योगिक दृष्ट्या शहरात मोठ्या प्रमाणात इंडस्ट्रीज इस्टेट,कारखाने आहेत त्यामुळे शहरात बाहेरील जिल्ह्यातून व राज्यातून अवजड वाहने तसेच व्यापाराच्या दृष्टीने सुद्धा मोठ्या प्रमाणात चारचाकी व दुचाकी वाहने मोठ्या प्रमाणात येत - जात असतात, तसेच इचलकरंजी शहरातील वाढत्या वाहनाच्या संख्येमुळे मोठ्या अवजड,हलकी व दुचाकी वाहनाची संख्या वाढलेली आहे. त्यामुळे शहरात वाहतुकीची समस्या निर्माण होऊ नये वाहतूक सुरळीत रहावी सर्व सामन्य नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू नये व याकरिता खालील नमूद ठिकाणी स्वयंचलित सिग्नल यंत्रणा बसविणेकामी संदर्भीय पत्राद्वारे शहर वाहतूक नियत्रण शाखेमार्फत इकडे पत्रव्यवहार करणेत आला आहे.

१.सांगली नाका

२.उत्तम प्रकाश टॉकी चौक

सध्या इचलकरंजी शहरामध्ये यापूर्वी वाहतूक नियत्रण शाखे मार्फत मागणी केलेनुसार खालील नमूद ठिकाणी स्वयंचलित सिग्नल यंत्रणा कार्यान्वित आहेत.

१. छ.शिवाजी महाराज पुतळा चौक

२. छ.शाहू महाराज पुतळा चौक

३. डेक्कन चौक

४. राजाराम स्टेडियम चौक

५. छ.संभाजी महाराज चौक

६. झेंडा चौक

वरील सर्व स्वयंचलित सिग्नल यंत्रणा महानगरपालीकेमार्फत बसविणेत आल्या असून याची देखभाल दुरुस्ती करणेचे काम शहर वाहतूक शाखेच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेमार्फत करणेत येत आहे.

सदर बाबत शहर वाहतूक शाखा यांचेशी झालेल्या समक्ष चर्चेनुसार 1.सांगली नाका 2. महासत्ता चौक अशा दोन ठिकाणी नवीन सिग्नल यंत्रणा बसविणे बाबत ठिकाणे निश्चित केलेली असुन सदर ठिकाणी नवीन स्वयंचलित सिग्नल यंत्रणा बसविणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी शहरातील महासत्ता चौक व सांगली नाका या दोन ठिकाणी नविन स्वयंचलित सिग्नल यंत्रणा बसविणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : Satish स.व.मुळीक

अनुमोदक : ना.बी.पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. 930
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ५०: गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय येथे वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके, दिवाळी अंक तसेच महानगरपालिकेच्या इतर विभागांना वृत्तपत्रे पुरवठादार अनिल भाऊसो सुर्यवंशी यांचेकडुन छापिल किमंतीवर घेणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाकरिता वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके आणि दिवाळी अंक तसेच महानगरपालिकेच्या इतर विभागांना वृत्तपत्रे छापील किमतीवर कायमस्वरूपी पुरविणेबाबत श्री अनिल भाऊसो सूर्यवंशी यांचे नावे ठराव होणेकामी दि. १२/०५/२०२६ च्या अर्जान्वये मा. महापौर यांना विनंती केली आहे.

सदर अर्जात त्यांनी श्री अनिल भाऊसो सूर्यवंशी यांचे वडील भाऊसो बाबू सूर्यवंशी यांना तत्कालीन नगरपरिषद असताना मे. स्थायी समिती ठराव नं.१४७ दि.०३/०३/२०१० नुसार भाऊसो बाबू सूर्यवंशी, वृत्तपत्र मक्तेदार यांचे कडून छापील किमतीवर वृत्तपत्रे व नियतकालिके कायमस्वरूपी घेणेस मंजुरी देणेत आली होती. त्यानंतर ते वयोवृद्ध झालेने सदर वृत्तपत्रे व नियतकालिके छापील किमतीवर पुरविणेकरिता श्री. अनिल भाऊसो सूर्यवंशी यांचे नावे मे. कौन्सिल ठराव नं.१२६ दि. २२/०१/२०१८ नुसार ठराव करून घेणेत आला आहे. यानुसार गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय येथे वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके आणि दिवाळी अंक आणि महानगरपालिकेच्या इतर विभागांना वृत्तपत्रे पुरवित आहेत. इचलकरंजी नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले असलेने गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाकरिता वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके आणि दिवाळी अंक तसेच महानगरपालिकेच्या इतर विभागांना वृत्तपत्रे पुरविणेकामी महानगरपालिकेचा ठराव करून घेणे आवश्यक असलेने तसेच सदर कामावर त्यांचा व त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असलेने त्यांची परिस्थिती विचारात घेऊन त्यांच्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा असे नमूद केले आहे.

वृत्तपत्रे व नियतकालिके छापील किमतीवर पुरविणेबाबत मे. कौन्सिल ठराव नं. १२६ दि. २२/०१/२०१८ नुसार श्री. अनिल भाऊसो सूर्यवंशी यांचे नावे ठराव करून घेणेत आला होता. यानुसार गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाकरीता वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके आणि दिवाळी अंक आणि वाचनालयाकडून महानगरपालिकेच्या इतर विभागांना वृत्तपत्रे पुरवित आहेत. इचलकरंजी नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले असलेने यापूर्वी नगरपरिषद असताना करणेत आलेल्या ठरावानुसार महानगरपालिकेचा ठराव करणे आवश्यक आहे.

पुरवठादार श्री अनिल भाऊसो सूर्यवंशी यांना गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाकरिता वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके आणि दिवाळी अंक तसेच वाचनालयाकडून महानगरपालिकेच्या इतर विभागांना वृत्तपत्रे छापील किमतीवर कायमस्वरूपी पुरविणेस महासभेची मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय येथे वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके, दिवाळी अंक तसेच महानगरपालिकेच्या इतर विभागांना वृत्तपत्रे पुरवठादार अनिल भाऊसो सुर्यवंशी यांचेकडुन छापिल किमंतीवर कायमस्वरूपी घेणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : Satish स. व. मुळीक.

अनुमोदक : ता. बा. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १३३
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ५३ : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम २१ (२) नुसार इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे त्रयस्त एजन्सी मार्फत कर आकारणीचे मुल्यांकण करणेस व मिळकत धारकांना चतुर्थ वार्षिक कर आकारणीस अधिन राहुन मागणी बिले देणेस मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा. महासभा ठराव क्र. ७१ दि. २०/०५/२०२६ नुसार पुढील मिटींगसमोर सादर करणेबावत झालेल्या निर्णयाचा विचार करणे.

## ठराव

सदर विषयाबाबत लेखीसूचना आली, त्यास एक उपसूचना प्राप्त झाली ती खालील प्रमाणे.

## उपसूचना

इचलकरंजी शहरात नगरपालिका अस्तित्वात येवून १०० वर्षे पूर्ण झाली. आता नगरपालिकेची महानगरपालिका झाली आहे. आत्तापर्यंत कर आकारणी करणेचे काम हे आपल्या म.न.पा. कर्मचा-यांनींच केले आहे. मालमत्ता मोजणे, असेसमेंट नोंदी घेणे, घरफाळा पावती वितरण करणे ही सर्व कामे कर्मचारी करीत आले आहेत.

परंतु प्रशासनाने जो प्रस्ताव आणला, त्यामध्ये घरफाळा कर आकारणी ०५ कोटी ५० लाख व नळ कनेक्शन आकारणी १.५० लाख अशी ०७ कोटीची रक्कम GIS प्रणालीसाठी आवश्यक आहे.

१. म.न.पा.ची आर्थिक स्थिती बरोबर नाही.
२. केंद्र शासनाची योजना आहे, केंद्र शासनाकडून निधी मिळावा यासाठी पाठपुरावा करावा.
३. ज्या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर GIS प्रणाली वापरली आहे तेथील माहीती घ्यावी.
४. GIS प्रणालीद्वारे कर आकारणी केल्या नंतर किती घरफाळा वाढ होणार आहे, हे स्पष्ट कळत नाही.
५. कर आकारणी ही महानगरपालिका कर्मचारी यांच्याकडूनच करुन घ्यावी.
६. ७ कोटी खर्च करुन कोणताही फायदा महानगरपालिकेला होणार नाही.
७. इतर ठिकाणच्यानगरपलिका व महानगरपालिका यांनी हे काम सुरु केले नाही, ते थांबविले आहे.
८. कोणत्या तरी कंपनीच्या घशात सदरचे टेंडर घालण्यासाठी हा निरुपयोगी प्रस्ताव आणण्यात आला आहे.

तरी सदरचा विषय म.न.पा. आर्थिक स्थिती पहाता रद्द करावा, ही विनंती.

सूचक : उ.मा.पाटील.                    अनुमोदक : र.गं.जाधव.

वरील उपसूचना मतास टाकली असता त्यास,

अनुकुल मते - १२                    प्रतिकुल मते - ३५                    तटस्थ - ०

वरील प्रमाणे मतदान होवून उपसूचनेस प्रतिकुल मते जास्त पडलेने उपसूचना बहुमतांनी नामंजुर करणेत आली.

यानंतर खालिल प्रमाणे आलेली मुळसूचना वाचणेत आली.

## मुळ सूचना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम २१ (२) नुसार इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे त्रयस्त एजन्सी मार्फत कर आकारणीचे मुल्यांकण करणेस व मिळकत धारकांना चतुर्थ वार्षिक कर आकारणीस अधिन राहुन मागणी बिले देणेस मंजुरी मिळणे बाबतचा कार्यालयीन प्रस्ताव वाचणेत आला.

इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्राचा सुनियोजित, पारदर्शक व आधुनिक पद्धतीने विकास करण्यासाठी महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ता, रस्ते, पाणीपुरवठा व्यवस्था, मलनिस्सारण, पावसाळी नाले, स्ट्रीट लाईट, सार्वजनिक मालमत्ता, उद्याने, वृक्षसंपदा, जलस्त्रोत, पर्यावरणीय घटक तसेच इतर नागरी पायाभूत सुविधांची अचूक व अद्ययावत माहिती उपलब्ध असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत विविध विभागांकडील माहिती वेगवेगळ्या स्वरूपात उपलब्ध असल्याने तिचे एकत्रित विश्लेषण व नकाशावर आधारित नियोजन करणे अडचणीचे ठरते. त्यामुळे महानगरपालिकेसाठी एकात्मिक GIS आधारित डिजिटल डेटाबेस तयार करणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक मालमत्तेचे Door-to-Door GIS Based Property Survey & Assessment करून मालमत्तेची भौगोलिक स्थिती, मालमत्ता क्रमांक, मालमत्ता धारकाची माहिती, वापराचा प्रकार, प्लॉट व बांधकाम क्षेत्रफळ, मजल्यांची संख्या, पाणी जोडणी, छायाचित्र, Latitude-Longitude व GIS Polygon इत्यादी माहिती संकलित करण्यात यावी. सदर माहिती विद्यमान मालमत्ता कर नोंदीशी जोडल्यामुळे नवीन/अनोंदणीकृत मालमत्ता, अतिरिक्त बांधकाम, वापरातील बदल व इतर विसंगती ओळखून मालमत्ता कर आकारणी अधिक अचूक, पारदर्शक व शास्त्रीय पद्धतीने करता येईल.

त्याचप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी अद्ययावत GIS Digital Base Map तयार करण्यात यावा. सदर Base Map मध्ये महानगरपालिका व प्रभाग सीमा, Property / Plot Boundary, Survey / City Survey माहिती, रस्ते, वाहतूक सुविधा, पाणीपुरवठा, ड्रेनेज, मलनिस्सारण, स्ट्रीट लाईट, सार्वजनिक मालमत्ता, घनकचरा व्यवस्थापन, उद्याने, जलस्रोत व इतर आवश्यक नागरी पायाभूत सुविधांचे GIS Mapping करण्यात यावे. हा Base Map महानगरपालिकेच्या विभागांसाठी Common Spatial Database म्हणून वापरण्यात यावा.

महानगरपालिकेच्या विविध विभागांचे कामकाज एकत्रित व डिजिटल करण्यासाठी Integrated Municipal Management System (IMMS) विकसित/कार्यान्वित करण्यात यावा. Property Tax, Water Tax, Demand & Collection, License, Municipal Asset Management, Complaint Management, Solid Waste, Street Light, Road, Drainage, Water Supply, Tree & Garden Management, GIS, Reports, Dashboard Citizen Services यांसारख्या आवश्यक Modules चा समावेश करण्यात यावा.

GIS व IMMS यांचे एकत्रीकरण करून प्रत्येक Property, Municipal Asset, Utility, Road Asset व इतर घटकांना Unique ID देण्यात यावा. GIS Map वर संबंधित Property किंवा Asset निवडल्यास त्याची IMMS मधील माहिती उपलब्ध व्हावी आणि IMMS मधून संबंधित Property/Asset चे GIS Location पाहता यावे. यामुळे महानगरपालिकेला Map-Based Municipal Management System उपलब्ध होऊन नियोजन, देखभाल, कर आकारणी, मालमत्ता व्यवस्थापन व निर्णय प्रक्रिया अधिक प्रभावी होईल.

महानगरपालिका क्षेत्राच्या पर्यावरणीय व शाश्वत विकासासाठी GIS Based Tree Census, Tree Canopy Mapping आणि Biodiversity Mapping देखील या प्रकल्पाचा भाग असावा. शहरातील वृक्षांचे स्थान, Tree ID, प्रजाती, उंची, खोडाचा व्यास, Canopy Diameter, आरोग्यस्थिती, छायाचित्र इत्यादी माहिती GIS मध्ये नोंदवून प्रभागनिहाय Tree Canopy व Green Cover चे विश्लेषण करण्यात यावे. त्याचप्रमाणे जलस्रोत, Wetlands, Green Areas, Urban Forest, Biodiversity Areas, Heritage/Important Trees, Native Species, Green Corridors, Bird Habitat व पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचे GIS Mapping करण्यात यावे.

वरील सर्व बाबींचा एकत्रित विचार करता, GIS Based Property Survey & Assessment + GIS Digital Base Map + Comprehensive GIS Database + IMMS + Tree Census & Tree Canopy + Biodiversity & Environmental Mapping हा एकात्मिक प्रकल्प इचलकरंजी महानगरपालिकेसाठी राबविणे आवश्यक आहे.

यासाठी इचलकरंजी महानगरपालिकेची महासभा विचारविनिमय करून असा निर्णय करीत आहे की, महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता, नागरी सुविधा, पायाभूत सुविधा, सार्वजनिक मालमत्ता व पर्यावरणीय घटकांचे GIS आधारित सर्वेक्षण व मॅपिंग करून एकात्मिक डिजिटल GIS Database तयार करण्यात यावा. सदर Database चा वापर महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या दैनंदिन कामकाजासाठी, नियोजनासाठी, कर आकारणीसाठी, मालमत्ता व्यवस्थापनासाठी व भविष्यातील विकासकामांसाठी करण्यात यावा.

१. GIS Based Property Survey & Assessment

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे Door-to-Door GIS Based Survey करण्यात यावे. प्रत्येक मालमत्तेला Unique Property ID/GIS ID देऊन तिची GIS Location व Polygon तयार करण्यात यावा. सर्वेक्षणामध्ये मालमत्ता धारकाची माहिती, पत्ता, Plot Area, Built-up Area, वापराचा प्रकार, मजल्यांची संख्या, बांधकामाचा प्रकार, पाणी जोडणी, शौचालय, व्यावसायिक वापर, छायाचित्र व इतर कर आकारणीसाठी आवश्यक माहिती संकलित करण्यात यावी.

सर्वेक्षणातून प्राप्त माहिती विद्यमान Property Tax Database शी जोडून नवीन मालमत्ता, कर आकारणीपासून वंचित मालमत्ता, अतिरिक्त बांधकाम व वापरातील बदल यांची ओळख करण्यात यावी.

२. GIS Base Map Infrastructure Mapping

महानगरपालिका क्षेत्रासाठी अचूक Digital GIS Base Map तयार करून त्यामध्ये खालील प्रमुख घटकांचे Mapping करण्यात यावे :

Scanned with OKEN Scanner

महानगरपालिका, प्रभाग व प्रशासकीय सीमा
Property / Plot Boundary, Survey Number City Survey Number
रस्ते, Footpath, Divider, Junction, Bridge व Culvert
Water Pipeline, Valve, Meter, Tank Borewell
Storm Water Drain, Sewer Line, Manhole STP
Street Light, Electrical Pole, Transformer a High Mast
Solid Waste Collection / Processing Facilities
Municipal Buildings, Schools, Hospitals, Gardens, Markets Public Assets
सर्व प्रमुख Municipal Assets ना Unique Asset ID देऊन त्यांची Location, Photograph, Condition व इतर संबंधित माहिती GIS Database मध्ये नोंदविण्यात यावी.

३. IMMS Implementation

महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी Integrated Municipal Management System विकसित / कार्यान्वित करण्यात यावा. यामध्ये Property Tax, Water Tax, Demand & Collection, License, Asset Management, Complaint Management, Solid Waste, Street Light, Road, Drainage, Water Supply, Tree & Garden Management, GIS, Reports / Dashboard व Citizen Services यांसारख्या Modules चा आवश्यकतेनुसार समावेश करण्यात यावा.

GIS आणि IMMS चे एकत्रीकरण करून Property व Asset आधारित Map Search, GIS Visualization, Department-wise Dashboard आणि Decision Support सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

४. Tree Census, Tree Canopy & Biodiversity

महानगरपालिका क्षेत्रासाठी GIS Based Tree Census करून प्रत्येक वृक्षाला Unique Tree ID देण्यात यावा. वृक्षाची प्रजाती, स्थान, उंची, खोडाचा व्यास, Canopy Diameter, आरोग्यस्थिती व छायाचित्र यांसारखी माहिती संकलित करण्यात यावी.

प्रभागनिहाय Tree Canopy Coverage व Green Cover Analysis करण्यात यावे. तसेच जलस्रोत, Wetlands, Green Areas, Urban Forest, Biodiversity Areas, Heritage/Important Trees, Native/Invasive Species, Green Corridors, Bird Habitat आणि पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचे GIS Mapping करण्यात यावे.

५. Dashboard & Reports

महानगरपालिकेसाठी Web GIS Dashboard तयार करून Property, Tax, Water, Roads, Drainage, Street Lights, Assets, Trees, Tree Canopy, Green Cover Biodiversity ft Ward-wise/Zone-wise #fr नकाशावर उपलब्ध करून देण्यात यावी. विविध विभागांसाठी Property, Asset, Tree, Infrastructure, Canopy, Biodiversity व इतर आवश्यक Reports उपलब्ध करून देण्यात यावेत.

Data Ownership & Future Updation

सदर प्रकल्पामध्ये तयार होणारा GIS Data, Property Database, Asset Database, Tree Database, Biodiversity Database, Maps, Photographs, Reports, Application Data Digital Data इचलकरंजी महानगरपालिकेच्या मालकीचा राहील. भविष्यात नवीन मालमत्ता, रस्ते, Utilities, Assets, वृक्ष व पर्यावरणीय घटकांची माहिती GIS Database मध्ये अद्ययावत करता येईल अशी प्रणाली विकसित करण्यात यावी.

वरील प्रमाणे कार्यवाही करणेस मंजुरी देणेत येत आहे.

अनुमोदक : ता.बा.पोवार

सूचक : स.व.मुळीक

वरील मुळसूचना मतास टाकली असता त्यास,

अनुकुल मते - ३५ प्रतिकुल मते - १२ तटस्थ - ०

वरील प्रमाणे मतदान होवून मुळसूचनेस अनुकुल मते जास्त पडलेने मुळसूचना बहुमतांनी मंजुर करणेत आली.

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५ ठराव क्र. ७३२
सर्वसाधारण सभा दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ५२ : टाकवडे वेस बौद्ध विहार येथील सांडपाणी उपसा केंद्रातील साचलेला गाळ काढण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक तयार करणे व निविदा प्रक्रीया राबविणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील टाकवडे वेस, बौद्ध विहार परिसर येथे सांडपाणी उपसा केंद्र कार्यरत आहे. सदर उपसा केंद्रामधून शहरातील विविध भागातून येणारे घरगुती सांडपाणी उपसा करून ते आसरा नगर येथील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प (STP) येथे प्रक्रिया करण्यासाठी पाठविण्यात येते. त्यामुळे शहरातील सांडपाणी व्यवस्थापनामध्ये सदर उपसा केंद्राची भूमिका महत्त्वाची आहे.

सदर उपसा केंद्रामध्ये सध्या १८० अश्वशक्ती चे ०२ व ९० अश्वशक्ती ०२ असे एकूण ४ उपसा पंप कार्यरत असून त्याद्वारे सांडपाण्याचा नियमित उपसा केला जातो. तथापि, सध्या उपसा केंद्राच्या इनलेट मेन रिसीव्हीग वेल , वेटवेल व मुख्य पंपिग वेलच्या तळामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ व कचरा साचलेला असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर गाळामुळे पंपांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत असून आवश्यक त्या क्षमता पाणी उपसा होत नाही . परिणामी सांडपाण्याचा उपसा होत नसल्याने तसेच गाळाचे प्रमाण अधिक वाढल्यास पंपाची कार्यक्षमता कमी होणे व पंपांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील बाबी विचारात घेता, सदर उपसा केंद्रामध्ये साचलेला गाळ तातडीने काढून टाकणे अत्यावश्यक आहे. सदर कामासाठी यांत्रिक पद्धतीने गाळ काढणे, त्याची सुरक्षित विल्हेवाट लावणे व उपसा केंद्राची स्वच्छता करणे आवश्यक आहे. सदरचे काम करण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री व तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यासाठी महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. उक्त कामाकरिता भुयारी गटर देखभाल व दुरुस्ती या लेखाशीर्ष मधून सन २०२६-२७ करिता तरतूद र.र ६.०० कोटी रकमेमधून सदरचे काम प्रस्तावित करणेत येणार आहे.

तरी टाकवडे वेस, बौद्ध विहार येथील सांडपाणी उपसा केंद्रामधील साचलेला गाळ काढण्याच्या कामासाठी आवश्यक अंदाजपत्रक तयार करणे व निविदा प्रक्रिया राबविण्यास मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी टाकवडे वेस बौद्ध विहार येथील सांडपाणी उपसा केंद्रातील साचलेला गाळ काढण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक तयार करणे व निविदा प्रक्रीया राबविणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ता. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १३४
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ५४ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील जैव व वैद्यकीय कचरा संकलन व प्रक्रिया करणेबाबतचा सद्या सुरु असलेला एस.एस. सर्व्हीसेस जयसिंगपुर यांचा मक्ता रद्द करुन नव्याने निविदा मागविणेबावत मा. सतिश वसंतराव मुळीक, सभापती, स्थायी समिती, मा. उदयसिंग मारुती पाटील, विरोधीपक्षनेता व मा. राजु संभाजी बोंद्रे, सदस्य यांनी मागणी केले कामी कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

इचलकरंजी महानरपालिका हद्दीतील जैव वैद्यकीय कचरा संकलन व प्रक्रिया प्रकल्प बी.ओ.टी. तत्वावर चालविणेसाठी मे.कौन्सील ठराव नं.२३ दि.३१/०५/२०१८ नुसार एस.एस.सर्व्हीसेस, जयसिंगपूर, तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषद आणि अध्यक्ष मेडिकल असोसिएशन, इचलकरंजी यांचेसोबत दि.०१/०६/२०१८ रोजी केलेल्या त्रिपक्षीय करारपत्राने १५ वर्षासाठी मुदतवाढ देणेत आलेनुसार सद्या त्यांचे काम सुरु आहे.परंतु सदर कामाबाबत इचलकरंजी महानगरपालिकेच्या माननीय यांची खालील नमुदप्रमाणे ३ पत्रे प्राप्त झाली आहेत.

मा.सदस्य इ.म.न.पा श्री.राजू बोंद्रे यांचे दि.१२/०३/२०२६ चे पत्र.

मा.विरोधी पक्ष नेता,इ.म.न.पा.श्री.उदयसिंग पाटील यांचे दि.०१/०६/२०२६ चे पत्र.

मा.सभापती, स्थायी समिती इ.म.न.पा.श्री.सतिश मुळीक यांचे दि.०९/०६/२०२६ चे पत्र.

सदर तीन्ही पत्रानुसार संबंधीतानी एस.एस.सर्व्हीसेस, जससिंगपूर यांचे जैव वैद्यकीय कचरा संकलन व प्रक्रिया प्रकल्प बी.ओ.टी. तत्वावर चालविणेसाठी मुदत वाढ दिलेनुसार सुरु असलेले काम रद्द करुन नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेबाबत सुचित केले आहे.

तथापि मे. कौन्सील ठराव नं. २३ दि. ३१/०५/२०१८ नुसार एस. एस. सर्व्हीसेस, जयसिंगपूर, तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषद आणि अध्यक्ष मेडिकल असोसिएशन, इचलकरंजी यांचेसोबत दि.०१/०६/२०१८ रोजी केलेल्या त्रिपक्षीय करार पत्रानुसार १५ वर्षासाठी मुदतवाढ देणेत आलेले सदरचे त्रिपक्षीय करारपत्र हे सद्या लागू असलेने व तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेचे मत्ता व दायित्व हे सद्या इचलकरंजी महानगरपालिका झाली असली तरी सदर कामी तत्कालीन नगरपरिषदेने २०१८ साली सदर कंपनी सोबत केले करारपत्र हे जीवीत व अबाधीत ठरत असलेने तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेच्या धोरणात्मक निर्णयानुसार मुदतपूर्व नव्याने कार्यवाही करणेसाठी सदर कामी केलेल्या त्रिपक्षीय करारा नुसार तांत्रिक व कायदेशीर अडचणी निर्माण होणेची शक्यता आहे तसेच सदर कामाबाबत सदर प्रकल्पाशी निगडीत वैद्यकीय व्यावसायीक यांची इचलकरंजी महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडे एक ही तक्रार आज अखेर प्राप्त नाही. त्यामुळे सदर बाबतीत योग्य ती कायदेशीर कार्यवाही होणेसाठी मेडिकल असोसिएशन ऑफ इचलकरंजी यांचाही अभिप्राय घेणे आवश्यक आहे. तसेच सदरचे काम अचानक रद्द केलेस इचलकरंजी शहरातील जैव वैद्यकीय कचऱ्याचा (बायोमेडिकल वेस्टचा) गंभीर प्रश्न निर्माण होणेची शक्यता नाकारता येत नाही असा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील जैव व वैद्यकीय कचरा संकलन व प्रक्रिया करणेबाबत सद्या सुरु असलेले एस. एस. सर्व्हीसेस जयसिंगपुर यांचे काम समाधानकारक नाही, एस. एस. सर्व्हीसेस यांचा जैववैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करणेत येत असलेला प्रकल्प सद्या बंद अवस्थेत आहे अशी मा. सदस्यांची तक्रार आहे. एस. एस. सर्व्हीसेस यांचेकडुन महानगरपालिकेस मासिक रु. १,५००/- याप्रमाणे वर्षाला फक्त १८,०००/- रुपये इतके अत्यल्प उत्पन्न मिळत असुन यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. नव्याने निविदा काढलेस महापालिकेस जादा उत्पन्न मिळेल, तसेच एस. एस. सर्व्हीसेस यांच्या कामाबद्दल महानगरपालिका पदाधिकारी यांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे एस. एस. सर्व्हीसेस जयसिंगपुर यांचा जैववैद्यकीय कचरा संकलन करणेचा मक्ता रद्द करणेत येत आहे. सदर कामी तात्काळ नव्याने निविदा मागविणेत यावी. निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी एस. एस. सर्व्हीसेस यांचेकडुन जैव कचरा संकलनाचे काम करुन घेणेत यावे.

सूचक : Satish स.व. मुळीक     अनुमोदक : A.P. Bachate श्री. अ. प्र. बचाटे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६ ठराव क्र. 935

सर्वसाधारण सभा दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ५५ : महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान, नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना व साहित्य रत्न लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी सौर पथदिवे बसविणेकामी ठिकाणे निश्चित करणेबाबत.

**ठराव**

जिल्हा नियोजन समिती मार्फत राबविणेत येणा-या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर, नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना, व साहित्यरत्न लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना या योजनांमधुन इचलकरंजी महानगरपालिका हददीमधुन सौर पथदिवे बसविणेबाबत मा. आमदार इचलकरंजी विधानसभा यांनी प्रस्ताव सादर करणे संदर्भात सुचविले आहे. सदर पत्रास अनुसरुन जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, कोल्हापुर यांनी विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा कोल्हापुर यांना उचित कार्यवाही करणे संदर्भात कळविले आहे.

सदर पत्रास अनुसरुन महाऊर्जा कार्यालय, कोल्हापुर यांनी विषयांकितकामी जिल्हा नियोजन समिती यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत कागदपत्रांची पुर्तता होणेकामी कळविले आहे. सदर पत्रांच्या अनुषंगाने इकडील कार्यालयामार्फत इचलकरंजी शहरामध्ये सौर पथदिवे बसविणे शक्य असणा-या ठिकाणांचा सर्व्हे करुन खालील नमुद केलेप्रमाणे ठिकाणे निश्चित करणेत आलेली आहेत.

| अ.क्र. | निश्चित केलेले ठिकाणे | अ.क्र. | निश्चित केलेले ठिकाणे |
|---|---|---|---|
| १ | सांगली रोड महासत्ता चौक | ३८ | उत्तम प्रकाश टॉकीज रिक्षा स्टॉप जवळ |
| २ | सांगली रोड फॉर्च्युन प्लाझा चौक | ३९ | शंकरराव पुजारी जलतरण तलाव जवळ |
| ३ | निरामय हॉस्पिटल चौक | ४० | पंचवटी रोड दातार बंगला चौक |
| ४ | शहापुर बाजार चौक | ४१ | चंदुर रोड दिपक सुर्वे बंगला चौक |
| ५ | खंजिरे इस्टेट पेट्रोल पंप चौक | ४२ | पंचवटी रोड दातार बंगला चौक |
| ६ | आर. के. नगर अस्वले किराणा दुकान | ४३ | शहापुर म्हसोबा रोड कमानीजवळ |
| ७ | सोलगे मळा चौक पेटी समोर | ४४ | व्यंकटेश कॉलनी मैदान |
| ८ | विक्रमनगर बालाजी शाळेसमोर | ४५ | जवाहरनगर अरिहंत बाजार चौक |
| ९ | स्वामी अपार्टमेंट मेन स्विच पेटी जवळ | ४६ | जवाहरनगर जुना ST स्टॅंड चौक |
| १० | आंबेडकर हौ.सोसायटी बाजार कटटा | ४७ | राजराजेश्वरी नगर हजारे घर चौक |
| ११ | कॉंग्रेस कमिटी चौक | ४८ | यशवंत कॉलनी गणपती मैदान |
| १२ | गणपती मंदिर रोड १ | ४९ | सावली सोसायटी बागेजवळ |
| १३ | वृंदावन कॉलनी बगीचा | ५० | स्टेशन रोड चंद्रकांत सायकल दुकान |
| १४ | सुंदर बाग MSEB चौक | ५१ | स्टेशन रोड जिव्हाजी हॉल समोर |
| १५ | कोलेमळा बालवाडी शाळा मैदान | ५२ | जवाहरनगर गणपती कटटा |
| १६ | स्टेशन रोड फायर स्टेशन चौक | ५३ | जवाहनगर कोल्हापुर बेकरी चौक |
| १७ | चंदुर रोड योगायोग नगर चौक | ५४ | जवाहरनगर जोतिलिंग पान शॉप परिसर |
| १८ | पुजारी मळा मालती गंगा अपार्टमेंट | ५५ | डेक्कन चौक |
| १९ | पंचवटी रोड न.पा. पाण्याची टाकी समोर | ५६ | जवाहरनगर स्वामी कारखाना चौक |
| २० | टॅनर सोसायटी मैदान | ५७ | सोनाली हॉटेल कोपरा |
| २१ | जवाहरनगर, मराठा चौक | | **शासकीय मंदिरे** |
| २२ | जवाहरनगर प्रदिप धुत्रे घर चौक | १ | जुना चंदुर रोड दुर्गामाता मंदिर |
| २३ | राजराजेश्वरी नगर ओम चौक | २ | सा.न. १०२ महादेव मंदिर |
| २४ | जयभिम नगर बुध्द मुर्ती समोर | ३ | वॉर्ड नं. ८ साखरे हनुमान मंदिर |
| २५ | जय सांगली नाका चौक परिसर | ४ | अबांबाई देवालय गावभाग |
| २६ | निरामय रोड भगतसिंग चौक | ५ | कलेश्वर महादेव मंदिर गावभाग |
| २७ | निरामय रोड CETP चौक | ६ | नदीवेस मरगुवाई मंदिर गावभाग |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | शहापुर चौंडेश्वरी कॉलनी चौक | ७ | बोध्द विहार मंदिर |
| २९ | शहापुर प्रभाग समिती शाळा मैदान | ८ | रोहीदास समाज मंदिर |
| ३० | तोरणानगर गणी लक्ष्मीबाई मैदान | ९ | वॉर्ड नं. ४ विठठल मंदिर |
| ३१ | वंदे मातरम मैदान म्हसोबा चौक | १० | प्र.क्र. ३ ओपन स्पेस महादेव मंदिर समोर राजराजेश्वरी नगर |
| ३२ | टॅनर सोसायटी जाधव मळा रोड चौक | ११ | हनुमान मंदिर हवामहाल बंगला परिसर |
| ३३ | तोरणानगर मेन पेटी समोर चौक | १२ | लाखे नगर समाज मंदिर |
| ३४ | इंदिरा कार्यालय चौक | १३ | सा.न. ६० शहापुर समाज मंदिर / ३ |
| ३५ | जवाहरनगर संतोषी माता मंदिर | १४ | CS NO ५२० सांस्कृतीक हॉल बिरदेव मंदिर |
| ३६ | शाहु हायस्कुल पटांगण | १५ | वॉर्ड नं. ०८/१५० इंदिरा नगर समाज मंदिर |
| ३७ | वैरण बाजार नविन चौक | | |

वरील नमुद केले ठिकाणे निश्चित करुन सदर ठिकाणी सौर पथदिवे बसविणेकामी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान, नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना व साहित्य रत्न लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत प्रस्ताव सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स.व. मुळीक.

अनुमोदक : ती.बा.पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३३६
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ५६ : इचलकरंजी महानगरपालिका रेकॉर्ड विभाग व विविध विभागाकडे जमा असणारे अ व ब वर्गातील कायमस्वरुपी अभिलेख व त्या अनुषंगिक सर्व प्रकारचे लेखे डिजीटल स्कॅनिंग करणेस मंजुरी मिळणेबाबत.

## ठराव

महाराष्ट्र शासकीय अभिलेख नियम २०१६ व Digital India land Records Modernization Programme (DILRMP) अन्वये शासकीय अभिलेखाचे जतन व आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. इचलकरंजी महानगरपालिकेकडे तत्कालीन नगरपरिषद काळातील 'अ' वर्ग-कायमस्वरूपी व 'ब' वर्ग- ३० वर्षे जतन करावयाचे असे हजारो महत्वाचे अभिलेख कागदी स्वरुपात उपलब्ध आहेत. 'अ' वर्ग कायमस्वरूपी मध्ये मा.कौन्सिल ठराव, मा.स्थायी समिती ठराव, जन्म-मृत्यू नोंदवह्या, मालमत्ता नोंदवह्या, मंजूर रचना नकाशे, करारनामे, शासन निर्णय संचिका इ. 'ब' वर्ग मध्ये सेवा पुस्तके, बांधकाम परवाना संचिका, निवृत्ती वेतन प्रकरणे, जमीन अधिग्रहण प्रकरणे, लेखा परिक्षण अहवाल.

सदर अभिलेख हे सन-१९६४-६५ पासूनचे कागदी स्वरूपात असून सतत हाताळणी मुळे जीर्ण होणे,वाळवी लागणे ,तसेच जागा उपलब्ध नसलेने जुनी नगरपालिका इमारतीत ठेवलेमुळे पाणी गळती व आगीमुळे खराब होण्याचा धोका नाकारता येत नाही.जागेची कमतरता व शोधण्यास विलंब इत्यादी बाबींचा विचार करता, इचलकरंजी महानगरपालिकेकडील 'अ' व 'ब' वर्गातील सर्व अभिलेखांचे डिजिटल स्कॅनिंग व संगणकीकरण केल्यामुळे नागरिकांना जलद सुविधा उपलब्ध करून देणे सोयीचे होणार असल्यामुळे सर्व अभिलेखांचे डिजिटल स्कॅनिंग व संगणकीकरण अत्यंत गरजेचे आहे.

महानगरपालिकेकडील विविध खातेकडील मिळालेल्या अंदाजे माहितीनुसार Ao, A1, A2, A3, A4, A5 व LEGAL अशा विविध आकाराच्या 'अ' वर्ग कायमस्वरूपी एकूण अंदाजे २० लाख ते २१ लाख व . 'ब' वर्ग अंदाजे १५ ते १६ लाख इतक्या प्रती होत असून अजून काही विभागाकडून माहिती येणे बाकी असलेमुळे प्रतीची संख्या थोडीफार वाढू शकते.

उपरोक्त बाबींचा विचार करता, इचलकरंजी महानगरपालिकेकडील 'अ' व 'ब' वर्गातील सर्व अभिलेखांचे डिजिटल स्कॅनिंग व संगणकीकरण करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका रेकॉर्ड विभाग व विविध विभागाकडे जमा असणारे अ व ब वर्गातील कायमस्वरुपी अभिलेख व त्या अनुषंगिक सर्व प्रकारचे लेखे डिजीटल स्कॅनिंग करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि. पु. चोपडे

अनुमोदक : स. व. मुळीक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. ९३७
दि. २५/०६/२०२६

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

विषय क्र. ५७ : इचलकरंजी महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाकडे किटकजन्य आजार नियंत्रणासाठी रोगजंतुनाशके व औषधी द्रव्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे खरेदी करणेस मंजुरी मिळणेबावत.

## ठराव

इचलकरंजी महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडे किटकजन्य आजार नियंत्रणासाठी /प्रतिबंधासाठी (For Control / Prevention of National Vector Born Diseases) रोगजंतू नाशके व औषधी द्रव्ये चालू वित्तीय वर्ष २०२६-२०२७ मध्ये पुढील वर्षाभरासाठी खरेदी करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने मा. सतिश वसंतराव मुळीक, सभापती - स्थायी समिती, इचलकरंजी महानगरपालिका यांनी दि.१०/०४/२०२६ रोजी दिलेल्या पत्रानुसार इचलकरंजी शहरातील सार्वजनिक आरोग्य, दुर्गंधी निर्मूलन आणि सेंद्रिय कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी "BMAO पावडर" वापरण्याबाबत सुचित केलेनुसार मलेरिया विभागाकडील मुकादम व स्वच्छता निरीक्षक यांनी BMAO पावडरचे Sample प्रत्यक्ष वापरले असता ते सार्वजनिक आरोग्य, दुर्गंधी निर्मूलन आणि सेंद्रिय कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी व किटक नाशासाठी उपयुक्त असलेचे निर्दशनास आढळून आले आहे म्हणून सदरची पावडर खरेदी केलेस इचलकरंजी शहरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी हितकारक ठरेल असे इकडील स्पष्ट मत आहे. त्यानुसार चालू वित्तीय वर्ष २०२६-२०२७ साठी BMAO पावडर खालील प्रमाणे खरेदी करणे आवश्यक आहे.

कामाचे नाव – इचलकरंजी महानगरपालिकेकडे खालील नमुद रोगजंतूनाशके व औषधी द्रव्ये यांचा पुरवठा करणे.

| अ.क. | रोगजंतू नाशके/ औषधी द्रव्ये | उपयुक्तता | चालू वित्तीय वर्ष २०२६-२०२७ साठी खरेदी करणेकामी आवश्यक मागणी |
|---|---|---|---|
| १ | (BMAO) Powder | दुर्गंधी व जंतू नाशक कचरा कुजवून खत तयार करणे कामी | ५२०० किलो |

तसेच इचलकरंजी महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडे किटकजन्य आजार नियंत्रणासाठी /प्रतिबंधासाठी (For Control / Prevention of National Vector Born Diseases) खालील प्रमाणे रोगजंतू नाशके व औषधी द्रव्ये ही चालु वित्तीय वर्ष २०२६ – २०२७ मध्ये जाहिर ई-निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक आहे.

कामाचे नाव – इचलकरंजी महानगरपालिकेकडे खालील नमुद तक्त्यातील अ.क्र.१ ते ७ प्रमाणे रोगजंतू नाशके/ डास अळी नाशके/किटक नाशके व औषधी द्रव्ये यांचा पुरवठा करणे.

| **अ.क.** | **रोगजंतू नाशके/ औषधी द्रव्ये** | **उपयुक्तता** | **चालू वित्तीय वर्ष २०२६-२०२७ साठी खरेदी करणेकामी आवश्यक मागणी** |
|---|---|---|---|
| १ | Black Belt Brand Black Phenyl Grade १ RWC – १८-२० | दुर्गंधीनाशक, किटक नाशक | १६०० लीटर |
| २ | Mala – All ५ % DP – WHO Grade | दुर्गंधी व जंतू नाशक | १०००० किलो |
| ३ | Sythrion ५०% EC – ISI Mark | अंतर्गत औषध फवारणी | १०० लीटर |
| ४ | Nimtex Herbal Larvicide | डास प्रतिबंधक | २०० लीटर |
| ५ | Pestgone | माश्या प्रतिबंधक | २०० लीटर |
| ६ | Fatal ५० % EC – ISI Mark | डास अळी नाशक | ३०० लीटर |
| ७ | Disco १.२५% ULV | डास नाशक धुर फवारणीसाठी | १०० लीटर |

Scanned with OKEN Scanner

वरील प्रमाणे रोगजंतू नाशके व औषधी द्रव्ये खरेदी करणे बाबतचा धोरणात्मक निर्णय होणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडे किटकजन्य आजार नियंत्रणासाठी /प्रतिबंधासाठी (For Control / Prevention of National Vector Born Diseases) वरील प्रमाणे रोगजंतू नाशके व औषधी द्रव्ये खरेदी करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ता. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. मुल्लीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १३८
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ५८ : इचलकरंजी शहरातील मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणेसाठी स्तनदा मातांना बेबी किट वाटप उपक्रम राबविणेबाबत महिला व बालकल्याण समितीने केलेली शिफारस केली आहे तथापि मा. शासनामार्फत बेबी किट योजना राबविणेत येत आसलेने महापालिका स्तरावरुन नव्याने बेबी किट खरेदी करणेची आवश्यकता नसलेबाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

**ठराव**

सध्या इचलकरंजी महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या नूतन सभापतीं इचलकरंजी शहरातील मुलींच्या जन्माला प्रोत्सहन देण्यासाठी स्तनदा मातांना बेबी किट वाटप उपक्रम राबविणे बाबत मा. आयुक्तसो यांचे कडे मागणी पत्र सादर केलेले आहेत.

केंद्र / शासकिय रुगणालयात जन्मणारे नवजात बालकांना बेबी केअर कीट उपलब्ध करुन देणे बाबत शासन निर्णय झाला असून तसेच एकात्मीक बालविकास सेवा योजने अंतर्गत बेबी केअर किट खरीदी करणेस मान्यता देणे बाबत दिनांक. २१/०१/२०२६ च्या शासन निर्णयनुसार महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभागा अंतर्गत बेबी किट वाटप चालु असलेने ही योजना विशेषत: गरीब व सर्वसामान्य कुटुंबांसाठी आहे. या किट मध्ये नवजात बाळा साठी सुमारे २००० किमतीचे १७ आवश्यक वस्तू दिल्या जातात.

महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग अंतर्गत ही योजना चालू असताना परत इचलकरंजी महानगरपालिके अंतर्गत बेबी किट वाटप करणे संयुक्तीक ठरणार नाही असा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणेसाठी स्तनदा मातांना बेबी किट वाटप उपक्रम महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग अंतर्गत सुरु असलेने महापालिका स्तरावरुन नव्याने बेबी किट खरेदी करणेत येऊ नये.

सूचक : ना.बा.पोवार.

अनुमोदक : स.व.मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १३८
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ५९ : इचलकरंजी महानगरपालिका आरोग्य विभागाकडील सफाई कर्मचारी यांना आवश्यक असणारे ढकलगाडे खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राखण्यासाठी आणि शहराच्या स्वच्छतेसाठी आरोग्य विभागाकडील सफाई कामगार अहोरात्र कष्ट करत आहेत. तथापि, सद्यस्थितीत या कामगारांना आपले कर्तव्य कार्यक्षमतेने आणि सुरक्षितपणे बजावण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत साहित्याचा तुटवडा भासत आहे.

इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छता अधिक प्रभावीपणे करण्यासाठी सफाई कामगारांना नवीन आणि चांगल्या दर्जाच्या ढकलगाडीची अत्यंत आवश्यकता आहे.

सध्या उपलब्ध असलेल्या गाड्या जुन्या आणि नादुरुस्त झाल्या आहेत, ज्यामुळे कचरा वाहतूक करताना कामगारांना त्रास होत आहे.

सद्यस्थितीत पावसाळा सुरू होणार आहे. पावसाळ्यापूर्वी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील नालेसफाईचे, सारण गटारी व इतर अनुषंगिक कामे पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. तरी स्वच्छता मोहीम सुरळीतपणे राबवण्यासाठी तातडीने नवीन ढकलगाडी खरेदी करणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका आरोग्य विभागाकडील सफाई कर्मचारी यांना आवश्यक असणारे ढकलगाडे खरेदी करणेस मंजुरी देणेत येत असुन सदरचे ढकलगाडे हे फायबरचे व सदर गाड्यांना टायर ट्युब असणारे गाडे खरेदी करणेत यावेत यासाठी निविदा प्रक्रिया करणेत यावी.

सूचक : [signature] ता. बा. पोवार.

अनुमोदक : [signature] स. ब. मुल्लिक.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १४०
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ६० : इचलकरंजी महानगरपालिका आरोग्य विभागाकडील सफाई कर्मचारी यांना आवश्यक असनारे साहित्य रेट कॉन्टॅक्ट (RC) करुन भांडार विभागाकडुन आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राखण्यासाठी आणि शहराच्या स्वच्छतेसाठी आरोग्य विभागाकडील सफाई कामगार अहोरात्र कष्ट करत आहेत. तथापि, सद्यस्थितीत या कामगारांना आपले कर्तव्य कार्यक्षमतेने आणि सुरक्षितपणे बजावण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत साहित्याचा तुटवडा भासत आहे.

सद्यस्थितीत पावसाळा सुरू होणार आहे. पावसाळ्यापूर्वी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील नालेसफाईचे, सारण गटारी व इतर अनुषंगिक कामे पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. सद्यस्थितीत घनकचरा विभागाकडे सफाई कामगारांना आवश्यक असणारे खालील साहित्याची कमतरता आहे. सदरची खरेदीही वार्षिक रेट कॉन्ट्रॅक्ट करून भांडार विभागाकडून आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नाव |
|---|---|
| १ | खोरे (लांब दांडयाचे) |
| २ | झाडण्या |
| ३ | खुरपे |
| ४ | दात्री खोरे |
| ५ | कुदळ |
| ६ | पार |
| ७ | कुऱ्हाड |
| ८ | रेनकोट |
| ९ | मास्क BOX |
| १० | घन |
| ११ | हँड ग्लोज बॉक्स |
| १२ | मोठी काठी |
| १३ | गम बूट जोडी |
| १४ | बुट्ट्या |

तरी आरोग्य विभागाकडील सफाई कर्मचारी यांना आवश्यक असणार वरील प्रमाणे साहीत्य खरेदी करणेस मंजुरी देणेत येत असुन सदरची खरेदी निविदा प्रक्रिया करुन करणेत यावी.

सूचक : (सही) ना. बा. पोवार.

अनुमोदक : (सही) स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १४१
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ६१ : घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत रि. स. क्र. ६३८ येथील घनकचरा प्रक्रिया केंद्रावरील कचरा व्यवस्थापनासाठी नविन मक्तेदार यांची निवड होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात जे.सी.बी., पोकलेन, लोडर यांची आवश्यकता असलेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सुरु असलेल्या विविध कामांचे मक्तेदार यांचे कडुन समाधानकारक रित्या काम होत नसलेने व काही कामे अपूर्ण / प्रलंबित असलेने घनकचरा व्यवस्थापनाचे उद्धीष्ट पुर्ण होत नसल्याने संबंधीत मक्तेदार कंपनी यांनी निविदेतील अटी / शर्तींचं उल्लंघन केले असलेने सदर मक्ता तातडीने रद्द करुन नव्याने निवीदा प्रक्रीया राबविणेबाबत श्री. सतिश वसंतराव मुळीक, सभापती, स्थायी समिती यांनी दि. १३/०४/२०२६ चे पत्राने मागणी केली होती. दि. ३०/०३/२०२६ च्या मा. महासभा क्र. ०१ मध्ये ठराव क्र ३९ नुसार

कामाचे नाव - Installation of RDF plant of 65TPD and SWM Processing plant of 150 TPD and Operation & maintenance for a period of 5 years at R.S. No 638 at R.S. No 638 kachara depo, sangli road, Ichalkarnji. मक्तेदार नाव आदर्श भारत इन्व्हायरो प्रा. लि. पुणे यांचा शहरातील दररोज घनकचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या कंपनीचे काम रद्द केले आहे.

सदर कंपनीचा मक्ता रद्द झालेमुळे दररोज जवळपास १०० ते १२० मे टन निर्माण होणारा कचरा प्रक्रिया केंद्रावरील कर्मचारी व महानगरपालिकेची यंत्रणा यांचेमार्फत प्रक्रिया केली जात आहे. परंतु दररोज कचरा साठवून ठेवणेकरीता जागा अपुरी पडत आहे. प्रक्रिया केंद्रावरील यंत्रणा दररोजच्या येणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यास अपुरी पडत आहे. सदर कामाबाबत नवीन मक्तेदाराची निवड होईपर्यंत ठोस उपाययोजना होणे गरजेचे असलेने प्रकिया केंद्रावर सध्या तात्पुरत्या स्वरूपात जेसीबी, पोकलेन, लोडर यांची आवश्यकता असलेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत रि. स. क्र. ६३८ येथील घनकचरा प्रक्रिया केंद्रावरील कचरा व्यवस्थापनासाठी नविन मक्तेदार यांची निवड होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात जे.सी.बी., पोकलेन, लोडर पुरविणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : [signature] वि. पुं. चोपडे

अनुमोदक : O.R. Surve ओं. रा. उर्वे.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १४२
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ६२ : राजाराम स्टेडीयम तिसरा मजला येथील आय एम फिट क्लब या फिटनेस क्लब साठी भाडेतत्वावर देणेत आलेल्या हॉलच्या टेरेसवर सोलर सिस्टीम बसविणेस व तिसऱ्या मजल्यापर्यंत लिफ्ट बसविणेस परवाणगी देणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

**ठराव**

राजाराम स्टेडीयम तिसरा मजला येथील आय एम फिट क्लब या फिटनेस क्लब साठी भाडेतत्वावर देणेत आलेल्या हॉलच्या टेरेसवर सोलर सिस्टीम बसविणेस व तिसऱ्या मजल्यापर्यंत लिफ्ट बसविणेस परवाणगी देणेबाबत सदस्या ज्योती नागेश पाटील इचलकरंजी महानगरपालिका यांनी पत्राव्दारे मागणी केलेली आहे.

राजाराम स्टेडियम इमारतीमधील तिसरा मजला येथील आय एम फिट क्लब या फिटनेस क्लबसाठी भाडे तत्वावर देणेत आलेली आहे. सदर भाडे तत्वावर देणेत आलेल्या जागेच्या टेरेसवर आय एम फिट फिटनेस क्लब हे स्वखर्चाने सोलर सिस्टीम बसविणार आहेत व सोलर सिस्टिमची देखभाल ते स्वतः करणार आहेत. सदर सोलर सिस्टीमची वीज ते राजाराम मैदान येथील लाईटसाठी वापरास देणेस ते तयार आहेत. या मुळे राजाराम मैदान येथील महानगरपालिकेचा वीज बिलाचा खर्च वाचणार आहे. तसेच शासकीय इमारतींवर सोलर सिटीम बसविणे हे शासनाचे धोरण देखील आहे. आय एम फिट क्लब हे स्वखर्चाने सोलर सिस्टिम बसविणार आहेत. यामुळे महानगरपालिकेचा खर्च वाचणार आहे. सदर टेरेसवर फॅब्रिकेटर स्ट्रक्चर उभारुन सोलर सिस्टीम बसविणार आहेत व त्याची देखभाल व टेरेसवरील जागा योग व प्राणायाम उपक्रमासाठी वापरणेस परवानगी द्यावी. अशा सर्वबाबी समन्मानिय सदस्या ज्योती नागेश पाटील यांनी मागणी पत्रात नमूद केल्या आहेत.

सोलर सिस्टीम बसविणेकामी शहर अभियंता यांनी वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सांगली यांचेकडून स्ट्रक्चर ऑडीट करुन घेणेसाठी प्रस्ताव सादर केला असता वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सांगली यांनी दि.१०/१०/२०२५ रोजी अहवाल दिला असून अहवालानुसार सदर इमारतीवर सौर उर्जा प्रकल्प नमूद अटी शर्तीस अधिन राहुन बसविणे योग्य आहे.

वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सांगली यांचा अभिप्राय व सहा.संचालक, नगररचना यांनी निश्चित केलेल्या रु.४९/- प्रति चौरस मीटर प्रति महा भाडे व महानगरपालिकेच्या अटी / शर्तीनुसार राजाराम स्टेडीयम तिसरा मजला हॉलचे टेरेसवर सोलर सिस्टीम बसविणेस परवानगी देणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी राजाराम स्टेडीयम तिसरा मजला येथील आय एम फिट क्लब यांना भाडेतत्वावर देणेत आलेल्या हॉलच्या टेरेसवर आय एम फिट क्लब हे स्वखर्चाने सोलर सिस्टीम बसविणार आहेत व सदर सोलर सिस्टीमची देखभाल व दुरुस्ती ते स्वत: करणार आहेत तसेच सदर सोलर सिस्टीमची वीज ते राजाराम मैदान येथील लाईटसाठी वापरास देणेस ते तयार आहेत. तसेच शासकीय इमारतींवर सोलर सिस्टीम बसविणेबाबत शासनाचेही धोरण आहे व सद्या महानगरपालिकेस राजाराम स्टेडीयमसाठी वापरण्यात येणा-या लाईटबिलाचा खर्च स्वनिधीतून करावा लागतो. मात्र आय एम फिट क्लब हे स्वत: बसविणा-या सोलर सिस्टीममधुन मैदानासाठी आवश्यक वीज विना मोबदला देणार असलेने , महानगरपालिकेच्या विद्युत बिल खर्चात मोठी बचत होणार आहे, याचा विचार करुन, मैदानाच्या लाईटसाठी विना मोबदला विद्युत जोडणी देणेच्या अटीवर सहा.संचालक, नगररचना यांनी निश्चित केलेल्या रु.४९/- प्रति चौरस मीटर प्रति महा या ऐवजी रु.१२.२५/- प्रति चौरस मीटर प्रति महा भाडे यानुसार आय एम फिट क्लब यांना भाडेतत्वावर देणेत आलेल्या हॉलच्या टेरेसवर सोलर सिस्टीम बसविणेस व टेरेसवर योग व प्राणायाम या उपक्रमासाठी वापरणेस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच त्यांचे मागणी प्रमाणे तिस-या मजल्या पर्यंत लिफ्ट बसविणेस स्वतंत्र प्रस्ताव पुढील सभेत सादर करणेत यावा.

सूचक : (स्वाक्षरी) म. मि. हिंगमिरे

अनुमोदक : (स्वाक्षरी) स. व. मुल्लीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

(स्वाक्षरी)
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९८३
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ६३ : प्रभाग समिती कार्यालय अ च्या दि. २८/०४/२०२६ रोजी आयोजित सभेतील मा. महासभेकडे शिफारस करणेत आलेले ठराव.

**ठराव**

प्रभाग समिती कार्यालय अ च्या दि. २८/०४/२०२६ रोजी आयोजित सभेमध्ये प्रभाग समिती अ कार्यालयाकडे मा. सदस्यांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत निर्णय होणेकामी मा.महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी मा.सदस्यांनी त्यांचे प्रभागातील नागरी समस्यांबाबत सादर केलेल्या अर्जाबाबत प्रभाग समिती कार्यालयाकडील संबंधित अभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर भेट देवून तात्काळ करावी लागणारी कामे, तात्पुरती दुरुस्ती करावी लागणारी कामे व महानगरपालिका स्तरावर निर्णय घ्यावी लागणारी कामे यानुसार वर्गवारी करुन त्यानुसार कार्यालयाकडे अहवाल सादर करावा. त्यानुसार कार्यालयाने सदर कामांची अंदाजपत्रके तयार करुन व पुढील कार्यवाही करावी.

सूचक : स. व. मुळीक

अनुमोदक : अ. र. वाळवेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६

सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १४४

दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ६४ : प्रभाग समिती कार्यालय ब च्या दि. १७/०४/२०२६ रोजी आयोजित सभेतील मा. महासभेकडे शिफारस करणेत आलेले ठराव.

**ठराव**

प्रभाग समिती कार्यालय ब च्या दि. १७/०४/२०२६ रोजी आयोजित सभेमध्ये प्रभाग समिती ब कार्यालयाकडे मा. सदस्यांनी दाखल केलेल्या अर्जांबाबत निर्णय होणेकामी मा.महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी मा.सदस्यांनी त्यांचे प्रभागातील नागरी समस्यांबाबत सादर केलेल्या अर्जांबाबत प्रभाग समिती कार्यालयाकडील संबंधित अभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर भेट देवून तात्काळ करावी लागणारी कामे, तात्पुरती दुरुस्ती करावी लागणारी कामे व महानगरपालिका स्तरावर निर्णय घ्यावी लागणारी कामे यानुसार वर्गवारी करुन त्यानुसार कार्यालयाकडे अहवाल सादर करावा. त्यानुसार कार्यालयाने सदर कामांची अंदाजपत्रके तयार करुन व पुढील कार्यवाही करावी.

सूचक : अ. ट. वाळवेकर.

अनुमोदक : O.R. Surve ओ. रा. सुर्वे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०५
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९४५
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ६५ : प्रभाग समिती कार्यालय क च्या दि. २१/०५/२०२६ रोजी आयोजित सभेतील मा. महासभेकडे शिफारस करणेत आलेले ठराव.

**ठराव**

प्रभाग समिती कार्यालय क च्या दि. २१/०५/२०२६ रोजी आयोजित सभेमध्ये प्रभाग समिती क कार्यालयाकडे मा. सदस्यांनी दाखल केलेल्या अर्जांबाबत निर्णय होणेकामी मा.महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी मा.सदस्यांनी त्यांचे प्रभागातील नागरी समस्यांबाबत सादर केलेल्या अर्जांबाबत प्रभाग समिती कार्यालयाकडील संबंधित अभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर भेट देवून तात्काळ करावी लागणारी कामे, तात्पुरती दुरुस्ती करावी लागणारी कामे व महानगरपालिका स्तरावर निर्णय घ्यावी लागणारी कामे यानुसार वर्गवारी करुन त्यानुसार कार्यालयाकडे अहवाल सादर करावा. त्यानुसार कार्यालयाने सदर कामांची अंदाजपत्रके तयार करुन व पुढील कार्यवाही करावी.

सूचक : र. स. आवळे

अनुमोदक : O.R.Surve ओं. रा. सुर्वे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०७
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १४६
दि. २५/०६/२०२६

विषय क्र. ६६ : प्रभाग समिती कार्यालय **ड** च्या दि. १६/०४/२०२६ रोजी आयोजित सभेतील मा. महासभेकडे शिफारस करणेत आलेले ठराव.

**ठराव**

प्रभाग समिती कार्यालय ड च्या दि. १६/०४/२०२६ रोजी आयोजित सभेमध्ये प्रभाग समिती **ड** कार्यालयाकडे मा. सदस्यांनी दाखल केलेल्या अर्जांबाबत निर्णय होणेकामी मा.महासभेकडे शिफारस केली आहे.

तरी मा.सदस्यांनी त्यांचे प्रभागातील नागरी समस्यांबाबत सादर केलेल्या अर्जांबाबत प्रभाग समिती कार्यालयाकडील संबंधित अभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर भेट देवून तात्काळ करावी लागणारी कामे, तात्पुरती दुरुस्ती करावी लागणारी कामे व महानगरपालिका स्तरावर निर्णय घ्यावी लागणारी कामे यानुसार वर्गवारी करुन त्यानुसार कार्यालयाकडे अहवाल सादर करावा. त्यानुसार कार्यालयाने सदर कामांची अंदाजपत्रके तयार करुन व पुढील कार्यवाही करावी.

सूचक : रु. ल. आवळे

अनुमोदक : O.R.Surve ओं.रा.सुर्वे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner